# ...कातिधारा.

श्री ज्ञानेश्वरींतील १०८ वेच्यांची स्मरणी.

टिळक ग्रंथ संग्रहालय

वाई (जि. सातारा)

क्रमांक

3506

0173

शके १८०७.

# स्वातिधारा

श्री ज्ञानेश्वरींतील १०८ वेच्यांची स्मरणी.

संग्राहक व प्रकाशक,

**नारायण विष्णु आठवले.**

६८० सदाशिव पेठ,

पुणें शहर.

संतप्तायासि संस्थितस्य पयसो नामापि न श्रूयते ।
मुक्ताकारतया तदेव नलिनीपत्रस्थितं राजते ॥
स्वात्यां सागरशुक्तिसंपुटगतां तज्जायते मौक्तिकम् ।
प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संसर्गतो जायते ॥

---:०:---

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे, 'हनुमान' छापखाना
घ. नं ३०० सदाशिव पेठ पुणें शहर.

श्री वर्षप्रतीपदा शके १८४७

टिळक ग्रंथसंग्रहालय वाई जि. सातारा 3506
ग्रंथ संग्रहालय दा. अंक वि. अंक वाई जि. सातारा

ॐ

श्री ज्ञानेश्वरमहाराज प्रसन्न.

# प्रस्तावना.

१ ज्यांच्या सहवासानें मला ज्ञानेश्वरीचा नाद लागला, त्या श्री केशवरावजी देशमुखांचे या देहावर झालेले पारमार्थिक उपकार चिरस्मरणीय आहेत.

२ सध्या कागद फार महाग झाल्यामुळें पुस्तकाची किंमत फार वाढली आहे. गरीबगुरिबांस ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ विकत घेऊन वाचणें अशक्य झालें आहे. यदाकदाचित कोणास हें पुस्तक उपलब्ध झालेंच तर त्यांतील मुख्य व महत्वाचे विषय नऊ हजार ओव्यांतून शोधून काढून त्यांचा अभ्यास करणें हें त्याहीपेक्षां अवघड आहे. म्हणून मी ज्ञानेश्वरींतील चांगलें वेंचे निवडून काढून त्याची एकशें आठांची स्मरणी तयार केली आहे. हे चुटके लहान लहान व रोजच्या परिपाठांतील असल्यामुळें पाठ करण्यासही फार सुलभ आहेत. पुस्तक मुद्दाम लहान केलें आहे त्यामुळें तें मुमुक्षुजनांच्या खिशांत राहून ज्या ज्या वेळेस सवड सांपडेल त्या त्या वेळेस त्याचें परिशीलन करितां येईल. हें नवरसांचें ताट असून त्यांत भक्तिरस प्रधान आहे. व हा रसस्वाद सर्व भाविकांनीं मनसोक्त लुटावा हा यांत मुख्य उद्देश आहे. पुरुषोत्तमयोगाची सेवा झाल्यानंतर हा दुसरा अल्प प्रयत्न आहे. ही माझी कायिक सेवा सर्व भक्त गोड करून घेतील अशी आशा आहे. या वेंच्याचें परिशीलन अथवा नुसतें पठण जे अनन्यभावानें करतील त्यांचें पांडुरंगाच्या कृपेनें कल्याणच होईल यांत तिलप्राय शंका नाहीं.

३ ज्या अध्यायांतली जो विषय आहे त्याचा आंकडा विषयाच्या पुढेंच कंसांत घातला आहे; त्या योगानें कोणत्या अध्यायांतील कितवी ओवी आहे हें समजेल. प्रत्येक अध्यायाच्या आरंभीं त्या अध्यायांत असलेल्या नमनाच्या ओव्या घालून त्यापुढें ह. भ. प. गोविंद रामचंद्र मोघे यांच्या ज्ञानेश्वरींतील प्रत्येक अध्यायाचें सार ह्मणून त्यांनीं केलेला श्लोक दिला आहे; त्यामुळें त्या अध्यायांत कोणत्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे हें समजेल. हे श्लोक छापण्यास त्यांनीं परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. कठीण शब्दाचे अर्थाचा कोश अध्यायवार शेवटीं दिला आहे. तुटक ओव्या अध्यायाच्या शेवटीं सर्व संग्रहांत दिल्या आहेत, मोठ्या किंमतीच्या सर्व वस्तूंपेक्षां या पुस्तकाची किंमत माझ्या मतें फारच मोठी आहे, किंबहुना हें पुस्तक अमोल आहे म्हणजे याची किंमतच होऊं शकत नाहीं; सबब ज्यांच्या ज्यांच्या हातांत हें पुस्तक पडेल त्यांनीं कृपा करून त्याची हेळसांड न करितां अत्यंत प्रिय वस्तु म्हणून सदोदित आपल्या उराशीं बाळगावी, अर्थात खिशांत ठेवावी अशी सविनय प्रार्थना आहे. हें पुस्तक स्वतःसिद्धच असल्यामुळें कोणत्याही अभिप्रायाची जरूरी नाहीं. ज्यांस हें पुस्तक आवडणार नाहीं त्यांनीं तें आमचेकडे परत आणून देणेची मेहेरबानी करावी. या पुस्तकांस केराची टोपली अगर अन्य ठिकाण दाखऊं नये अशी हात जोडून प्रार्थना आहे.

४ अल्पाक्षररमणीय अशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची प्रतिपादनाची शैली केवळ अनन्यसाधारण अशी आहे, दृष्टाच्चादृष्टसिद्धिः म्हणजे दृष्टावरून म्हणजे सांसारिक दाखल्यांवरून अदृष्टाची म्हणजे बुद्धिग्राह्य पण अतींद्रिय अशा परतत्वाची समजूत करून देणें;

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं दृष्टांत विषय सुबोध करण्यासाठींच योजिलेले असतात. वाचकांनीं प्रत्येक दृष्टांताचें मनन करावें.

५ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा या पुस्तकांत एक फोटोही जोडला आहे. तो भाविक उपासकांच्या नित्य दर्शनास आणि ध्यानास उपयोगी पडेल. वैकुंठवासी श्रीगुलाबराव महाराज यांस ज्या रूपांत दर्शन झालें त्याचेंच हें प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणें सद्गुरु परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराज, आळंदी, यांनीं स्वतः केलेलें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें स्तोत्र या सोबत छापलें आहे. हें सिद्धांनीं केलेलें सिद्धस्तोत्र नित्य पठनीयच आहे, हें काय आम्ही सांगावें ?

६ तसेंच आमचे पारमार्थिक परमस्नेही ह. बाबुराव ऊर्फ माधव गोविंद भिडे यांनीं हें पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याचे कामीं सर्व प्रकारची मेहेनत घेतली आहे, त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

माझे फार जुने स्नेही रा. रा. विष्णु गणेश गोखले यांनीं आपला अमोल वेळ खर्च करून व शारीरिक मेहेनत घेऊन वेचे निवडण्यास जी मनोभावें मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

७ शेवटीं ज्या परमेश्वरानें हें कार्य करण्यास मला प्रवृत्त केलें व ज्या वडिलांच्या पुण्याईनें ही मला सुबुद्धी झाली त्या उभयतांस अनन्यशरण जाऊन ही प्रस्तावना पुरी करतों.

६८०, सदाशिव पेठ पुणें शहर,<br>वर्षप्रतिपदा, शके १८४७.

संतसेवक,<br>**नारायण विष्णु आठवले.**

॥ श्री ज्ञानेश्वरमहाराज प्रसन्न ॥



# ॥ श्रीज्ञानेश्वराष्टकं स्तोत्रम् ॥

कलावज्ञजीवोद्धरार्थावतारं, कलाङ्काङ्कतेजोधि कामोदिवक्त्रम् ।
खलानीशवादापनोदार्द्रदक्षं, समाधिस्थ मूर्तिं भजे ज्ञानदेवम् ॥ १ ॥
अलङ्कापुरी रम्यसिंहासनस्थं, पदाम्भोजतेजः स्फुरद्दिव्यदेशम् ।
विधीन्द्रादिदेवैः सदास्तूयमानं, समाधिस्थमूर्ति० ॥ २ ॥
गदाशङ्खचक्रादिभिर्भावितांगं, चिदानंद संलक्ष्य नाव्यक्तरूपम् ।
यमाद्यष्टभेदाङ्ग योगप्रवीणं, समाधिस्थ० ॥ ३ ॥
छलायस्यवक्त्राच्छ्रुतिं पाठयन्तं, प्रतिष्ठानपुर्यां सुधीसंघसेव्यम् ।
चतुर्वेदतन्त्रेतिहासादिपूर्णं, समाधिस्थ० ॥ ४ ॥
सदापण्ढरीनाथपादाब्जभृङ्गं, निवृत्तीश्वरानुग्रहात्प्राप्ततत्त्वम् ।
महेन्द्रायणीतीरभूमौ वसन्तं, समाधिस्थ० ॥ ५ ॥
रणेकृष्णभीमत्सुसंवादभूतो,–र्गीतार्थबोधाय ज्ञानेश्वरी वै ।
कृतीनिर्मिता येन च प्राकृतोक्त्या, समाधिस्थ० ॥ ६ ॥
चिराभ्याससंयोगसिद्धेर्बलाढ्यः, बृहद्व्याघ्रशायी महान् चाङ्गदेवः ।
निरीक्ष्याप्रकुड्यागतं वीतगर्वः, समाधिस्थ० ॥ ७ ॥
कचित्तीर्थयात्राभिषेणेति नीत्वा, स्वसंवेद्यतत्त्वं न जानासि विष्णोः ।
यतः प्रेषितः खेचरं नामदेवः, समाधिस्थ० ॥ ८ ॥
स्तवं भावभक्त्यादिभिः सौख्यदेयं, पठन्तोऽर्थजातं ह्यवाप्यापि विष्णोः ।
पदंयान्ति ते ज्ञानदेवस्य नित्यं, भवाब्धिं तरन्त्यन्तकाले च भक्ताः॥९॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य नरसिंहसरस्वतीस्वामि-
विरचितं श्रीज्ञानेश्वरस्तोत्रम् ॥ श्रीशंकर. ॥

# अनुक्रमणिका.


| विषय | अध्याय |
|---|---|
| १ ज्ञानेश्वरीचा अभ्यास कसा करावा | १ |
| २ शूर अर्जुनाची रणांगणावरची स्थिति | १ |
| ३ अर्जुनाचा मोह घालविण्याकरितां भगवंताचा उपदेश | २ |
| ४ विषयांच्या ठिकाणीं इंद्रियांची स्वाभाविक आसक्ति | २ |
| ५ व्यवसायात्यिका बुद्धि ( सुबुद्धि ) | २ |
| ६ निष्काम कर्म | २ |
| ७ स्थितप्रज्ञाचीं लक्षणें | २ |
| ८ मनुष्यास कर्मत्याग शक्यच नाहीं | ३ |
| ९ योग्यांचीं लक्षणें | ३ |
| १० स्वधर्माची महती | ३ |
| १९ अज्ञानी लोकांच्या चालू कर्मांत अश्रद्धा उत्पन्न करूं नये | ३ |
| १२ इंद्रियांचे लाड न करण्याबद्दल शिकवण | ३ |
| २३ कामक्रोधवर्णन | ३ |
| १४ भगवंताचें अर्जुनावरील प्रेम | ४ |
| १५ कर्मयोग लुप्त होण्याचें कारण | ४ |
| १६ संशयग्रस्त मनुष्यास कोठेच थारा नाहीं | ४ |
| १७ सद्गुरुशरणागतीवांचून ज्ञानप्राप्ति नाहीं. | ४ |
| १८ गीताश्रवणाची फलप्राप्ती | ४ |
| १९ कर्मसंन्यास | ५ |
| २० योगीलक्षण | ५ |
| २१ विषयसुखभ्रांती | ५ |
| २२ वृथा देहाभिमानामुळें बद्धता | ६ |
| २३ साधकाचें आचरण | ६ |
| २४ चंचल मन ताब्यावर आणण्याचा उपाय | ६ |
| २५ जीव ब्रह्माचा अंश असून त्याचा विसर पडण्याचें कारण | ७ |
| २६ माया नदीचें वर्णन | ७ |

| विषय | अध्याय |
| --- | --- |
| २७ अधिभूत, अधिदैवत, अधियज्ञ | ८ |
| २८ अंतकाळच्या स्मृतीप्रमाणें गति | ८ |
| २९ नित्य स्मरण करणाऱ्या पुरुषाला परमात्मा सुलभ आहे | ८ |
| ३० अंतकाळचा अर्चिरादि मार्ग | ८ |
| ३१ श्रद्धाहीन जनांची स्थिति | ९ |
| ३२ ईश्वराच्या अधिष्ठानावर मायेची उलाढाल | ९ |
| ३३ परमेश्वराच्या नामाचा महिमा | ९ |
| ३४ परमेश्वराचें सामर्थ्य | ९ |
| ३५ स्वर्गसुखानंतर मृत्युलोकीं पुनरागमन | ९ |
| ३६ अनन्यभक्तांचें परमेश्वर चालवितो | ९ |
| ३७ परमेश्वरास सप्रेम अर्पण | ९ |
| ३८ परमेश्वर भक्तिवांचून व्यर्थ जिणें | ९ |
| ३९ ब्राह्मणांचा अधिकार | ९ |
| ४० सर्व गोष्टी परस्वाधीन असून मनुष्यास व्यर्थ घमेंड कशाला | ९ |
| ४१ परमेश्वरापासून जगदुत्पत्ति | १० |
| ४२ सर्वव्यापक असें विश्वरूप दाखविण्याबद्दल अर्जुनाची प्रार्थना | ११ |
| ४३ यशोदेस व ध्रुवास विश्वरूप दर्शन | ११ |
| ४४ विश्वरूप पाहिल्यावर अर्जुनाची स्थिति | ११ |
| ४५ निःसीम भक्ति | ११ |
| ४६ योगाचे कष्ट | १२ |
| ४७ सगुणभक्ति | १२ |
| ४८ खऱ्या भक्तांचें सर्व कांहीं देव चालवितो | १२ |
| ४९ अभ्यासयोग | १२ |
| ५० कर्म ब्रह्मार्पण | १२ |
| ५१ मुक्तांचें लक्षण | १२ |
| ५२ भगवंताचें भक्तप्रेम | १२ |
| ५३ क्षेत्र कोण व क्षेत्रज्ञ कोण. | १३ |
| ५४ अहंकार | १३ |
| ५५ पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें | १३ |

विषय अध्याय

५६ मन

५७ ज्ञानेंद्रियांचें व कर्मेंद्रियांचे विषय १३

५८ इच्छा १३

५९ सुखदुःख १३

६० चैतन्य ( १३ )

६१ अमानित्व ,,

६२ अदंभित्व ,,

६३ अहिंसा ,,

६४ आर्जव ( सरळपणा )

६५ शुचित्व ,,

६६ विषयवैराग्य ,,

६७ निरभिमान ,,

६८ वार्धक्यवर्णन ,,

६९ म्हणून वार्धक्य येण्यापूर्वींच परमार्थ करावा १३

७० ज्ञानी पुरुषाचीं लक्षणें ,,

७१ अज्ञानी पुरुषाचीं लक्षणें ,,

७२ अविवेकी पुरुष ,,

७३ प्रकृति आणि पुरुष ,,

७४ प्रकृतीचें कार्य ,,

७५ देहाचें अंतिम ,,

७६ मायेची संतति ( १४ )

७७ गुणातीताचीं लक्षणें ,,

विषय अध्याय

७८ अव्यभिचारी भक्ति ,,

७९ पुनर्जन्म ( १५ )

८० क्षर पुरुष, अक्षर पुरुष, उत्तम पुरुष ,,

८१ अभय, सत्वशुद्धि, ज्ञानयोग, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव ( १६ )

८२ अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशून्य, दया, अलोलुत्त्व, मार्दव, न्हीः अचापल्य ,,

८३ तेज, क्षमा, धृति, शौच, अद्रोहत्व, अमानित्व ,,

८४ दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य, अज्ञान, हीं असुरी संपत्तीचीं लक्षणें

८५ श्रुतिमाउलीचे उपकार ,,

८६ त्रिगुणत्व हें अमर आहे ( १७ )

८७ सात्विक राजस तामस श्रद्धा ,,

८८ सात्विक राजस तामस आहार ,,

८९ शारीर तप, वाचिक तप,

| विषय | अध्याय | विषय | अध्याय |
|---|---|---|---|
| मानसिक तप | (१७) | ज्ञान | ,, |
| ९० सात्विक राजस तामस तप | ,, | ९८ सात्विक राजस तामस कर्म | ,, |
| ९१ सात्विक राजस तामस-दान | ,, | ९९ सात्विक राजस तामस कर्ता | ,, |
| ९२ ॐ नामाचें सामर्थ्य | ,, | १०० सात्विक राजस तामस बुद्धि | ,, |
| ९३ काम्य, नैमित्तिक व नित्य कर्में | (१८) | १०१ सात्विक राजस तामस धृति | ,, |
| ९४ तामस, राजस, सात्विक त्याग | ,, | १०२ सात्विक राजस तामस सुख | ,, |
| ९५ इच्छा नसली तरी मनुष्याच्या हातून कर्म घडतेंच | ,, | १०३ ब्राह्मणांचें कर्म | ,, |
| ९६ कर्माचीं पांच कारणें अधिष्ठान, कर्ता, करण (साधनसामुग्री), कार्य दैव | ,, | १०४ क्षत्रिय वैश्य व शूद्र यांचें कर्म | ,, |
| ९७ सात्विक, राजस, तामस | | १०५ विहित कर्माची महती | |
| | | १०६ स्वधर्माचें अनुष्ठान | ,, |
| | | १०७ गीतामहात्म्य | ,, |
| | | १०८ यशप्राप्ति कोणास होते | |

॥ श्रीगणेशाय नमः ॥

## मंगलाचरण.

ओं नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥१॥ देवा तूंचि गणेशु । सकलमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तिदासु ॥ अवधारिजो जी. ॥

# अध्याय पहिला.

### श्लोक शार्दूलविक्रीडित.

॥ गेले कौरव आणि पांडव रणीं वर्णी कथा संजय ॥
॥ ती ऐके धृतराष्ट्र उत्सुख मनें वाटे तया विस्मय ॥
॥ पाहे पार्थ रणीं कुलक्षय घडे चित्तीं विषादा धरी ॥
॥ युद्धापासुनि होउनी विमुख तैं टाकी धनुष्या दुरी ॥१॥

## १ ज्ञानेश्वरीचा अभ्यास कसा करावा ?

जैसे शारदिचिये चंद्रकळे । माजी अमृतकण कोंवळे । तें वेचिती मनें मवाळें। चकोर तलगें ॥ ५६ ॥ तियापरी श्रोता । अनुभववावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ ५७ ॥ हे शब्देंवीण संवादिजे । इंद्रिया नेणतां भोगिजे । बोला आदि झोंबिजे । प्रमेयासी ॥५८॥ जैसे भ्रमर पराग नेती। परी कमलदळें नेणती। तैसीपरी आहे सेविती। ग्रंथीं इये ५९

## २ शूर अर्जुनाची रणांगणावरची स्थिति.

जेणें संग्रामीं हर जिंकिला। निवांत कवचाचा ठाव फेडिला।

तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजी ॥ २०० ॥ जैसें भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें । परि कळिकेमाजीं सांपडे । कोंवाळिये ॥ २०१ ॥ तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणें । तैसें कठिण कोंवळेपणें । स्नेह देखा ॥ २०२ ॥ हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाहि नयेचि आया । म्हणोनि भुलविला ऐकें राया । संजयो म्हणे ॥ २०३ ॥

# अध्याय पहिला सर्वसंग्रह.

ह्मणोनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं । येणें कारणें ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ ४७ ॥ तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोंनी ॥ ७० ॥ तेथ हर ह्मणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्व ॥७१॥ तरी पुत्रस्नेहें मोहित । धृतराष्ट्र असे पुसत । ह्मणे संजया सांगें मात । कुरुक्षेत्रीची ॥ ८५ ॥ ध्वजस्तंभावरी वानरु । तो मूर्तिमंत शंकरु । सारथी शारङ्गधरू । अर्जुनेसी ॥ १४१ ॥

# अध्याय दुसरा.

## श्लोक शा. विक्रि.

॥ झाला अर्जुन शोकमग्न बघुनी वेदान्त सांगे हरी ॥
॥ आत्मा शाश्वत देह नश्वर असें हें ओळखीं अंतरीं ॥
॥ घेईं बाणधनू करीं समर तूं कर्तव्य तें आचरीं ॥
॥ वागें निस्पृह हर्षशोक न धरीं ज्ञानी जनांच्यापरी ॥२॥

## अर्जुनाचा मोह घालविण्याकरितां भगवंताचा उपदेश ( ३ )

हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगें झुंझावेळे सदयता । उचित कायी ॥ ९९ ॥ हें असतिये कीर्तिसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु । ह्मणे जगन्निवासु । अर्जुनातें ॥ २० ॥ कीं तूं एक वधिता । आणि सकळ लोक हा मरता । ऐसी भ्रांति ह्मणे चित्ता । येवों देसी ॥ ९९ ॥ अनादिसिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १०० ॥ परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी । आणि तूंचि नीति सांगसी । आह्मांप्रति ॥ १०१ ॥ देखें विवेकीं जें होती । ते दोहींतेंही न शोचिती । जे होय जाय हे भ्रांति ह्मणोनिया ॥ १०२ ॥ हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येऱ्हवी तत्वता वस्तु जें असे । तें अविनाशचि ॥ १०५ ॥ या उपाधिमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत । तें तत्वज्ञ संतत । स्वीकारिती ॥ १२६ ॥

## ४ विषयाच्या ठिकाणीं इंद्रियांची स्वाभाविक आसक्ति ( ३ )

इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्षशोक उपजती । ते अंतर आप्लविती संगें येणें ॥ ११२ ॥ जया विषयांच्या ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं । तेथ दुःख आणि कांहीं । सुखही दिसे ॥ ११३ ॥ देखें शब्दांची व्याप्ति । निंदा आणि स्तुति । तेथ

द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें ॥ ११४ ॥ या विषयांवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा रम्य नाहीं । ऐसा स्वभावचि पाहीं । इंद्रियांचा ॥ १२० ॥ हे विषय तरी कैसे । रोहिणीचें जळ जैसें । कां स्वप्नींच्या आभासे । भद्रजाती ॥ १२१ ॥ हे विषय जया तें नाकळती । तया सुखदुःखें न पवती । आणि गर्भवास संगती । नाहीं तया ॥ १२३ ॥

## ५ व्यवसायात्मक बुद्धि म्हणजे सुबुद्धि ( २ )

अर्जुना ते पुण्यवशें । जरी अल्पाचि हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषहीं नाशे । संसारभय ॥ २३७ ॥ आणिका सारखा बहुवस । जैसा न जोडे परिस । कां अमृताचा लेश । दैवगुणें ॥ २४० ॥ तैसी दुर्लभ सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । जैसा गंगेसि उदधी । निरंतर ॥ २४१ ॥ तैसें ईश्वरावांचूनि कांहीं । जिथे आणिक ठाहाणें नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ २४२ ॥

## ६ निष्काम कर्म ( २ )

परी कर्मफळीं आस न करावी । आणि अकर्मीं संगती न व्हावी । हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूवीण ॥ २६६ ॥ तूं योगयुक्त होउनी । फळाचा संग टाकुनी । मग अर्जुना चित्त देउनी करीं कर्में ॥ २६७ ॥ परी आदरिलें कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे । तरी विशेषें तेथ तोषावें । हेंही नको ॥२६८॥ कीं निमित्तें कोणें एके । तें सिद्धी न वचताचि ठाके । तरी

तेथिचेनि अपरितोखें । क्षोभावेंना ॥२६९॥ आचरतां सिद्धी गेलें तरी काजाचि कीर आलें । परी ठेलयाहि सगुण झालें । ऐसेंचि मानी ॥२७०॥ देखें जेतुलालें कर्म निपजे । तेतुले आदिपुरुषीं समर्पिजे तरी परिपूर्ण सहजें । जालें जाणें ॥ २७१ ॥

## ७ स्थितप्रज्ञांचीं लक्षणें, ( २ )

नाना दुःखीं प्राप्तीं । जया उद्वेग नाहीं चित्तीं । आणि सुखाचिया आर्ति । अडपीवर्जेना ॥ २९४ ॥ अर्जुना तयाच्या ठायीं । काम क्रोध सहजें नाहीं । आणि भयातें नेणें कहीं परिपूर्ण तो ॥२९५ ॥ ऐसी अनवच्छिन्न समता । भूत मात्रीं सदयता । आणि पालट नाहीं चित्ता कवणे वेळे ॥ २९८ ॥ गोमटे कांहीं पावे । तरी संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ॥ २९९ ॥ ऐसा हरिख शोक रहित । जो आत्म बोध भरित । तो जाणपां प्रज्ञायुक्त । धनुर्धरा ॥३००॥

# अध्याय दुसरा.

## सर्वसंग्रह.

देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हेंवांचूनि केंवि निंदिजे । स्वये वाचा ॥ ३३ ॥ उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे । हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा १५९ श्रोत्रादि इंद्रियें आवरिति । परी रसनें नियम न करिती । ते सहस्रधा कवळिजति । विषयीं इहीं ॥ ३०४ ॥ जेथ काम उपजला । तेथ क्रोध आधीचि आला । क्रोधीं असे ठेविला ।

संमोह जाणे ॥३२२॥ म्हणोनि विषय आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । मग रागद्वेष स्वभावें । नाशतील ॥ ३३१ ॥ म्हणोनि अयुक्तपण मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । या कारणें इंद्रियांचें । दमन कीजे ॥ ३४७ ॥ इंद्रियें जें जें म्हणती । तें तेंचि जे पुरुष करिती । ते तरलेचि न तरती । विषयसिंधु ॥ ३४८ ॥ तैसीं प्राप्तेंहि पुरुषें । इंद्रियें लाविलीं जरी कवतुकें । तरी आक्रमिला जाण दुःखें । सांसारिकें ॥ ३५० ॥

# अध्याय तिसरा.

## श्लोक शिखरिणी.

॥ अगा कर्माहूनी अधिक बरवें ज्ञान म्हणसी ॥
॥ तरी कां तूं येथें मजकडुनि हिंसा करविसी ॥
॥ वदे तैं पार्थाशी यदुपति, करीं कर्म नियतें ॥
॥ फलेच्छा सांडोनी, सहज मग नैष्कर्म्य घडतें ॥ ३ ॥

## मनुष्यप्राण्यांस कर्मत्याग शक्यच नाहीं ( ३ )

जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । अपैसी असे ॥ ५३ ॥ देखें विहित कर्म जेतुलें । तें सगळें जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ॥ ५४ ॥ सांगें श्रवणीं ऐकावें ठेलें । कीं नेत्राचें तेज गेलें । हें नासारंध्र बुझालें ! परिमळ नेघे ॥५५॥ नातरी प्राणापान गती । कीं निर्विकल्प जहाली मती । कीं क्षुधातृषादि आर्ति । कुंठलिया ॥ ५६ ॥ हे स्वप्नावबोध ठेले ।

कीं चरण चालों विसरले । हें असो काय निमाले । जन्म मृत्यु ॥ ५७ ॥ हें न ठकेचि जरी कांहीं । तरी सांडिलें तें कायी । म्हणोनि कर्मत्याग नाहीं । प्रकृतिमंता ॥ ५८ ॥ कर्मे पराधीनपणें । निपजत असे प्रकृतिगुणें । येरीं धरीं मोकलीं अंतःकरणें । वाहिजे वाया ॥ ५९ ॥

## योग्यांचें लक्षण ( ३ )

जो अंतरी दृढ । परात्मरूपीं गूढ । बाह्यांतरी रूढ । लौकिक जैसा ॥ ६८ ॥ तो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥ ६९ ॥ ऐशा चिन्हीं चिन्हित । देखसी तोचि मुक्त । आशापाशरहित । वोळख पा ॥ ७४ ॥ अर्जुना तोचि योगी । विशेषिजे जो जगीं । म्हणोनि ऐसा होय या लागीं । म्हणिपे तूंते ॥ ७५ ॥ तूं मानसां नियम करीं । निश्चळ होये अंतरीं । मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्ततु सुखें ॥ ७६ ॥ म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ ७८ ॥

## स्वधर्माची महती ( ३ )

तुम्हां वर्णविशेषवशें । आम्ही हा स्वधर्मु विहिला असे । यातें उपासा मग अपैसे । पुरती काम ॥ ८८ ॥ तुम्ही व्रतनियम न करावे । शरिरातें न पीडावें । दूरि केंही न वचावें । तीर्थासि गा ॥ ८९ ॥ यागादिकें साधनें । साकांक्ष आराधनें । मंत्र यंत्र विधानें । झणीं करा ॥ ९० ॥ देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें । तुम्ही स्वधर्मयज्ञीं यजावें । अना-

यासें ॥ ९१ ॥ तैसा स्वधर्मरूप मखु । हाचि सेव्य तुम्हां एकू । ऐसें सत्यलोकनायकू ! बोलता झाला ॥ ९३ ॥ देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनु हा होईल । मग प्रजाहो न सांडील । तुमतें कदां ॥ ९४ ॥

## अज्ञानी लोकांच्या चालू कर्मांत अश्रद्धा उत्पन्न करू नये ( ३ )

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहोरे लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥ १७१ ॥ जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्वान्नें केविं जेवी । म्हणोनि बाळकां जैसीं नेदावीं । धनुर्धरा ॥ १७२ ॥ तैसी कर्मीं जयां अयोग्यता । तयाप्रति नैष्कर्म्यता । न प्रगटावी खेळतां । आदिकरुनी ॥ १७३ ॥ कां चंद्राचा उदय जैसा । उपयोगा नव्हे वायसा । मूर्खां विवेक हा तैसा । रुचेलना ॥ १९८ ॥ तैसे जे पार्था । विमुख या परमार्था । तयासी भाषण सर्वथा । करावें ना ॥ १९९ ॥

## इंद्रियाचे लाड न करण्याबद्दल शिकवण ( ३ )

म्हणोनि इंद्रियें एकें । जाणतेनि पुरुखें । लाळावींना कौतुकें । आदि करुनी ॥ २०२ ॥ हांगा सर्पेंसि खेळों येईल । कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल । सांगें हालाहल जिरेल । सेविलिया काई ॥ २०३ ॥ येऱ्हवीं तरी अर्जुना । या शरीरा पराधीना । कां नाना भोगरचना । मेळवावी ॥ २०५ ॥ सर्वस्वें शिणोनि येथें । आर्जवावी संपत्तिजातें । तेणें स्वधर्म सांडुनि देहातें । पोखावें काइ ॥ २०७ ॥ मग हें तंव पांच मेळवा । शेखीं

अनुसरेल पंचत्वा । ते वेळीं केला कें गिंवसावा । शीण आपुला ॥ २०८ ॥ म्हणोनि केवळ देहभरण । ते जाणें उघडी नागवण । यालागीं एथ अंतःकरण । देयावें ना ॥ २०९ ॥

## कामक्रोधवर्णन ( ३ )

तरी हे काम क्रोध पाहीं । जयांतें कृपेची आठवण नाहीं । हे कृतांताच्या ठायीं । मानिजती ॥ २४० ॥ हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषय दरीचे वाघ । भजनमार्गींचे मांग । मारक जे ॥ २४१ ॥ हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । न बोलतां कवळिती । प्राणियांतें ॥ २५७ ॥ हे शस्त्रेंविण साधिती । दोरेंवीण बांधिती । ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेवोनि ॥ २५८ ॥ आधीं यांतें जिणावें । मग तें ज्ञान पावावें । तंव पराभवो न संभवे । रागद्वेषा ॥ १६४ ॥ इयांचा पहिलां कुरुठा इंद्रियें । एथोनि प्रवृत्ति कर्मातें विये । आधीं निर्दळूं घालीं तियें । सर्वथैव ॥ २६८ ॥

# अध्याय तिसरा.

## सर्व-संग्रह

तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखांचा थारा मोडला । जैसा दीपासवें हारपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥ म्हणोनि स्वधर्में जें अर्जे । तें स्वधर्मीचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेंसी ॥ १२५ ॥ मार्गी अंधा सरिसा । पुढें देखणाहि चाले जैसा । अज्ञाना प्रकटावा धर्म तैसा ।

आचरोनी ॥ १५६ ॥ येथ वडील जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती । तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ १५८

# अध्याय चौथा.

## श्लोक ( शिखरिणी )

॥ हराया भूभारा अमित अवतारासि धरितों ॥
विनाशूंनी दुष्टां सतत निजदासां सुखवितों ॥
नियंता मी भूतां समजुनि असें कर्म मजसी ॥
समर्पी तूं कर्मीं मग तिळभरी बद्ध नससी ॥ ४ ॥

## भगवंताचें अर्जुनावरील प्रेम

जें न सांगेचि पितया वसुदेवासी । जें न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेच बंधु बळिभद्रासि । तें गुह्य अर्जुनेंसी बोलत ॥ ८ ॥ देवी लक्ष्मी एवढी जवळिक । तेही न देखे या प्रेमाचें सुख । आजि श्रीकृष्ण प्रेमाचें बिक । यातेंचि आथि ॥ ९ ॥ सनकादिकांचिया आशा । वाढीन्नल्या कीर बहुवसा । परी त्याही येणें मानें यशा । येतीचिना ॥ १० ॥ या जगदीश्वराचें प्रेम । एथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थें येणें सर्वोत्तम ! पुण्य केलें ॥ ११ ॥ येऱ्हवी हा योगिया नाडले । वेदार्थासी नाकळें । जेथ ध्यानाचेहि डोळे । पावतीना ॥ १२ ॥

## कर्मयोग लुप्त होण्याचें कारण (४)

जे प्राणियां कामीं भरु । देहाचि वरी आदरु । म्हणोनि पडिला विसरु । आत्मबोधाचा ॥ २० ॥ पैं चंद्रोदया आरौतें । जयांचे डोळे फुटती असते । ते काउळे केविं चंद्रातें ।

वोळखती ॥ २४ ॥ तैसी वैराग्याची शींव न देखती । जे विवेकाची भाषा नेणती । ते मूर्ख केविं पावती । मज ईश्वरातें ॥ २५ ॥ कैसा नेणों मोह वाढिन्नला । तेणें बहुतेक काळ व्यर्थ गेला । म्हणोनि योग हा लोपला । लोकीं इये ॥ २६ ॥

## संशयग्रस्त मनुष्यास कोठेंच थारा नाहीं. ( ४ )

मग संशयीं जरी पडिला । तरी निभ्रांत जाणें नासला । तो ऐहिक परत्रा मुकला । सुखासि गा ॥ ११९ ॥ तैसें साच आणि लटिकें । विरुद्ध आणि निकें । संशयी तो नोळखे । हिताहित ॥ २०१ ॥ हा रात्रि दिवस पाही । जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं । तैसें संशयीं असतां कांहीं मना नये ॥ २०२ ॥ म्हणोनि संशयाहूनी थोर । आणिक नाहीं पाप घोर । हा विनाशाची वागुर । प्राणियांसी ॥ २०३ ॥

## सद्गुरु शरणागतीवांचून ज्ञान प्राप्ति नाहीं [४]

तें गा ज्ञान पैं बरवें । जरी मनीं आथि आणावें । तरी संतांतें भजावें । सर्वस्वेसी ॥ १६५ ॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंठा । तो स्वाधीन करिती सुभटा । वोळगोनी ॥ १६६ ॥ तरी तन मन जीवें । चरणासि लागावें । आणि अगर्वता करावें । दास्य सकल ॥ १६७ ॥

मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा नये ॥ १६८ ॥ ऐसें ज्ञान प्रकाशें पाहेल । तै मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा ॥ १७१ ॥

### गीताश्रवणाची फलप्राप्ती ( ४ )

तैसें कथेचें इये आइकणें । एक श्रवणासी होय पारणें । आणि संसारदुःख मूळवणें । विकृतीविणें ॥२२२॥ जरी मंत्रेंचि वैरी मरे । तरी वायां कां बांधावे कटारे । रोग जाय दूधसाखरें तरी निंब कां प्यावा ॥ २२३ ॥ तेसा मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजी ॥ २२४ ॥

## अध्याय चौथा.

### सर्वसंग्रह

तूं संसारश्रांताची साउली । अनाथजीवांची माउली । आमुतें कीर प्रसवली । तुझीची कृपा ॥ ३३ ॥ ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकारु होउनी अवतरें । मग अज्ञानाचें आंधारें । गिळोनि घालीं ॥ ५१ ॥ येऱ्हवी तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं । भजती तयां मीही । तैसाचि भजें ॥ ६६ ॥ जैसा का जळापाशीं उभा ठाके । तो जरी आपणपें जळामाजीं देखे । तरी तो निभ्रांत ओळखे । म्हणे मी वेगळा आहें ॥ ९६ ॥ जया ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई । म्हणोनि असो हे गोष्टी पाहीं । पांडुकुमरा ॥ १५५ ॥ मग संशयीं जरी पडला । तरी निभ्रांत जाणें नासला । तो ऐहिक परवा मुकला । सुखासि गा ॥ १९९ ॥

# अध्याय पांचवा.

## श्लोक शिखरिणी

॥ करी सारी कर्मे विहित निरहंकार असुनी ॥
॥ त्यजी प्रेमद्वेषां धरुनि ममता जो निशिदिनीं ॥
॥ जया चित्ता नाहीं पुढिल अथवा मागिल मनीं ॥
॥ खरा तो संन्यासी स्थिरमतिहि संकल्प सुटुनी ॥ ५ ॥

## कर्मसंन्यास

तरी गेलियाची से न करी । न पवतां चाड न धरी । जो सुनिश्चळ अंतरीं । मेरु जैसा ॥ १९ ॥ आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ २० ॥ जो मनें ऐसा जाला । संगीं तोचि सांडिला । म्हणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ २१ ॥ आतां गृहादिक आघवें । तें कांहीं नलगे त्यजावें । जें घेतें जालें स्वभावें । निःसंग म्हणोनी ॥ २२ ॥ देखें अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळ होये । तैं ते कापुसें गिवसुंये । जियापरी ॥ २३ ॥ तैसा असतेनि उपाधी । नाकळिजे तो कर्मबंधीं । जयाचिये बुद्धि । संकल्प नाहीं ॥ २४ ॥ म्हणोनि कल्पना जै सांडे । तैंचि गा संन्यास घडे । इये कारणें दोनी सांगडे । संन्यासु योग ॥ २५ ॥

## योगी लक्षण (५)

जे पार्था तया देहीं । मी ऐसा आठवू नाहीं । तरी कर्तृत्व

कैचें काई । उरे सांगें ॥ ३८ ॥ ऐसें तनुत्यागें वीण । अमूर्ताचे गुण । दिसती संपूर्ण । योगयुक्ता ॥ ३९ ॥ येऱ्हवी आणिकांचिये परी । तोही एक शरीरी । अशेषाही व्यापारीं । वर्तत दिसे ॥ ४० ॥ तोही नेत्रीं पाहे । श्रवणीं ऐकत आहे । परी तेथिचा सर्वथा नोहे । नवल देखें ॥ ४३ ॥ पार्था तयाचे ठायीं । हें आघवेंचि आथी पाहीं । परि तो कर्ता नव्हे कांहीं । प्रतीति बळें ॥ ४६ ॥

## विषयसुखभ्रांति [ ५ ]

येऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे । तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगा माजी ॥ ११३ ॥ म्हणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे । जैसें मद्दुर कां म्हणिजे । विषकंदातें ॥ ११५ ॥ नातरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु । तैसा सुखप्रवाद बरळु । विषयिकु हा ॥ ११६ ॥ हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली । ते शीतल होईल केतुली मूषकासी ॥ ११७ ॥ जैसा आमिषकवल पांडवा । मीनु न सेवी तंवचि बरवा । तैसा विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणें ॥ ११७ ॥ म्हणोनि विषयभोगीं जें सुख । तें सांचताचि जाण दुःख । परी काय करिती मूर्ख । न सेवितां न सरे ॥ ११९ ॥ ते अंतर नेणती बापुडे । म्हणोनि अगत्य सेवणें वडे । सांगें पूयपंकीचे किडे । काय चिळसी घेती ॥ १२१ ॥

# अध्याय पांचवा.

## सर्वसंग्रह

देखा कामधेनु ऐसी माये। सदैवा जया होये। तो चंद्रही परी लाहे। खेळावया ॥ १० ॥ पाहें पा श्रीशंभूची प्रसन्नता। तया उपमन्युचिया आर्ता। काय क्षीराब्धि दूधभाता। देइजेचिना ॥११॥ तैसा औदार्याचा कुरठा। श्रीकृष्ण आपु जालिया सुभटा। कां सर्व सुखाचा वसौटा। तोचि नोहावा ॥ १२ ॥ अगा कर्तनत्रीण कर्म। तेंचि तें निष्कर्म। हें जाणती सुवर्म। गुरुगम्य जे ॥ ६३ ॥ सांगें कुमुददळाचेनि ताटे। जो जेविला चंद्रकिरणें चोखटें। तो चकोर कायि वाळुवंटे। चुंबित असे ॥१०७॥ अर्जुना तूं परिसस्ी। परिसोनि अनुष्ठिसी। तरी आम्हासीचि वाणी कायसी। सांगायाची ॥ १६९ ॥

# अध्याय सहावा.

## श्लोक शार्दू. विक्री.

॥ चित्ताचा सखया निरोध करणें तो योग मानीं खरा ॥
॥ हा मी हा पर भेद हा कधिं नसे चित्तीं मुळीं ज्या नरा॥
॥ जो सप्रेम सदा भजे मज तसा जो सर्वभूतीं सम ॥
॥ ठेवी मद्गत चित्त त्याहुनि दुजा योगी नसे उत्तम ॥६॥

## वृथादेहाभिमाना मुळें बद्धता—( ६ )

म्हणोनि आपणचि आपणयां। घात कीजत असे धनंजया। चित्त देऊनि नाथिलिया। देहाभिमाना ॥ ७० ॥ हा

विचारुनि अहंकार सांडिजे । मग असतीचि वस्तु होइंजे । तरी आपली स्वस्ति सहजें । आपण केली ॥ ७१ ॥ येऱ्हवी कोशकीटकाचियापरी । तो आपणया आपण वैरी । जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थळीं ॥७२॥ कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा आंधळेपणाचे डोहळे । कीं असते आपुले डोळे । आपण झांकी ॥ ७३ ॥ कां कवण एक भ्रमलेपणे । मीं तो नव्हे गा चोरलों म्हणे । ऐसा नाथिला छंद अंतःकरणें । घेऊनि ठाके ॥७४॥ येरवीं होय तें तोचि आहे । परि काइ कीजे बुद्धि तैसी नोहे । देखा स्वप्नीचेनि घायें । कीं मरे साचें ॥ ७५ ॥ जैसी ते चुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली येरी मोहरें । तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥७६॥ वायांचि मान पिळी । अटुवे हियें आवळीं । टिटांतु नळी । धरूनि ठाके ॥ ७७ ॥ म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडां । कीं मोकाळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ॥७८॥ ऐसा काजेंविण आतुडला । तो सांग पां काय आणिकें बांधिला । मग न सोडी च जऱ्ही नेला । तोडुनि अर्धा ॥९७॥ म्हणोनि आपणया आपणचि रिपू । जेणें वाढविला हा संकल्पु । येर स्वयंबुद्धि म्हणे बापु । जो नाथिलें नेघे ॥ ८० ॥

## साधकांचें आचरण [ ६ ]

म्हणोनि अतिशयें विषय सेवावा । ऐसा बोध नोहावा । कां सर्वथा निरोधावा । हेंहि नको ॥ ३४८ ॥ आहार तरी सेविजे । परि युक्तीचेनि मापें मविजे ॥ क्रियाजात आचरिजे ।

तयाचि स्थिति ॥ ३४९ ॥ मापितला बोल बोलिजे । मितलिया पाउलीं चालिजे । निद्रेही मान दिजे । अवसरें ऐकें ॥ ३५० ॥ जागणें जरी आलें । तरी व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य संचलें । असेल सुख ॥ ३५१ ॥ ऐसें युक्तिचेनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें । तैं संतोषासि वाढतें । मनचि करा ॥ ३५२ ॥

## चंचल मन ताळ्यावर आणण्याचा उपाय ( ६ )

हें मन कसें केवढें । ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे । येऱ्हवीं राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया ॥ ४२१ ॥ तंव श्रीकृष्ण म्हणती साचाचि । बोलत आहासि तें तैसेंचि ॥ यया मनाचा कीर चपळचि । स्वभावो गा ॥ ४१८ ॥ परि वैराग्याचेनि आधारें । जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरे । तरी केतुलेनि एकें अवसरें । स्थिरावेल ॥ ४१९ ॥ कां जे यया मनाचे एक निकें । जें देखिलें गोडिचिया ठाया सोके । म्हणोनि अनुभवसुखाचीं कौतुकें । दावीत जाइजे ॥ ४२० ॥ म्हणोनि मनाचानिग्रह होये । ऐसा उपाय जो आहे । तो आरंभीं मग नोहे । कैसा पाहों ॥ ४२४ ॥

# अध्याय सहावा.

## सर्वसंग्रह

आतां आत्म प्रभा नित्य नवीं । तेचि करूनि ठाणदिवीं । जो इंद्रियांतें चोरुनि जेवि । तयासीचि फावे ॥ २३ ॥ आइका यशस्वी औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य ।

वसती जेथ ॥ ३७ ॥ म्हणोनि तो भगवंतु । जो निःसंगाचा सांगातु । तो म्हणे पार्था दत्त चित्तु । होई आतां ॥ ३८ ॥ गृहस्थाश्रमाचें वोझें । कपाळीं आधींचि आहे सहजें । कीं तेचि संन्यास सेवा ठविजे । सरिसे पुढति ॥ ५६ ॥ म्हणोनि अग्निसेवा न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता ॥ आपणपांची ॥ ५१ ॥ जैसा किडाळाचा दोष जाये । तरि पंधरे तेंचि होये । तैसे जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपी ॥८२॥ देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला । शेखीं उपेगा गेला । पांडवांसी ॥१३७॥ तूं प्राप्तीची चाड वाहसी । परि अभ्यासीं दक्ष न होसी । ते सांग पां काय बिहसी । दुवाडपणें ॥ ३६० ॥ ऐसें हितासी जे जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखें । येऱ्हवीं सोपे योगासारिखें कांहीं आहे ॥ ३६३ ॥ इंद्रियग्रामोनि निघाला । आस्थेचिये वाटे लागला । आत्मसिद्धीचिया पुढिला । नगरा यावया ॥ ४१२ ॥ येऱ्हवीं अभ्यासाचा उचलता । पाउली जरी चालता । तरी दिवसा आधीं टाकितां ॥ सोहं सिद्धांते ॥ ४३९ ॥ ऐसी निजपुण्याची जोडी । वाढिन्नली सर्व सुखाची कुळवाडी । तियें जन्में तो सुरवाडी । योगच्युत ॥ ४४८ ॥ जे विवेकद्रुमाचें मुळीं । बैसले आहाति नित्यफळीं । तयां ।योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥४५१॥ परि ते मनाच्या कानीं ऐकावें । बोले बुद्धीच्या डोळां देखावें । हे साटोवाटीं घ्यावें । चित्ताचिया ॥४९४॥ परि अवश्यक पांडवा । ऐसा ठाव जोडावा । तेथ निगूढ मठ

होआवा ॥ कां शिवालय ॥ १७९ ॥ वरी चोखट मृगसेवडी । माजी धूतवस्त्राची घडी तळवटी अमोडी । कुशांकुर ॥१८२॥

# अध्याय सातवा.

## श्लोक शा. विक्री.

॥ माझ्या केवळ जाहली प्रकृति।न ही सृष्टिच सारी असे ॥ पृथ्वी मीचि सुगंध मीच रस मी तो यांत पार्था वसे ॥सर्वांतर्गत मी परी नुमजती कीं ग्रस्त मायाबळें ॥ जे चित्तीं मज चिंतिती सतत ते तापत्रया वेगळे ॥ ७ ॥

## २५ जीव ब्रह्माचा अंश असून त्याचा विसर पडण्याचें कारण ( ७ )

हें असो डोळ्यांचें । डोळांचि पडळ रचे । तेणें देखणेंपण न गिळिजे काई ॥ ६२ ॥ तैसी हे माझीच । विलंबी । त्रिगुणात्मक साउली । कीं मजचि आडवोडवली । माझींच परी मी नव्हतां । जैसीं जळींचीं न विरतीं । मुक्ताफळें ॥ ६४ ॥ तैसें भूतजात सर्व । हे माझेचि कीर अवयव । परि माया योगें जीव दशें आले ॥ ६६ ॥ ह्मणोनि माझेचि मी नव्हती । माझेचि मज नोळखती । अहंममता भ्रांति ॥ विषयांध जाले ॥ ६७ ॥

## २६ मायानदीचें वर्णन (७)

तमाचे धारसे वाड ॥ सत्वाचें स्थिरपण जाड । किंबहुना हे दुवाड. मायानदी ॥ ७९ ॥ पै पुनरावृत्तींचेनि उभडें ।

झळंवती सत्यलोकीचें हूडे । धावें गडबडती धोंडे । ब्रह्मगोकळाचें ॥ ८० ॥ तया पाणियाचे निवहिलेपणें । अझुनी न धरती बोभाणें । ऐसा मायापूर कवणें । तरिजेल गा ॥ ८१ ॥ ऐथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो । तो तो अपावो । होय तें ऐक ॥ ८२ ॥ जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तागा न लगे । वरी कांहीं तरोंये योगें । तरी विपायें तो ॥ ९१ ॥ म्हणोनि गा पांडुसुता । जैसी सकामा न जिणवेचि वनिता । तेंवी मायामय हे सरिता । न तरवे जीवा ॥ ९६ ॥ येथ एकाचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तयां ऐलीच थडी सरलें । माया जळ ॥ ९७ ॥ जया सद्गुरु तारुं फुडे । जे अनुभवाचे कासे गाढे । जया आत्मनिवेदन तरांडे । आकळलें ॥ ९८ ॥

# अध्याय सातवा.

## सर्व-संग्रह

आप तेज गगन । मही मारुत मन । बुद्धि अहंकार हे भिन्न । आठै भाग ॥ १८ ॥ या आठांची जे साम्यावस्था । ते माझी परम प्रकृती पार्था । तिये नाम अवस्था । जीव ऐसी ॥ १९ ॥ जे जगातें जीववी । चेतनेतें चेतवी । मनाकरवीं मारवी । शोक मोहो ॥ २० ॥

सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुतीं वोविलें । तैसें म्या जग धरिलें । सबाह्याभ्यंतरीं ॥ ३२ ॥ येर तनुमन प्राणीं । जे अनुसरले माझेयाचि वाहाणी । ते देहाच्या

निर्वाणीं । मीचि होती ॥ १५० ॥ तैसा फलहेतूचा पांजरा । सांडुनियां धनुर्धरा कां । प्रतीतिपाखीं चिदंबरा । गोसाविया नोहावें ॥ १५४ ॥ तैसी जाणिव जेथ न रिगे । विचार मागुता पाउलीं निघे । तर्क आयणी निघे । आंगीं जयाच्या । ५ ॥ अर्जुना तया नांव ज्ञान । येर प्रपंच हें विज्ञान । तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंहि जाण ॥ ६ ॥ तेथ आर्तु तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावया लागिं भजे । तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ ११० ॥ मग चौथियाच्या ठायीं । कांहींच करणें नाहीं । म्हणोनि भक्तु एक पाहीं । ज्ञानिया जो ॥ १११ ॥ हें समस्तही श्रीवासुदेव । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भाव । म्हणोनि भक्तांमाजि राव । आणि ज्ञानिया तोचि ॥ ११३ ॥

# अध्याय आठवा.

**श्लोक शिखरिणी.**

सदा ध्यावी मातें हृदयकमळीं जे स्थिर मनें ॥
तयां मीं देहासी सुख अमित देतों हरि म्हणे ॥
तरी पार्था माझें निशदिनि करी ध्यान भजन ॥
मिळुनी मद्रूपीं मग चुकविसी जन्ममरण ॥ ८ ॥

## अधिभूत, अधिदैवत, अधियज्ञ ( ८ )

तैसे असतेपण आहाच । नाहीं होइजे हें साच । जयातें

रूपा आणिती पांच पांच । मिळोनिया ॥ ३१ ॥ भूतांतें अधिकरूनि असें । आणि भूतसंयोगें तरी दिसें । जें वियोग वेळे भ्रंशें । नामरूपादिक ॥ ३२ ॥ तयातें अधिभूत म्हणिजे । मग अधिदैवत पुरुष जाणिजे । तेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें ॥३३॥ जीव येणें नांवें । जयातें आळविजे स्वभावें । तें अधिदैवत जाणावें । पंचायतनीचें ॥ ३६ ॥ आतां इयेचि शरीरग्रामीं । जो शरीरभावातें उपशमी । तो अधियज्ञ एथ गा मीं । पांडुकुमरा ॥ ३७ ॥ येर अधिदैवाधिभूत । तेंहि मीचि कीर समस्त । तरी पंधरें किडाळा मिळत । तें काय साकें नोहे ॥ ३८॥ तैसें अधिभूतादि आघवें । हें अविद्येचेनि पालवें । झांकलें तंव मानावें । वेगळें ऐसें ॥ ४० ॥

## अंतकाळच्या स्मृतीप्रमाणें गती :( ८ )

आतां उभया उभेपण नाहीं जयाचें । मा पडिलिया गहन कवण तयाचें । म्हणोनि प्रतीतीचिये पोटींचें । पाणी न हाले ॥ ६३ ॥ पै अथावीं घट बुडाला । तो आंत बाहेरी उदकें भरला । पाठीं दैवगत्या जरी फुटला । तरी उदक काय फुटे ॥ ६५ ॥ म्हणोनि यापरी मातें । अंतकाळीं जाणत सातें । जे मोकळिती देहातें । ते मीचि होती ॥ ६८ ॥ येऱ्हवी तरी साधारण । उरीं आदळलिया मरण । जो आठव धरी अंतःकरण । तेंचि होइजे ॥ ६९ ॥ तेवी मृत्युचेनि अवसरें एकें । जें येऊनि जिवासमोर ठाके । तें होणें मग न चुकें । भलतया

परी ॥ ७२ ॥ आणि मरणीं जया जें आठवे । तो तेचि गतीतें पावें । म्हणोनि सदां स्मरावें ! मातोंचि तुवा ॥ ७५ ॥ तूं मन बुद्धि साचेंसी । जरी माझ्या स्वरूपीं अर्पिसी । तरी मातेंचि गा पावसी । हे माझी भाक ॥ ७९ ॥

## [ २९ ] नित्य स्मरण करणाऱ्या पुरुषाला परमात्मा सुलभ आहे. [ ८ ]

ऐसें निरंतर एकवटलें । जे अंतःकरणीं मजसीं लिगटले मीचि होऊनि आंतले । उपासिती ॥ १२६ ॥ तयां देहावसान जैं पावें । तैं तीहीं माते स्मरावें । मग म्यां जरी पावावे । तरि उपास्ति ते कायसी ॥१२७ ॥ पै रंकु एक अडलेंपणें । काकुळती धांव गा धांव ह्मणे । तरि तयाचिये ग्लानी धांवणें। काय न घडे मज ॥ १२८ ॥ तिहीं जे वेळीं मी स्मरावा । ते वेळीं स्मरला कीं पावावा । तो आभारही जीवां । साहवेचिना ॥ १३० ॥ म्हणोनिया देहांतिंचें सांकडें । माझिया काहींचि नपडे । मी आपुलियातें आपुलीकडे । सुखेंचि आणी ॥ १३४ ॥

## [३०] अंतकाळाचा अर्चिरादि मार्ग [८]

आतु अग्निज्योतीचा प्रकाशू । बाहेरी शुक्लपक्ष आणि दिवसू । आणि सामासांमाजि मासू । उत्तरायण ॥ २२० ॥ ऐसिया सम योगाची निरुति । लाहोनि जे देह ठेविती । ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ॥ २२१ ॥ हा उत्तम काळ जाणिजे । यातें अर्चिरादि मार्ग ह्मणिजे । आतां अकाळ तोही सहजें ।

सांगनें आईक ॥ २२५ ॥ तरि प्रयाणाचिया अवसरें । वात-श्लेष्मा सभरें । तेणें अंतःकरणीं आंधारें । कोंदलें ठाके॥२२६॥ सर्वेंद्रिया लाकुड पडे । स्मृति श्रमामाजि बुडे । मन होय वेडे । कोंडे प्राण ॥२२७॥ अग्नीचें अग्निपण जाये । मग तो धूमचि अवघा होये । तेणें चेतना गिवसिली ठाये । शरीरीची॥२२८॥ कां मरेना सावध । ऐसें जीवितासी पडे स्तब्ध । आयुष्य मरणाची मर्याद । वेळ ठाकी ॥ २३० ॥ आम्हीं अकाळ जो पांडवा । ह्मणितला तो हा जाणावा । आणि हाचि धूम्रमार्ग गांवा । पुनरावृत्तीचिया ॥ २३५ ॥

# अध्याय नववा.

## श्लोक शा. विक्री.

॥ भक्तीनें जल पत्र पुष्प फल कीं कांहीं दुजें अर्पिलें ॥
॥ ते मातें प्रिय,तेविं जे नर सदा मत्कीर्तनीं रंगले॥
॥ पार्था ! तें मुख धन्य ज्या मुखिं वसे मन्नामसंकीर्तन ॥
॥ विष्णो कृष्ण मुकुंद माधवहरे गोविंद नारायण ॥ ९ ॥

## [३१] श्रद्धाहीन जनाची स्थिति [ ९ ]

पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदर आड । परितें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवि ॥५७ ॥ कां कमलकंदा आणि दर्दुरी । नांदणूक एकेचि घरीं । परि पराग सेविजे भ्रमरीं । येरां चिखलचि उरे ॥५८॥ नातरी निदैवाच्या परिवरीं । लोह्या रुतालिया आहाति सहस्रवरी । परि तेथ

बसूनि उपवास करी । कां दरिद्रें जिये ॥५९॥ तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्व सुखांचा आरामु । कीं भ्रांतासि कामु । विषयांवरी ॥६०॥ बहु मृगजळ देखोनि डोळां । थुंकिजे अमृत गिळितां गळाळा । तोडिला परिस बांधिला गळा । शुक्तिका लाभे॥ ६१ ॥ तैसी अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडी । ह्मणोनि जन्ममरणाचिये दुथडीं । डहूळितें ठेलीं॥६२॥ येऱ्हवीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । कैंही नसे न दिसें ऐसा । वाणीचा नोहें ॥६३॥

## ३२ ईश्वराच्या अधिष्ठानावर मायेची उलाढाल [ ९ ]

तरी हेंचि प्रकृती किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्टीं । तेथ तंतु समवाय पटीं । जेवि विणावणी दिसें ॥ १०६ ॥ मग तिथें विणावणीचे जोंनि आधारें । लाहाना चौकडिया पटत्व भरें । तैसी पंचात्मकें आकारें । प्रकृतीचि होय ॥१०७॥ जैसें विरजणियांचेंनि संगे । दूधचि आटे लागे । तैसी प्रकृति आंगा रिगे । सृष्टिपणाचिया ॥ १०८ ॥ आगड् नगर हें रायें केलें । या म्हणणया साचपण कीर आलें । परि निरुते पाहतां काय शिणले । रायाचे हात ॥ ११० ॥ जैसी रायें अधिष्ठिली प्रजा । व्यापारे आपुलिया काजा । तैसा प्रकृतिसंग माझा । येर करणें तें इयेचें ॥ ११४ ॥ किंबहुना यापरी । मी निज प्रकृति अंगिकारी । आणि भूतसृष्टि एकसरी । प्रसवोंचि लागे ॥ ११७ ॥ म्हणोनि भूतें हन सृजावीं । कां सृजिलीं प्रतिपाळावीं । इयें करणीं न येति

आघवीं । आमुचिया आंगा ॥ १२२ ॥ जैसा दीपु ठेविला परिवरीं । कवणातें नियमीं ना निवारी । आणि कवण कव-णिये व्यापारीं । राहाटे तेंहि नेणे ॥ १२८ ॥ तो जैसा कां साधिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिहेतु । तैसा भूतकर्मीं आसक्तु । मी भूतीं असें ॥ १२९ ॥ आतां येणें उजियेडें निरुतें । न्याहाळीं पां ऐश्वर्य योगातें । जें माझ्या ठायीं भूतें । परी भूतीं मी नसें ॥ १३३ ॥ अथवा भूतें माझ्या ठायीं । आणि भूतांमाजि मी नाहीं । या खुणा तूं कहीं । चुको नको ॥ १३४ ॥

## परमेश्वराच्या नामाचा महिमा. ( ९ )

तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चि-त्तांचे । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ १९७ ॥ यमदमा अवकाळा आणिली । तीर्थें ठायावरोनि उठविलीं । यमलोकींची खुंटली । राहाटी आघवी ॥ १९८ ॥ यमु म्हणे काय यमावें । दमु म्हणें कवणातें दमावें । तीर्थें म्हणती काय खावें । दोष औषधासि नाहीं ॥ १९९॥ ऐसें माझेनि नामघोषें । नाहींच करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥ परि राया रंका पाड धरूं । नेणती सानेया थारां कडसणी करूं । एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा ॥२०२॥ कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोषगौरवें । धवळलें विश्व ॥२०३॥ जयाचे वाचे पुढां भोजें । अखंड

नाम नाचत असें माझें । जें जन्मसहस्त्रीं बोळगिजे । एकवेळ यावया ॥ २०६ ॥ तो मीं वैकुंठी नसें । वेळ एक भानु बिंबीही न दिसें । वरी योगियांचीहि मानसें । उमरडोनि जाय ॥ २०७ ॥ परि तयापासीं पांडवा । मी हारपला गिवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ २०८ ॥ कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचें निखिल प्रबंध । माजी आत्मचर्या विशद । उदंड गाती ॥ २१० ॥

## ३४ परमेश्वराचें सामर्थ्य. (९)

तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि गा एथ पंडुसुता । मी गोसावी समस्तां । त्रैलोक्याचा ॥ २८० ॥ आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नांवभरी उगें नसावें । पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥ २८१ ॥ पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी । पृथ्वीया भुतें वाहावी । हे आज्ञा माझी ॥ २८२ ॥ म्या बोलविल्या वेद बोले । म्या चालविल्या सूर्य चाले । म्या हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळिता ॥ २८३ ॥ मियाचि नियमिला सांता । काळ ग्रासितसे भूतां । इयें म्हणियागतें पांडुसुता । सकळ जयाची ॥ २८४ ॥ जो ऐसा समर्थु । तो मी जगाचा नाथु । आणि गगनाऐसा साक्षिभूतु तोहि मीचि ॥ २८५ ॥ जो मज होय अनन्य शरण । त्याचें निवारीं मी जन्ममरण । यालागीं शरणागता शरण्य । मीचि एकू ॥ २८८ ॥ ह्मणोनि अर्जुना मी नसें । ऐसा कवण ठाव असे । परि प्राणियांचें दैव कैसें । जे न देखती मातें ॥ ३०० ॥

तरंग पाणियेवीण सुकती । रश्मि वातीवीण न देखती । तैसें मीचि ते मी नोहती । विस्मो देखें ॥ ३०१ ॥ हें आंत बाहेर मिया कोंदलें । जग निखिल माझेंचि वोतिलें । कीं कैसें कर्म तयां आड आलें । जे मीचि नाहीं ह्मणती ॥ ३०२ ॥

## ३५ स्वर्ग सुखानंतर मृत्युलोकीं पुनरागमन (९.)

मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेचि इंद्रपणाची उटी उतरे । आणि येऊं लागती माघारें । मृत्यु लोकां ॥ ३२८ ॥ जैसा वेश्या भोगी कवडा वेंचे । मग दारही चेपूं नये तियेचें । तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काय सांगों ॥ ३२० ॥ अर्जुना वेदविद जरी जाला । तरि मातें नेणतां वाया वेला । कण सांडोनि उपणिला । कोंडा जैसा ॥ ३३३ ॥ म्हणोनि मज एकेंवीण । हे त्रयिधर्म अकारण । आतां मातें जाणोनि कांहीं नेण । तूं सुखिया होसी ॥ ३३४ ॥

## अनन्यभक्तांचें परमेश्वर चालवितो. (९)

ऐसें अनन्य गतिकें चित्तें । चिंतितसांते मातें । जे उपासिती तयातें । मींचि सेवीं ॥३३७॥ ते एकवटूनि जिये क्षणीं अनुसरले गा माझिये वाहणीं । तेव्हांचि तयांची चिंतवणी । मजचि पडली ॥ ३३८ ॥ मग तिहीं जें जें करावें । तें मजचि पडिलें आघवें । जैसी अजात पक्षांचेनि जिवें । पाक्षिणी जिये ॥ ३३९ ॥ आपुली तान्हभूक नेणें । तान्हया निकें तें माउलीसीचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें । तयांचें सर्व मी करीं ॥ ३४० ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडिला

पांडवा । जयांचिया सर्व भावा । आश्रय मी ॥ ३४३ ॥

## परमेश्वरास सप्रेम अर्पण [ ९ ]

मग निःसीम भाव उल्हासें । मज अर्पावयाचेनिमिसें । फळ ऐक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ ३८२ ॥ भक्त माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवीं । मग देठ न फेडितां सेवीं आदरेंसीं ॥ ३८३ ॥ पैं गा भक्तिचेनि नांवें । फ़ुल एक मज द्यावें । तें लेखें तरी म्यां तुरंबावें । परी मुखींचि घाली ॥ ३८४ ॥ हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जालें । तें साजुकही नहो सुकलें । भलतैसें ॥ ३८५ ॥ अथवा ऐसेंही एक घडे । जे पाहाली परी न जोडे । तजि उदकाचें तंव सांकडें । नव्हैल कीं ॥ ३८६ ॥ तें भलतेथ निमोले । जोडितां आहे जोडिलें । तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें न हें सांगावें हें सांगावें काय कीरिटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठीं । मी सुदामयाचिया सोडीं गांठी । पव्हयासाठीं ॥ ३९४ ॥ पै भक्ति एकी मी जाणें । तेथ साने थोर न म्हणें । आम्हीं भावाचे पाहुणे । भलतेया ॥ ३९५ ॥ येर पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचा लाग निष्फळ । भक्तितत्व ॥ ३९६ ॥

## परमेश्वरभक्तीवांचून व्यर्थ जिणें (९)

कणेंवीण सोपटे । कणसें लागलीं घनदाटें । काय करावें गोमटें । वोस नगर ॥ ४३३ ॥ तैसे माझिये भक्तीविण । जळो

दूध गूढ। परि थानासीची नव्हे कीं गोड। म्हणोनि सरो का सेवितयाची चाड। जरी अनन्य मिळे॥ ३८॥ या लागी सुमन आणि शुद्धमती। जो अनिंदक अनन्यगती। पै गा गौप्यही परि तयाप्रति। चावळिजे सुखें॥ ४०॥ जे ज्ञान-गंगे नाहाले। पूर्णता जेऊनि धाले। जे शांतीसि जाले। पल्लव नवे॥ १९०॥ अखंड सकळ हें सकळां मुखीं। सहज अर्पत असे मज एकीं। कीं नेणणेंयासाठीं मूखीं। न पविजेचि मातें॥ ९६४॥ जैसें कल्पतरु तळवटीं। बैसोनि झोळिये देतसे गांठी। मग निदैव निघे कीरिटीं। दैन्यचि करूं॥ ३११॥ स्वर्गा पु-ण्यात्मकें पापें येइजे। पापात्मकें पापें नरका जाइजे। मग मातें जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य॥ ३१६॥ तेथ रसे जा मुखेंचि सेवावा। परिमळ तो घ्राणेंचि घ्यावा। तैसा मी तो यजावा। मीचि म्हणोनी॥ ३४२॥ अर्जुना माझे ठायीं। आपणपेंवीण सौरसु नाहीं! मी उपचारें कवणाही। नाकळें गा॥ ३६७॥ म्हणोनि थोरपणा पऱ्हां सांडिजे। एथ व्युत्पत्ति आघवी विस-रिजे। जैं जगा धाकुटें होईजे। तैं जवळीक माझी॥ ३७८॥ म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये-श्रवणीं। केवीं सुखनिद्रा आंथरुणीं। इंगळाच्या॥ ५०१॥ दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा। कीं तो मासिया वेटाळीं जिभा। तैसे प्राणिये कवणें लोभा। वाढविती तृष्णा॥ ५१४॥

—:o:—

# अध्याय दहावा

## नमन.

नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा । पराप्रमेय प्रमदा । विलासिया ॥ १ ॥ नमो संसारतमसूर्या । अपरिमित परमवीर्या । तरुणतर सूर्या । लालनलीला ॥ २ ॥ नमो जगद-खिलपालना । मंगळमाणिनिधाना । सज्जनवनचंदना । आराध्य लिंगा ॥ ३ ॥ नमो चतुरचित्तचकोरचंद्रा । आत्मानुभवनरेंद्रा । श्रुतिसारसमुद्रा । मन्मथमन्मथा ॥ ४ ॥ नमो सुभाव भजना भवेभकुंभभंजना । विश्वोद्भवभुवना । श्रीगुरुराया ॥ ५ ॥ तुमचा अनुग्रहो गणेशु । जै आपुला दे सौरसु । तै सारस्वतीं प्रवेशु । बाळकाही आथी ॥ ६ ॥ हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकर माथां पारुखे । तो जीवचि परि तुके । महेशेंसीं ॥ ९ ॥

# अध्याय दहावा.

## श्लोक

॥ कोठें देवासि चिंतूं जरि म्हणसि असें ऐक माझ्या विभूती ॥
॥ संक्षेपें अर्जुना हें तुज गुज कथितों मी असें सर्व भूतीं ॥
॥ मी धाता विष्णु मी श्रीशिव रवि निगमीं साम मी विश्वरूप ॥
॥ माझी सर्वत्र सत्ता जगीं असुनि असे दिव्य माझें स्वरूप ॥ १० ॥

## परमेश्वरापासून जगदुत्पत्ति. ( १० )

तैसें मीं एकचि पहिलें । मग मी तेंचि मनातें व्यालें । तेथ सप्तऋषी आणि जाले । चारी मनु ॥ १०१ ॥ इहीं लोक-

पाळ केले । लोकपाळीं विविध लोक स्रजिले । लोकांपासूनि निपजले । प्रजाजात ॥ १०२ ॥ ऐसेनि हें विश्व येथें । मीचि विस्तारिलेंसें निरुतें । परि भावाचेनि हातें । मानें जया॥१०३॥ म्हणोनि गा यापरी । ब्रह्मादि पिपीलिकावरी । मीवांचूनि दुसरी । गोठी नाहीं ॥ १०५ ॥

# अध्याय दहावा.

## सर्वसंग्रह.

घटीं थोडेंसें उदक घालिजे । तेणें न गळे तरी वरिता भरिजे । ऐसा परिसोनि पाहिलासी तंव परिसविजे । ऐसेंचि होतसें ॥ ५१ ॥ जैसें बाळका लेवविजे लेणें । तें शृंगारातें काई जाणें । परि तें सुखाचें सोहळे भोगणें । माउलिये दिठी ॥ ५८ ॥ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ ११८ ॥ जैसी कमलकाळिका जालेपणें । हृदयींच्या मकरंदातें राखों नेणें । दे राया रंका पारणें । आमोदाचे ॥ १२७ ॥ तैसेंचि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत । मग तया विसरामाजि विरत । आंगे जीवें ॥ १२८ ॥ विषयविषाचा परिपाडु । गोड परमार्थ लागे कडु । कडू विषय तो गोडु जीवासि जाला ॥ १५९ ॥ म्हणोनि भाग्य जैं सानुकूळ । जालिया केलें उद्यम सदा सफळ तैसें श्रुताधीत सकळ । गुरुकृपा साच ॥ १६८ ॥ आंगीचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती । तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ॥ २१० ॥ इंद्रियामाजि अक-

रावें । मन तें भी हें जाणोंवे । भूतांमाजी स्वभावें । चेतना ते
मी ॥ २२४ ॥ नामजप यज्ञु तो परम । बाधूं न शके स्नानादि
कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥ २३३ ॥
जेथ जेथ संपत्ति आणि दया । दोन्ही वसती आलिया ठाया ।
ते ते जाण धनंजया । अंश माझे ॥ ३०७ ॥ तयातें ओळखा-
वया हेचि संज्ञा । जे जगें नमस्कारिजे आज्ञा । ऐसें आथि ते
जाण प्राज्ञा । अवतार माझे ॥ ३११ ॥

# अध्याय अकरावा.

## श्लोक ( चामर )

॥ पार्थ विनवि माधवासि विश्वरूप भेटवा ॥
॥ म्हणूनियां हरी धरी विकटरूप तेधवां ॥
॥ मांडिला अनर्थ थोर पांडुकुमर घाबरे ॥
॥ म्हणे पुनश्च दाखवा विभो स्वरूप गोजिरें ॥ ११ ॥

## सर्वव्यापक असें विश्वरूप दाखविण्याबद्दल अर्जुनाची प्रार्थना ( ११ )

आतां जयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा होय हारपे ।
जया ठायातें आपणपें । मी ऐसें म्हणती ॥ ८२ ॥ तें मुदल
रूप तुझें । जेथूनि इयें द्विभुजें हन चतुर्भुजें । सुरकार्याचेनि
व्याजें । घेवों घेवों येसी ॥ ८३ ॥ पै जळशयनाचिया अव-
गणिया । कां मत्स्यकूर्म इया मिरवणिया । खेळ सरलिया तूं
गुणिया । साठविसी जेथ ॥ ८४ ॥ उपनिषदें जें गाती । यो-

गिये हृदयीं रिगोनि पाहाती । जयातें सनकादिक आहातीं । पोटाळूनियां ॥ ८५ ॥ ऐसें आगाध जें तुझें । विश्वरूप कानीं आइकिजे । तें देखावया चित्त माझें । उतावीळ देवा ॥ ८६ ॥

## यशोदेस व ध्रुवास विश्वरूप दर्शन ( ११ )

जिये अनादि भूमिके निटे । चराचर हें चित्र उमटे । आपण पै श्रीवैकुंठे । दाविलें तया ॥ १८१ ॥ मागां बाळपणीं येणें श्रीपती । जैं एकवेळ खादली होती माती । तैं कोपोनिया हातीं । यशोदा धरिला ॥ १८२ ॥ मग भेणें भेणें जैसें । मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें । चवदाहि भुवनें सावकाशें । दाविलीं तिये ॥ १८३ ॥ ना तरी मधुवनीं ध्रुवासि केलें । जैसें कपोल शंखें शिवतलें । आणि वेदांचियेहि मती ठेलें । तें लागला बोलों ॥ १८४ ॥ तैसा अनुग्रहो पै राया । श्रीहरी केला धनंजया । आतां कवणेकडेहि माया । ऐसी भाष नेणेचि तो ॥ १८५ ॥

## विश्वरूप पाहिलयवर अर्जुनाची स्थिति. (११)

म्हणे केवढे गगन एथ होतें । तें कवणें नेलें पां केउतें । तीं चराचराचें महाभूतें । काय झालीं ॥१८८॥ दिशांचे ठायही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाले । चेइलिया स्वप्न तैसें केलें । लोकाकार ॥ १८९ ॥ नाना सूर्यतेज प्रतापें । सचंद्र तारांगणा जैसें लोपे । तैसीं मिळालीं विश्वरूपें । प्रपंच-रचना ॥ १९० ॥ तेव्हां मनासि मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सावरे । इंद्रियाचे रश्मी माघारे । हृदयवरी भरले

॥ १९१ ॥ तेथ ताठस्थ्या ताटस्थ्य पडिलें । टकासी टक लागलें । जैसे मोहनास्त्र घातलें । विश्वरूजातां ॥ १९२ ॥ तैसा विस्मित पाहे कोडें । तव पुढां होतें चतुर्भुज रूपडें । तेंचि नानारूप चहूंकडे । मांडूनि ठेलें ॥ १९३ ॥ अहो पाहतां कीर प्रतिभासे । एथ नवलावो काय असे । परी न पाहातांही दिसे । चोज आइका ॥२२९॥ कैसें अनुग्रहाचें करणें । पार्थाचें पाहाणें आणि न पाहाणें । तयाहि सकट नारायणें । व्यापुनि घेतलें ॥ २३० ॥

## निस्सीम भक्ति. [११]

परि तेचि भक्ति ऐसी । पर्जन्याची सुटिका जैसी । धरा वांचूनि अनारिसी । गतीचि नेणें ॥ ६८६ ॥ कां सकळ जळ संपत्ति । घेऊनि समुद्रातें गिंवसति । गंगा जैसी अनन्य गती । मिनलीच मिळे ॥ ६८७ ॥ तैसे सर्वभाव संभारें । न धरत प्रेम एकसरें । मजमाजि संचरें । मीच होऊनि ॥६८८॥ आणि तेविंचि मी ऐसा । थडिये आणि माझारीं सरिसा । क्षीराब्धि कां जैसा । क्षीराचाचि ॥ ६८९ ॥ तैसें मज लागुनी मुंगीवरी । किंबहूना चराचरीं । भजनासि कां दुसरी । परिच नाहीं ॥ ६९० ॥ तयाचि क्षणासवें । एवंविधें मी जाणवें । जाणितला तरी स्वभावें । दृष्टहि होय ॥ ६९१ ॥ मग इंधनीं अग्नि उद्दीपे आणि इंधन हे भाष हारपे । तें अग्नीचि होउनि आरोपे । मूर्ति जेवि ॥ ६९२ ॥ कां उदय न कीजे तेजाकारें । तव गगनचि होउनि आंधारें । मग उदेलियां एक-

सरें । प्रकाशु होय ॥ ६९३ ॥ तैसे माझिये साक्षात्कारि । सरे अहंकाराची वारी । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ॥ ६९४ ॥ मग मी तो हें आधवें । एक मीचि आथीं स्वभावें । किंबहुना सामावे । समरसें तो ॥ ६९५ ॥

# अध्याय अकरावा

## सर्वसंग्रह

म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें । प्रयागमाधव विश्वरूप पाहावें । येतुलेनि संसारासि द्यावें । तिळोदक ॥ १० ॥ जे मी मारिता हे कौरव मरते । ऐसेनि वेटाळिला होता मोहें बहुतें । तो फेडावयालागि अनंतें । हें दाखविलें निज ॥ १०७ ॥ अरे कोणी कोण्हातें न मारीं । एथ मीचि हो सर्व संहारी । हें विश्वरूपव्याजें हरी । प्रकटित असें ॥ १०८ ॥

# अध्याय बारावा.

## नमन

जयजय वो शुद्धे । उदारें प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ॥ १ ॥ विषयव्याळें मिठी । दिधलीया नुठी ताठी । ते तुझिये कृपादृष्टी । निर्विष होय ॥ २ ॥ तरि कवणातें तापु पोळी । कैसेनि वो शोक जाळी । जरी प्रसादरसकल्लोळीं । पुरें येसि तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे । सोहंसिद्धीचे लळे । पाळसी तूं ॥ ४ ॥ आधारशक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं ॥ हृदयाकाश

पालखी । परिये देसी निजें ॥ ५ ॥ प्रत्यक्जोतीची ओवाळणी । करिसी मनपवनाचीं खेळणी । आत्मसुखाचीं बाळलेणी । लेवविसी ॥ ६ ॥ सतरावीयेचें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लर गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाउनी ॥ ७ ॥ ह्मणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझां पाउलीं । याकारणें मी साउली । नसंडीं तुझी ॥ ८ ॥ अहो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्टी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥ ९ ॥ म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथ निरूपणीं ॥ १० ॥

## अध्याय बारावा.

### श्लोक [ पृथ्वी छंद ]

॥ बरी सगुण भक्ति कीं भजन निर्गुणाचें बरें ।
॥ पुसे विजय हें तदा हरि वदे तया आदरें ॥
॥ असोत बहुयोग ते तरिहि भक्तियोगाहुनी ॥
॥ नसेचि दुसरा असा सुलभ जो श्रमावांचुनी ॥ १२ ॥

### योगाचे कष्ट. ( १२ )

किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रताराबीण करावा । हा योग ॥ ६६ ॥ ऐसे मृत्युहूनि तिख । कघोटें कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ॥६८॥ ह्मणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वाटा भागा आला ॥ ६९ ॥ पाहें पां लोहाचे

चणें । जै बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें कीं मरणें । शुद्धी नेणें ॥ ७० ॥

## सगुणभक्ति. ( १२ )

कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें । जिये का वर्णविशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥ विधीतें पाळीत । निषेधातें गाळीत । मज देउनी जाळीत । कर्मफळें ॥ ७७ ॥ ययापरी पाहीं । अर्जुना माझ्या ठाईं । संन्यसूनि नाहीं । करिती कर्में ॥ ७८ ॥ आणीकही जें जें सर्व । कायीक वाचीक मानसीक माव । तयां मीवांचूनि धाव । आनौनि नाहीं ॥ ७९ ॥ ऐसें जे मत्पर । उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें जाले ॥ ८० ॥ जयांचिये आवडी । केली मजशी कुळवाडी । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ ८१ ॥ ऐसें अनन्य योगें । विकले जीवें मनें आंगें । तयांचे कायिएक सांगें । जें सर्व मी करीं ॥ ८२ ॥

## खऱ्या भक्तांचें सर्व कांहीं देव चालवितो ( १२ )

येऱ्हवी तरी माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ ८५ ॥ तैसे ते माझें । कलत्र हें जाणिजे । कायिसेनेहि न लाजे । तयाचेनि मी ॥८६॥ म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयातें समुद्धर्ता । आथि मी सदां ॥ ९४ ॥

## अभ्यासयोग. ( १२ )

अथवा हें चित्त । मनबुद्धि सहित । माझा हातीं अचुंबित।

न शकसी देवो ॥ १०४ ॥ तरि गा ऐसें करी । यया आठा पाहारा माझारीं । मोटकें निमिष भरी । देत जाय ॥ १०५ ॥ मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं येईल ॥ १०६ ॥ जैसें शरत्कालु रिगे । आणि सरिता वोहटूं लागे । तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचोनि ॥ १०७ ॥ मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसें दिसें । हारपत अवसे । नाहींचि होय ॥ १०८ ॥ तैसें भोगा आंतोनि निघतां । चित्त मजमाजी रिगतां । हळू हळू पांडुसुता । मीचि होसील ॥ १०९ ॥ अगा अभ्यासयोग म्हणिजे । तो हा एक जाणिजे । येणें कांहीं न निफजे । ऐसें नाहीं ॥ ११० ॥ पै अभ्यासाचेनि बळें । एका गती अंतराळें । व्याघ्र सर्प प्रांजळें । केले एकीं ॥ १११ ॥ विष कीं अहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकी वाग्ब्रह्म थाकडे । अभ्यासें केलें ॥ ११२ ॥ ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागीं माझा ठाईं । अभ्यासें मिळे ॥ ११३ ॥

## कर्मब्रह्मार्पण. ( १२ )

का अभ्यासाहि लागी । कस नाहीं तुझिया आंगीं । तरि आहासी तयाभागीं । तैसाचि अस ॥ ११४ ॥ इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमान न सांडीं । स्वजातीचा ॥ ११५ ॥ कुळधर्म चाळी । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ॥ परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये । तो मी करीत आहें । ऐसें न म्हणें ॥ ११७ ॥ करणें कां न

करणें । हें आघवें तोचि जाणें। विश्व चळतसें जेणें । परमात्म्ये नि ॥ ११८ ॥ माळियें जेउतें नेलें । ते उतें निवांतचि गेले । तया पाणिया ऐसें केलें । हो आवें गां ॥ १२० ॥ म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ति । इयें वोझीं नेघें मती । आखंड चित्त-वृत्ति । माझ्या ठायीं ॥ १२१ ॥ आणि जें जें कर्म निपजें । तें थोडें बहु न म्हणिजें । निवांताचि अर्पिजे । माझया ठायीं ॥ १२३ ॥ ऐसिया मत्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्य सदना । माझिया येसी ॥ १२४ ॥ अगा आत्मजेच्याविषीं । जीव जैसा निरभिलाषी । तैसा कामीं अशेषी । निष्कामु होई ॥ १३२ ॥

## मुक्तांचें लक्षण [ १२ ]

तो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपर नाहीं । चैतन्या जैसा ॥ १४४ ॥ उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें काहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ॥ १४५ ॥ गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होउनी मारूं । ऐसे नेणेचि कां करूं । तोय जैसें ॥ १४७॥ तैसी आघवियाची भूत मात्रीं एकपणें जया मैत्री । कृपेसि धात्री । आपण जो ॥ १४८ ॥ आणि मी हें भाष नेणें । माझे कांहींच न म्हणे । सुखदुःख जाणणें । नाही जया ॥ १४९ ॥ अर्जुना तो भक्त । तोचि योगी तोचि मुक्त । तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये॥१५६॥ जो आत्मलाभा सारिखें । गोमटें कांहींचि न देखें । म्हणोनि भोग विशेख । हरिखेंना जो ॥ १०९ ॥ आपणचि विश्व

जाला । तरि भेदभावो सहजचि गेला । म्हणोनि द्वेश ठेवला । जया पुरुषा ॥ १९१ ॥ पै आपुले जें साचें । तें कल्पांतींही न वचें । हें जाणोनि गताचें । न शोची जो ॥ १९२ ॥ कां, धरींचिया उजियेड करावा । पारखिया अंधार पाडावा । हें नेणेचि गा पांडवा । दीप जैसा ॥ १९८ ॥ जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली । दोघां एकची साउली वृक्ष दे जैसा ॥ १९९ ॥ नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु । गाळतिया कडु । नोहेचि जेवीं ॥ २०० ॥ माधूर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥२०४॥

## भगवंताचें भक्त प्रेम. (१२)

हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थीर । किंबहुना चराचर । आपण जाला ॥ २१३ ॥ मग यावरिही पार्था । माझ्या भजनीं आस्था । तरि तयातें मीं माथां । मुकुट करीं ॥ २१४ ॥ म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आम्हीं माथा मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयां आम्हीं ॥ २२२ ॥ तयांचिया गुणांचीं लेणीं लेववूं आपुलिये वाणीं । तयांची कीर्ती श्रवणीं । आम्हीं लेऊं ॥२२२॥ तो पाहावा हे डोहाळे । म्हणोनि अचक्षुसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ २२३ ॥ दोंवरीं दोनी । भुजा आलों घेउनी । आलिंगावया लागुनीं । तयाचें आंग ॥ २२४ ॥ तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्राते । प्रशंसिती ॥ २२७ ॥

# अध्याय बारावा.

## सर्वसंग्रह.

उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तेसा मनबुद्धिपासीं । अहंकारु ये ॥ १०१ ॥ म्हणोनि माझ्या स्वरूपीं । मनबुद्धि इयें निक्षेपीं । येतुलेनीं सर्वव्यापी । मीचि होसी ॥ १०२ ॥ यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं । आपुली आण पाहीं । वाहतसें गा ॥ १०३ ॥

---

# अध्याय तेरावा.

## नमन.

जयाचें केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचें अधिकरण तेचि वंदूं चरण । श्रीगुरूचें ॥ १ ॥ जयाचेनि आठवे । शब्द-सृष्टि आंगवे । सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥ २ ॥ वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारुष म्हणें । रस होती बोलणें । अक्ष-राचे ॥ ३ ॥ भावाचें अवतरण । अवतरविती खुण । हाता चढे संपूर्ण । तत्वबोध ॥ ४ ॥ श्रीगुरूचे पाय । जैं हृदय गव-सुनी ठाय । तैं येवढें भाग्य होय । उन्मेषासि ॥ ५ ॥ ते नम-स्कारूं आतां । जो पितामहाचा पिता । लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसें म्हणे ॥ ६ ॥

# अध्याय तेरावा.

## श्लोक.

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञ दोन्ही कथुनि मग पुढें कृष्ण पार्थासि सांगे ॥
॥ ज्ञानी त्यातें म्हणावा मज भजुनि कदा जो मदानें न वागे ॥
॥ तैसा ज्या भेद बाणे प्रकृति पुरुषिंचा सर्व ठायीं समत्व ॥
॥ कर्माची त्यासि बाधा तिळभरहि नसे पावला तो प्रभुत्व ॥

## क्षेत्र कोण व क्षेत्रज्ञ कोण. [ १३ ]

तरि पार्था परिसिजे । देह हें क्षेत्र म्हणिजे । हें जाणें तो बोलिजे । क्षेत्रज्ञु येथें ॥ ७ ॥ तरी क्षेत्रज्ञ जो येथें । तो मीचि जाण निरुतें । जो सर्व क्षेत्रातें । संगोपोनि असें ॥ ८ ॥ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें । जाणणें जें निरुतें । ज्ञान ऐसें तयातें । मानूं आम्हीं ॥ ९ ॥ तैसी छत्तीसही इयें तत्वें । मिळती जेणें एकत्वें । तेणें समूहपरत्वें । क्षेत्र म्हणिजे ॥ १५५ ॥ आणि बाहतेनि भौतिकें ।पापपुण्य एथ पिकें। म्हणोनि आम्हीं कौतुकें । क्षेत्र म्हणो ॥ १५६ ॥

## अहंकार. [ १३ ]

जैसा ज्वर धातुगत । कुपथ्याचें मिष पाहात । मग जालिया आंत । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥ तैसी पाचांही गाठी पडे । जै देहाकार उघडे । तै नाचवी चहूंकडे । तो अहंकार गा ॥ ८१ ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें नलगे अज्ञानापाठी । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं । नाचवी ॥ ८२ ॥

## पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें [ १२ ]

तरी श्रवण नयन । त्वचा घ्राण रसन । इयें जाण ज्ञान । करणें पांचैं ॥ ९८ ॥ इयें तत्वमेळा पंकीं । सुखदुःखाची उखिविखी । बुद्धि करितें मुखीं । पांचैं इहीं ॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । वायु हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मेंद्रियें म्हणिपती । तियें इयें जाणिजती । आइके कैवल्यपती । सांगतसे ॥ १०१ ॥

## मन. [ १३ ]

तें बुद्धिसी बाहेरी । अहंकाराचिया उरावरी । ऐसे ठायीं माझारीं । बळियावलें ॥ १०९ ॥ वाया मन हें नांव । येऱ्हवी कल्पनाच सावेव । जयाचनिसंगे जीव । दशावस्तु ॥ ११० ॥ जें प्रकृतीस मूळ । कामा जयाचें बळ । जे अखंड सुये सळ । अहंकारासी ॥ १११ ॥ जे इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जे पाठ पुरवी । भयासि गा ॥ ११३ ॥ द्वैत जेथ उठी । अविद्या जेणें लाठी । जें इंद्रियातें लोटी । विषयां माजी ॥ ११३ ॥ संकल्पे सृष्टि घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी मनोरथाच्या उतरंडी । उतरी रची ॥ ११४ ॥ जें भुलीचें कुहर । वायुतत्वांच । अंतर । बुद्धीचें द्वार । झांकविलें जेणें ॥ ११५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला माहीं आन । आतां विषयाभिधान । भेद आइके ॥ ११६ ॥

## ज्ञानेंद्रियाचे व कर्मेंद्रियाचें विषय. ( १३ )

तरी स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हा विषय पंच-

त्रिध । ज्ञानेंद्रियांचा ॥ ११७ ॥ इहीं पांचैंद्वारीं । ज्ञानासि धाव बाहेरी । जैसा कां हिरविया चारीं । भांबावे पशु ॥ ११८ ॥ मग स्वर वर्ण विसर्ग । अथवा स्वीकार त्याग । चंक्रमण उत्सर्ग । विण्मूत्राचा ॥ ११९ ॥ हें कर्मेंद्रियाचें पांच । विषय गा साच । बांधोनिया माच । क्रिया धांवें ॥ १२० ॥

## इच्छा. [१३]

इंद्रिय विषयांचिये भेटी । सरसीच जे गा उठी । कामाची बाहुटी । धरूनिया ॥ १२३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मन सैंघ धावणें । नरिवावें तेथ करणें । तोंडें सुती ॥ १२४ ॥ जिये वृत्तीचियां आवडी । बुद्धि होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा इच्छा ॥ १२५ ॥ आणि इच्छिलिया सांगडे । इंद्रिया आमिष न जोडे । ऐसा ठाव पडे तोचि द्वेश ॥ १२५ ॥

## सुख दुःख [१३]

किंबहुना सोये । जीव आत्मयाचि लाहे । तेथ जें होयें । तया नाम सुख ॥ १३१ ॥ आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था । जी जें तेचि सर्वथा । दुःख जाण ॥ १३२ ॥ तें मनोरथ संगें नोहें । येरवीं सिद्धि गेलेंचि आहे । हें दुनींची उपायें सुखदुःखासी ॥ १३३ ॥

## चैतन्य. ( १३ )

आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे सत्ता । तिये नाम पांडुसुता । चेतना येथ ॥ १३० ॥ जे नखोनि केशवरी । उभी जागे शरीरीं ॥ जे तिहीं अवस्तांतरीं । पाल-

टेना ॥ १३५ ॥ मनबुध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी । प्रकृतिवन माधवी । सदाचि हे ॥ १३६ ॥ जडाजडीं अंशी । राहाटे जे सरिसी । ते चेमत नागा तुजसीं । लटिकें नाहीं ॥ १३७ ॥

## अमानित्व ( १३ )

पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी । हा असुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ॥ १८९ जेथ सत्काराची कें गोठी । के आदरा देईल भेटी । मरणेंसि साटी । नमस्कारितां ॥ १९० ॥ वाचस्पतीचेनि पाडे । सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजि दडे । महिमें भेणें ॥ १९१ ॥ चातूर्य लपवी । महत्व हारवी । पिसेंपण मिरवी आवडोनि ॥ १९२ ॥ पै अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं आतां अदंभाचिया वोळखीसी । सौरस देवो ॥ २०२ ॥

## अदंभित्व ( १३ )

तरी अदंभित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें । जिव जावे परि नुमसे । ठेविला ठावो ॥ २०३ ॥ तयापरी कीरिटी । पडलाहि प्राण संकटीं । परि सुकृता न प्रकटी । आंगें बोलें ॥ २०४ ॥ खडाणे आला पान्हा । पळवी जेवी अर्जुना ! कां लपवी पण्यांगना । वडीलपण ॥ २०५ ॥ परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिले । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं ॥ २०९ ॥ कींबहुना स्वधर्मीं थोर । अवसरीं उदार । आत्मचर्चे चतुर । येऱ्हवीं वेडा ॥ २१२ ॥ पैगा अदंभपण ।

म्हणितलें तें हें जाण । आतां आईक खूण । अहिंसेची ॥ २१७ ॥

## अहिंसा ( १३ )

कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हाळुवार । कुचंबेल केसर । इया शंका ॥ २४८ ॥ तैसें परमाणु पां गुंतले । जाणूनि जीव सानुलें । तेथ कारुण्यामाजि पाउले । लपवूनि चाले ॥ २४९ ॥ ऐशिया जतना । चालणें जया अर्जुना । हे अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ॥ २५१ ॥ तैसेंनि मार्दवें पाय । भूमीवरि न्यसीत जाय । लागती तेथ होय । जीवा सुख ॥ २५५ ॥ तंव बोलणेंचि नाहीं । बोलो म्हणे जरी कांहीं । तरि बोल कोणांही । खुपेल कां ॥ २६४ ॥ बोलतां अधिकही निघें । तरी कोणाचिया वर्मीं न लगे । आणि कोणासी न रिघे । शंका मनीं ॥ २६५ ॥ तैसें साच आणि मवाळ । मितलें आणि रसाळ । शब्द जैसें कल्होळ । अमृताचे ॥२७०॥ तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातां पायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिंसेतें ॥ ३०९ ॥

## आर्जव ( सरळपणा ) ( १३ )

तरी आर्जव तें ऐसें । प्राण्याचें सौजन्य जैसें । आवडत याही दोषें । एकचि पैगा ॥ ३५५ ॥ कां तोंड पाहूनि प्रकाशू न करी जेवि चंडांशू । जगा एक अवकाशू । आकाश जैसें ॥ ३५६ ॥ तैसें जयाचें मन । माणुसाप्रती आन आन । नोहे आणि वर्तन । ऐसें पै तें ॥३५७॥ फांकलिया इंदीवरा । परि-

वर नाहीं धनुधरा । तैसा कोन कोपरा । नेणेंचि जो ॥३६२॥ दिठी नोहे मिणधी । बोलणें नाहीं संदिग्धीं । कवणेंचि हीन बुद्धि । राहाटों नेणें ॥ ३६५ ॥ तो पुरुष सुभटा । आर्जवाचा आंगवठा । जाण तेथेंचि घरटा । ज्ञानें केला ॥ ३६८ ॥ तरी ज्ञान गा तें एथें । वोळख तूं निरुतें । आक्रोशेंवीण जेथें । क्षमा असें ॥ ३४० ॥

## शुचित्व ( १३ )

म्हणे शुचित्व गा । ऐसें । जयापाशीं दिसे । आंग मन जैसें । कापुराचें ।। ४६२ ॥ बाहेरी कर्में क्षाळला । भीतरी ज्ञानें उजळला । इहीं दोहीं परी आला । पाखाळा एका ॥ ४६४ ॥ येऱ्हवी तरी पांडुसुता । आंतरशुद्ध नसतां । बाहेरी कर्म तों सर्वथा । विटंबु गा ॥ ४६८ ॥ मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थी न्हाणिला । कडु दुधिया माखिला । गुळें जैसा ॥ ४६९ ॥ वोसगृहीं तोरण बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुमसेंदूर केलें । कांतहीनेनें ॥ ४७० ॥ म्हणोनि अंतरीं ज्ञान व्हावें । मग बाह्यलाभें स्वभावें । वरी ज्ञानकर्में संभवें । ऐसें कें जाडें ॥ ४७३ ॥ यालागीं बाह्यभागु कर्में धुतला चांगु । ज्ञानें फिटला वंगु । अंतरीचा ॥ ४०४ ॥ तेथ अंतरबाह्य गेलें । निर्मळत्व एक झालें । किंबहुना उरलें ।। शुचित्वचि ।। ४७५ ।। येऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें । विषयांवरी तरी लोळे । परि विकाराचेनि विटाळें । लिंपिजेना ।! ४७९ ॥ कां पतिपुत्रातें आलिंगी । एकचि ते तरुणांगी । तेथ पुत्रभावाचा आंगीं । न रिगे कामु ॥ ४८१ ॥

## विषयवैराग्य (१३)

आणि विषयांविखी । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं कीं जिती आथी ॥ ५१३ ॥ वमिलिया अन्ना । लाळ न घोटी जेवि रसना । आंग न सुये आलिंगना । प्रेताचिया ॥ ५१४ ॥ अर्जुना तेणें पाडें । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेंनि तोंडें । कांहींच जावो ॥ ५१५ ॥ नाराचांची आंथरुणं पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ ५२१ ॥ तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य होती जांव ॥ ५२३ ॥

## निरभिमान ( १३ )

वर्णाश्रम पोषकें । कर्मं नित्यनैमित्तिकें । यामाजि कांहीं न ठकें । आचरतां ॥ ५२६ ॥ परि हें मिया केलें । कीं हें माझेनि सिद्धी गेलें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजि ॥ ५२७ ॥ कां श्रुति स्वभावतां बोलें । गंगा काजेवीण चाले । तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें ज्याचें ॥ ५२९ ॥ एवं मनीं कर्मीं बोलीं । जेथ अहंकारा उखी जाली । एकावळीची काढिली । दोरी जैमी ॥ ५३१ ॥ मद्यपा आंगीचें वस्त्र । कां लेपा हातींचें शस्त्र । बैलावरी शास्त्र । बांधिलें आहे ॥ ५३३ ॥ तयापाडें देहीं । जया मी आहें हे सेचि नाहीं । निरहंकारता पाही । तया नाम ॥ ५३४ ॥

## वार्धक्यवर्णन ( १३ )

फुलांचिया भोगा । लागीं प्रेम टांगा । तें करेयाच्या गुडघा ।

तैसें होईल ॥ ५५८ ॥ पद्मदळेसिं इसाळे । भांडताति हे डोळे । ते होती पडवळें । पिकली जैसी ॥५६०॥ रांधवणी चुलीपुढें । पऱ्हवे उम्हताति खातवडें । तैसींचि यें नाकाडें । बिडबिडती ॥ ५६३ ॥ आषाढीचेंनि जळें । जैसी झिरपती शैलांचीं मौळें । तैसें खाडीहूनि लाळें । पडती पूर ॥ ५६८ ॥ वाचेसि अपवाडु । कांनीं अनुघडु । पिंडगरुवा माकडु । होईल हा ॥ ५६९ ॥ पायां पडती वेंगडीं । हात वळती मुरकुंडी । बरवेपणा बागडी । नाचविजैल ॥ ५७१ ॥ मळमूत्र द्वारें । होऊनि ठाती खोंकरें । नवसिये होती इतरें माझिया निधनीं ॥ ५७२ ॥ स्त्रिया म्हणती विवसी । बाळें जाती मूर्छेसी । किंबहुना चिळसी । पात्र होईन ॥५७४॥ उभळीचा उजगरा । सेजारिया सोइलिया घरा । शिणवील म्हणती म्हातारा । बहुतां-तें हा ॥ ५७५ ॥

**म्हणून वृद्धावस्था येण्यापूर्वीच परमार्थ करावा ( १३ )**

म्हणोनि नाइकणें पावे । तव आइकोनि घाली आघवें । पंगु न होतां जावें । तेथूनिया ॥५७८॥ दृष्टी जंव आहे । तंव पाहावें तेतुलें पाहे । मूकत्वा आधीं वाचा वाहे । सुभाषित ॥ ५७९ ॥ हात होती खुळें । हें पुढील मोटकें कळे । तंव करूनि घाली सकळें । दानादिक ॥ ५८० ॥ ऐसी दशा येईल पुढें । तैं मन होईल वेडें । तंव चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान ॥ ५८१ ॥ जें चोर पाहे झोंबती । तंव आजीचि रुसिजे संपत्ति । कां झांका झाकि वाति । न वचतां कीजे ॥ ५८२ ॥ तैसें वार्धक्य

यावें । मग जें वायां जावें । तें आतांचि आघवें । वसतें करी ॥ ५८३॥ म्हणोनि वार्धक्याचेनि आठवें वार्धक्या जो नागवे । तयांच्या ठाईं जाणावें । ज्ञान आहे ॥ ५८७ ॥

## ज्ञानी पुरुषाचीं लक्षणें ( १३ )

तरी जो या देहावरी । उदास ऐसिया परी । उखिता जैसा बिढारीं । बैसला आहे ॥५९४॥ आणि प्रजा जे जाली । तियें वस्तीकरें आलीं । कां गोरुवें बैसलीं । रुखातळीं ॥ ५९७ ॥ किंबहुना पूंसा । पांजरिया माजी जैसा । वेदाज्ञेसि तैसा । बिहुनी असे ॥ ५९९ ॥ येऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाणपा धात्री । ज्ञानासि गा ॥ ६०० ॥

## अज्ञानी पुरुषाचीं लक्षणें ( १३ )

तैसें ज्ञान जेथ नाहीं । तें अज्ञानचि पाहीं । तरी सांगो कांहीं कांहीं । चिन्हें तियें ॥ ६५६ ॥ तरी संभावनें जिये । जो मानाची वाट पाहे । सत्कारें होये । तोषु जया ॥ ५६७ ॥ आंग वरिबरी चर्ची । जनातें अर्चितां वंची । तो जाण अज्ञानाची । खाणी एथ ॥ ६६१ ॥ कौतुकें जें जें जल्पे । तें सबळाहूनि तीख रुपें । विषाहूनि संकल्पें । मारक जो ॥ ६६३ ॥ आणि फुंके भाता फुगे । रेचिलिया सवेंचि उफगे । तैसा संयोगवियोगें । चढे वोहटे ॥ ६६५ ॥ निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरुनी ठाके । थेंबें विरे वारेनि शोखे । चिखल जैसा ॥६६७ ॥ तैसा मानापमानीं होये । जो कोण्हाचि ऊर्मी न साहे तयांच्या ठायीं आहे । अज्ञान पुरें ॥ ६६८ ॥ लेंडिये आला

लोंढा । न मनीं वाळुवेचा वखंडा । तैसा निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ॥ ६९४ ॥ आंधळें हातिरूं मातलें । कां डोंगरी जैसें पेटलें । तैसें विषयीं सुटलें । चित्त जयाचें ॥ ६९९ ॥ बेडुक सापाचिया तोंडीं । जातसे सबुडबुडीं । तो माक्षिकांचिया कोडी । स्मरेना कांहीं ॥ ७३१ ॥ कडाडी लोटला गाडा कां शिखरोनि सुटला धोंडा । तैसा न देखे जो पुढां । वार्धक्य आहे ॥ ७५५ ॥ आणि आंगीं वृद्धतेची । संज्ञा ये मरणाची परि जया तारुण्याची । भुली न फिटे ॥ ७६२ ॥

## अविवेकी पुरुष ( १३ )

वयसेचेनि उवाये । संपत्तीचेनि सावाये । सेव्यासेव्य जाय । सरकटित ॥ ७७२ ॥ न करावें तें करी । असंभाव्य मनीं धरी चिंतूं नयें तें विचारी । जयाची मति ॥ ७७३ ॥ रिघे जेथ न रिघावें । मागे जें न घ्यावें । स्पर्शे जेथ न लगावें । आंग मन ॥ ७७४ ॥ न जावें तेथ जाये । न पाहावें तें जो पाहे । न खावें तें खाये । तेवींचि तोषें ॥ ७७५ ॥ न धरावा तो संगु । न लगावें तेथ लागु । नाचरावें तो मार्गु । आचरे जो ॥ ७७६ ॥ नाइकावें तें आइके । न बोलावें तें बकें । परि दोष होतील हे न देखें । प्रवर्तता ॥ ७७७ ॥ परि पाप मज होईल । कां नरकयातना येईल । हें कांहीचि पुढील । देखे ना जो ॥ ७७९ ॥

## प्रकृति आणि पुरुष ( १३ )

तरी पुरुष अनादि आथी । आणि तैंचि लागोनि प्रकृति ।

सवें सरिसी दिवोराती । जया परी ॥ ९६० ॥ कां रूप नोहे वायां । परी रूपा लागली छाया । निकण वाढे धनंजया । कणेसि कोंडा ॥ ९६१ ॥ तैसीं जाण जवटें । दोन्हीं इथे एकवटें । प्रकृतिपुरुषें प्रकटें । अनादि सिद्धें ॥ ९६२ ॥ पै क्षेत्र येणें नावें । जें सांगितलें आघवें । तेंचि येथ जाणावें । प्रकृति हे गा ॥ ९६३ ॥ आणि क्षेत्रज्ञ ऐसें । जयातें म्हणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । न बोलों घेई ॥ ९६४ ॥ तरि केवळ जे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्तां । क्रिया नाम ॥ ९६६ ॥

## प्रकृतीचें कार्य ( १३ )

तेथ इच्छा आणि बुद्धि । उडवी अहंकारेसि आधीं । मग तिया लाविती वेधीं । कारणांचा ॥ ९६९ ॥ तेंचि कारण ठाकावया । जें सूत्र धरणें उपाया । तया नांव धनंजया । कार्य पैगा ॥ ९७० ॥ आणि इच्छा मदाच्या थावी । लागली मनातें उठवी । ते इंद्रियें राहाटवी । हें कर्तृत्व पै गा ॥ ९७१ ॥ म्हणोनि तिन्ही या जाणा । कार्य कर्तृत्व कारणा । प्रकृती मूळ हें राणा । सिद्धांचा म्हणें ॥ ९७२ ॥ अंबुलिया आंबुलिये संगती ना सोये । कीं अंबुली जग विये । चोज आइका ९८०

## देहाचें अंतिम १३

देह तंव पांचाचें जालें । हें कर्माचें गुणी गुंथलें । भंवतसे चाकीं सूदलें । जन्ममृत्युच्या ॥ ११०३ ॥ हें काळानळाच्या

कुंडीं । घातली लोणियाची उंडी । मासी पांखपाखडी । तंव हें सरे ॥ ११०४ ॥ हें विपायें आगींत पडे । तरी भस्म होउनि उडें । जालें श्वाना वरपडे । तरितें विष्ठा ॥११०५॥ या चुकें दोहीं काजा । तरि होय कृमींचा पुंजा । हा परिणाम कपिध्वजा । कश्मलुगा ॥ ११०६ ॥

# अध्याय तेरा सर्वसंग्रह.

## ( शरिरांतील छत्तीस तत्वें )

तरि महाभूत पंचकु । आणि अहंकार एकु । बुद्धि अव्यक्त दशकु । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ मन आणीकही एकु । विषयांचा दशकु । द्वेष सुखदुःखु । संघात इच्छा ॥ ७३ ॥आणि चेतना धृति । एवं क्षेत्र व्यक्ति । सांगितली तुजप्रति । आघवीची ॥ ७४ ॥ देहतरी वरिचिलीकडे । आपुलिया परिहिंडे । परि बैसका न मोडे । मानसींची ॥ ४८६ ॥ रिधतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एक सरला जो ॥ ६०७ ॥ मिळौनि मिळतचि असें । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होउनि मज तैसे । सर्वस्वे भजती ॥ ६०८ ॥ मोरा आंगीं अशेषे । पिसे असती डोळसे परि एकली दृष्टी । नसे । तैसें तें गा ॥ ८३६ ॥ जरी परमाणु ढें संजीवनी मूळ जोडे । तरि बहुकाय गाडे । भरणें येरें ॥ ८३७ ॥ तें ज्ञेय गां ऐसे । आदि जया नसे । परब्रह्म आपैसें नाम जया ॥ ८३८ ॥ जें नाहीं म्हणो जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे ।

आणि विश्वचि ऐसें म्हणिजे । तरि हे माया ॥ ८६९ ॥ म्हणो-
नि विश्वतचक्षु । हा अचक्षूचा ठायीं पक्षु । बोलावया दक्षु ।
जाला वेदु ॥ ८७८ ॥ पैं शून्य जै दावावें जाले । तैं विंदुले ।
व्यक्त केलें । तैसें अद्वैत सांगावें बोलें । तैं द्वैत कीजे ॥८८८॥
राजा पराधीन जाला । कीं सिंह रोगें रुधला । तैसा पुरुष
प्रकृती आला । स्वतेजा मुके ॥ १०१२ ॥

# अध्याय चौदावा.

## नमन.

जयजय आचार्या । समस्तसुखर्या । प्रज्ञाप्रभातसूर्या ।
सुखोदया ॥ १ ॥ जयजय सर्व विसांवया । सोहंभावसुहावया ।
नाना लोक हेलावया । समुद्रां तूं ॥ २ ॥ आइके गा आर्तबंधु ।
निरंतर कारुण्यासिंधु । विशदविद्यावधू । वल्लभा जी ॥ ३ ॥
तूं जयाप्रति लपसी । तया विश्व हें दाविसी । प्रकट तैं करिसी
आवर्वेचि तूं ॥ ४ ॥ कीं पुढिलाचि दृष्टी चोरिजे । हा दृष्टि
बंध निपजे । परी नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरे ॥५॥
जी तूंचि तूं सर्वां यया । मा कोणा बोध कोणा माया । ऐसिया
आपे आप लाघविया । नमो तुज ॥ ६ ॥ या लागीं आतां ।
स्तुति सांडूनि निवांतां । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें॥१५॥

# अध्याय चौदावा.

## श्लोक शा. विक्रि.

॥ पार्था मी जनिता, तशीच जननी माया, जगत्संतती ॥

॥ जीवां सत्वरजस्तमस्त्रिगुण हे स्वाभाविक व्यापिती ॥
॥ जो सेवी परि भक्तिनें मजतया हे बाधती ना गुण ॥
॥ झाला मत्सम तो, प्रिया प्रिय नसें त्यातें, नुरे मीपण १४

## मायेची संतती ( १४ )

तरी माझी हे गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्य गुणी अविद्या हे ॥ ८७ ॥ इये नाहीं हेंचि रूप ! ठाणे हे अति उमप । हे निद्रितां समीप । चेतां दुरी ॥ ८८ ॥ माझेनिचि आगें । पहुडल्या हे जागे । आणि सत्ता संभोगें । गुर्विणी होय ॥ ८९ ॥ उभय संगें पहिलें । बुद्धितत्व प्रसवलें । बुद्धि-तत्वें भारलें । होय मन ॥ ९१ ॥ तरुणी ममता मनाची । अहंकारतत्व रची । तेणें महाभूतांची । अभिव्यक्ति होय॥९२॥ आणि विषयेंद्रिया गोसी । स्वभावें तंव भूतांसी । म्हणोनि येती सरसी । तियेंही रूपा ॥ ९३ ॥ या कारणें मी पिता । महत्ब्रह्म हे माता । अपत्य पांडुसुता । जग डंबर ॥ ११६ ॥

## गुणातीताचीं लक्षणें ( १४ )

ययामाजि मी ऐसा । वनीं कां वसंत जैसा । वनलक्ष्मी-विलासा । हेतुभूत ॥ २९५ ॥ कां तारांगणीं लोपावें । सूर्य-कांती उद्दीपावें । कमळीं विकासावें । जावें तमें ॥ २९६ ॥ यया कोणाचें कांहीं । सविता जैसा देखत नाहीं । तैसा अकर्ता मी देहीं । सत्तारूप ॥ २९७ ॥ मी दाऊनि गुण देखें । गुणता हे मियां पोखे । ययाचेनि निःशेखें । उरें तें मी ॥ २९८ ॥ ऐसेनि विवेकें जया । उदय होय धनंजया । ये

गुणातीतता तया । ऊर्ध्वपंथें ॥ २९९ ॥ तिन्ही गुण आपुला-
लिये प्रौढी । देहीं नाचवितां बागडी । तो पाहोंहि न धाडी ।
अहंतेतें ॥ ३१० ॥ सांडूनि आंगींची खोळी । सर्पु रिगालिया
पाताळीं । ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ ३१२ ॥
कां सौरभ्यजीर्ण जैसा । आमोद मिळोनि जाय आकाशा ।
माघारा कमळकोशा । नयेचि तो ॥ ३१३ ॥

## अव्यभिचारी भक्ति ( १४ )

म्हणोनि विश्वपण जावें । मग तैं मातें घेयावें । तैसा नव्हे
आघवें । सकटाचि मी ॥ ३८० ॥ ऐसेनि मातें जाणिजे । ते
अव्यभिचारी भक्ति म्हणिजे । येथ भेद कांहीं देखिजे । तरि
व्यभिचारी तो ॥ ३८१ ॥ याकारणें भेदातें । सांडूनि अभेदें
चित्तें । आपण यासकट मातें । जाणावें गा ॥ ३८२ ॥
पार्था सोनयाची टीक । सोनयासी लागली देख । तैसें आप-
णपें आणिक । मानावें ना ॥ ३८३ ॥

# अध्याय चवदावा.

## सर्वसंग्रह.

आपुला आपणपयां । विसर जो धनंजया । तेंचि रूप
यया । अज्ञानासी ॥ ७१ ॥ आपणाचें ज्ञानस्वरूप आहे ।
तें गेलें हें दुःख न वाहे । कीं विषय ज्ञानें होये । गगना येवढा
॥ १५३ ॥ नातरी येथिंचा दिवा । नेलिया सेजियां गांवा ।
तो तेथें तरी पांडवा । दीपाचि कीं ॥ २२१ ॥ तैसी ते सत्वबुद्धि

आगळी ज्ञानेंसि वृद्धि । तरंगावो लागे बुद्धि । विवेकावरी । २२२ ॥ कां नटलेनि लाघवें । नटु जैसा न झकवे । तैसें गुणजात देखावें । न होनिया ॥ २९० ॥ पै निद्रिताचे नि आंगेंसीं । साप तैशी उर्वशी । तेविं स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वे ॥ ३५६ ॥ म्हणोनि तयाच्यां ठायीं । शेणा सोनया विशेषु नाहीं । रत्ना गुंडेया कांहीं । नेणिजे भेद ॥ ३५७ ॥

## श्रीगुरूची मानसपूजा.

आतां हृदय हें आपुलें । चौफाळूनिया भले । वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरूचीं ॥ १ ॥ ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रिय कुड्मळीं । भरूनिया पुष्पांजुळी । अर्घ्य देवों ॥ २ ॥ अनन्योदकें धुवट । वासना जे तन्निष्ठ । तें लागलेंसें बोट । चंदनाचें ॥ ३ ॥ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नूपुरें । लेववूं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥ घणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । तिये घालूं जोडी । आंगुळिया ॥ ५ ॥ आनंदामोद बहळ । सात्विकाचें मुकुळ । तें उमळलें अष्टदळ । ठेऊं वरी ॥ ६ ॥ तेथें अहं हा धूप जाळूं । नाहं तेजें वोवाळूं । सामरस्यें पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥ माझी तनु आणि प्राण । इया दोन्ही पाउवा लेववूं श्रीचरण । करूं भोगमोक्षीं निंबलोण । पायां तयां ॥ ८ ॥ इया श्रीगुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा । जे सकळार्थ मेळावा । पाट बांधे ॥ ९ ॥

# अध्याय पंधरावा.

## श्लोक ( शा. विक्री )

॥ ऊर्ध्वीं मूळ तळीं अपार पसरे अश्वत्थ संसार हा ॥
॥ छेदाया दृढ शस्त्र एकचितया निःसंगता भूरुहा ॥
॥ ऐसें ओळखुनी क्षराक्षर, मला जे पूजिती भारता ॥
॥ ते होती कृतकृत्य गुह्य कळुनी पावोनि सर्वज्ञता ॥ १५॥

## पुनर्जन्म ( १५ )

जैसा आथिला आणि विलासियाः तौंचि वोळखोंये धनंजया। जै राजसेव्या ठाया । वस्तीसि ये ॥ ३६२ ॥ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढ । कां विषयेंद्रियाचा धुमाड । हा जाणिजे तै निवाड । जैं देहपावे ॥ ३६३ ॥ जैसा अपमानिला अतीथि । ने सुकृताची संपत्ती । कां साइखडेयाची गती । सूत्रतंतु ॥ ३६५ ॥ तेवि मनः षष्ठां ययां । इद्रियांतें धनंजया । देहराजेने देहा । पासोनि गेला ॥ ३६७ ॥ मग येथें अथवा स्वर्गीं । जेथ जैसे देह आपंगी । तेथ तैसेचि पुढती पांगी । मनादिक ॥ ३६८ ॥

## क्षरपुरुष, अक्षरपुरुष, उत्तमपुरुष ( १५ )

हा जनक हे माता । मी गौरहीन पुरता । पुत्रवित्त कांता । माझें हेना ॥ ४९२ ॥ ऐसिया वळघोनि स्वप्ना । धांवत भवस्वर्गाचिया राना । तया चैतन्यानांम अर्जुना । क्षरपुरुष गा ॥ ४९३ ॥ एवं जीव चैतन्य आघवें । हें क्षर

पुरुष जाणावें । आतां रूप करूं बरवें । अक्षरासी ॥ ५०१ ॥ पांसुता निःशेष जाये । ना घटभांडादि होये । तया मृत्पिंडा ऐसें आहे । मध्यस्थ जें ॥ ५०५ ॥ विश्व आघवेंचि मावळे । आणि आत्मबोधतरी नुजळे । तिये अज्ञानदशे केवळे । अक्षर नाम ॥५०८॥ सर्वां कळीं सांडिलें जैसें । चंद्रपण उरे अंवसे । रूप जाणावें तैसें । अक्षराचें ॥ ५०९ ॥ हा पुरुष कां म्हणिजे । पूर्णपणेंचि निंजे । पै मायापुरीं पहुडिजे । तेणेंही बोले ॥ ५२१ ॥ तैसें अज्ञान ज्ञानें नेलें । आपणहि वस्तु देउनि गेलें । ऐसें जाणणेनिवीण उरलें । जाणते जें ॥ ५२८ ॥ तें तो गा उत्तम पुरुष । जो तृतिय का निष्कर्ष । दोहींहूनि आणिक । मागिला जो ॥ ५२९ ॥ म्हणोनि पुरुष क्षराक्षर । दोन्ही देखूनि अपर । यातें म्हणती पर । आत्मरूप ॥ ५३९ ॥ अर्जुना ऐसियापरी । परमात्मा शद्ववरी । सूचिजे गा अवधारी । पुरुषोत्तम ॥ ५४० ॥

# अध्याय पंधरावा

## सर्वसंग्रह

होय अदृष्ट आपैतें । तैं वाळूचि रत्नें परते । उजू आयुष्य तैं मारितें । लोभ करी ॥ २२ ॥ आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचें तांदुळ । जरी भुकेची राखे वेळ । श्री जगन्नाथु ॥ २३ ॥ तयापरी श्रीगुरु । करिती जै अंगिकारूं । तैं होऊनि ठाके संसारू । मोक्षमय आघवा ॥ २४ ॥ तरि विरक्ति-

वांचुनि कांहीं । ज्ञानासि तगणें नाहीं । हें विचारूनि ठाईं । ठेविलें देवें ॥ ३६ ॥ जे विषें रांधिली रससोये । जै जेवणारा ठाउवें होये । तैं तो ताटचि सांडूनि जाये । जयापरी ॥ ३८ ॥ तैसी संसाराया समस्ता । जाणिजे जै अनित्यता तै वैराग्य दवडितां। पाठीलागे ॥ ३९ ॥ करूनि संसार वावो । स्वरूपी अहंतेचा ठावो । होआवया आध्यावो । पंधरावा हा ॥ ४२ ॥ म्हणोनि स्वप्नींचेया घाया । औषध चेवोनि धनंजया । तेविं अज्ञानमूळा ययाज्ञनाचिखङ्ग ॥ २५४ ॥ ज्ञान तरी अश्वत्थ म्हणिजे उखा । तोवरी एक सारिखा । नाहीं निर्वाह यया रुखा । प्रपंच रूपा ॥ १११ ॥ कांपतया पद्मदळा । वरीलिया बैसका नाहीं जळा कां चित्त जैसें व्याकुळा माणुसाचें ॥ ११३ ॥ तैसीचि ययाची स्थिती । नासत जाय क्षणक्षणा प्रति । म्हणोनि ययाते म्हणती अश्वत्थु हा ॥ १४४ ॥ आणि अश्वत्थ येणें नांवें । पिंपळ म्हणती स्वभावें । परितो अभिप्रावो नोहे । श्रीहरीचा ॥ ११५॥ कालवणाची कुंजरी । सूदलियां लवण सागरीं । होयेचि ना माघारीं । परती जैसी ॥ ३१८ तेविं मजसी एकवट । जे जाले ज्ञानें चोखट । तया पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ॥३२०॥ पै तोंड भरो कां विचारा । आणि अंतःकरणीं विषयासी थारा तरी नातुडे धनुर्धरा । त्रिशुद्धी मी ॥ ३९३ ॥ नाना बांधोनियां डोळे घ्राणींलाविजति मुक्ताफळें । तरी तयांचें काय फळें मोल माना ॥ ३९५ ॥ तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकल शास्त्रांचा सरावो । ऐसेन कोडी एक जन्म जावो ।

परी न पविजे मातें ॥ ३९६ ॥ जेव्हां द्राक्षी दूध घातलें । तेव्हां वाया गेलें गमलें । परि फळकाळीं दुणावलें । देखिलें जेवी॥५९२।। तैसी श्रीहरिवक्त्रीचीं अक्षरें । संजये सांगितलीं आदरें । तिहीं अंधु तोही अवसरें । सुखिया जाला ॥ ५९६॥ क्षीरसागरा परगुणें कीजे क्षीरसागरचिपणें । अमृतचि होऊन मिळणें । अमृतीं जेविं ॥ ५९६ ॥ साडेपंधरा मिसळावें । तैं साडेपंधरेचि होवावें । तेविं मी जालिया संभवे । भक्ति माझी ॥ ५६७ ॥

# अध्याय सोळावा.

## नमन

मालवीत विश्वाभासु । नवल उदेला चंडांशु । अद्वयाब्जिनीविकाशु । वंदू आतां ॥ १ ॥ जो अविद्याराती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणिया । जो सुदिन करी ज्ञानियां। स्वबोधाचा ॥ २ ॥ जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतोचें अविसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥ लिंगदेह कमळाचा । पोटीं वेचतया चिद्भ्रमराचा । बंदिमोक्ष जयाचा । उदैला होय ॥ ४ ॥ शब्दाचिया आसकडीं । भेदनदींचा दोहीं थडीं । आरडत विरहवेडीं । बुद्धिबोध ॥ ५ ॥ तया चक्रवाकांचें मिथुन । सामरस्याचें समाधान भोगवी जो चिद्गगन । भवनदिवा ॥ ६ ॥ जेणें पाहालिये पांहाटे । भेदाची चोरळी फिटे । रिघती आत्मानुभव वाटे ।

पांथिक योगी ॥ ७ ॥ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेख सूर्यकांत फुणगे । दीपले जाळिती दांगें । संसाराचीं ॥ ८ ॥ जयाचा रश्मिपुंज निबर । होतां स्वरूप उखरीं स्थिर । ये महासिद्धीचा पूर । मृगजळ तें ॥ ९ ॥ जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेच्या माध्यान्हीं आलिया । लपे आत्मभ्रांति छाया । आपण पा तळीं ॥ १० ॥

## अध्याय सोळावा.

### श्लोक. शा. विक्री.

दैवी प्रकृतिलक्षणें मनिं धरीं धैर्य क्षमा प्रौढता।
चित्तस्वास्थ्य दया शुचित्व मृदुतासत्यादि वा भारता ॥
आतां दंभ असत्य मत्सरपणा वर्मींपरा बोलणें ।
काम क्रोध अहंकृति त्यज सदा हीं आसुरी लक्षणें ॥

### अभय, सत्वशुद्धि, ज्ञानयोग, दान, दम. यज्ञ; स्वाध्याय; तप; आर्जव ( १६ )

पाणी बुडऊं ये मिठातें । तंव मीठचि पाणी आतें । तेविं आपण जालेनि अद्वैतें । नाशे भय ॥ ७२ ॥ अगा अभय येणें नांवें । बोलिजे तें हें जाणावें । सम्यक् ज्ञानाचें आघवें । धावणें हें ॥ ७३ ॥ गांवा गेलिया वल्लभु । पतिव्रतेचा विरह-क्षोभु। भलतेसणी हानी लाभु। न मनी जेविं॥७९॥ तेविं सत्स्वरूप रुचलेंपणें । बुद्धी जे ऐसें अनन्य होणें । ते सत्वशुद्धि म्हणे । केशिहंता ॥ ८० ॥ कां सुकुळीनें आपली । आत्मजा सत्कुळीं-

ची दिधली । हें असो लक्ष्मी स्थिरावली । मुकुंदीं जैसी॥८३॥ तैसें निर्विकल्पपणें । जें योगज्ञानींच या वृत्तिक होणें । तो तिजा गुण म्हणें । कृष्णनाथु ॥ ८४ ॥ फुलीं फळीं छाया । मुळीं पत्रीही धनंजया । वाटेचा न चुके आलिया । वृक्ष जैसा ॥ ८६ ॥ तैसें मनौनि धनवरी । विद्यमानें आल्या अवसरीं । श्रांतांचिये मनोहारीं । उपेगा जाणें ॥ ८७ ॥ तया नांव जाण दान । मोक्षनिधानाचें अंजन । हें असो आयिक चिन्ह । दमाचें तें ॥ ८८ ॥ आंतुला चित्ताचे अंगवरी । प्रवृत्ति पेळूनि माघारी । सुयिजे दाहींही द्वारीं । वैराग्याची ॥ ९१ ॥ पै दम ऐसा म्हणिपे । तो हा जाण स्वरूपें । यज्ञार्थही संक्षेपें । सांगों ऐक ॥ ९३ ॥ आणि मी कर्ता ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावो । ना वेदाज्ञेसी तरी ठावो । होईजे स्वयें ॥ ९८ ॥ अर्जुना एवं यज्ञ । सर्वत्र जाण साज्ञ । कैवल्यमार्गींचा अभिज्ञ । सांगाती हा ॥ ९९ ॥ तैसा प्रतिपाद्य जो ईश्वरु । तो होआवयालागीं गोचरु । श्रुतीचा निरंतरु । अभ्यासु करणें ॥ १०३ ॥ पार्थ गा स्वाध्यावो । बोलिजे तो हा म्हणे देवो । आतां तप शब्दाभिप्रावो । आईक सांगों ॥ १०५ ॥ नाना धूपाचा अग्नि प्रवेशु । कनकीं तुकाचा नाशु । पितृपक्ष पोषितां ऱ्हासू । चंद्राचा जैसा ॥ १०७ ॥ तैसा स्वरूपाचिया प्रसरा । लागीं प्राणेंद्रियशरीरां । आटणी करणें जे वीरा तेंचि तप ॥ १०८ ॥ आतां बाळाच्या हितीं स्तन्य । जैसें नानाभूतीं चैतन्य । तैसें प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें ॥ ११३ ॥

## अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशून्य, दया, अलोलुप्त्व, मार्दव, ह्रीः, अचापल्य ( १६ )

आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण॥ ११४॥परि अहितीं कोपोनि सोप । लालनीं भऊ जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें कां होय ॥१२३॥ तैसें श्रवण सुखचतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । तें सत्य येथें ॥ १२४ ॥ पै घातयाहि पाया पडतां नुठी गतायु पांडुसुता । तैसी नुपजे उपजवितां । क्रोधोर्मि गा ॥ १२९ ॥ अक्रोधत्व ऐसें । नांव तें ये दशे । जाण ऐसें श्रीनिवासे । म्हणीतलें तया ॥ १३० ॥ तेवीं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडून पाहीं । सांडिजे अशेषही । संसारजात ॥ १३४ ॥ तया नांव त्यागु । म्हणे तो यज्ञांगु । हें मानूनि सुभगु । पार्थ पुसे ॥ १३५ ॥ तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही माघौतें । हारपे निरुतें । ते शांति पै गा ॥ १३७ ॥ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं ॥१५०॥अगा अपैशुन्याचें लक्षण। अर्जुना हें फुडें जाण। मोक्षमार्गींचें सुरवासन। मुख्य हें गा॥१५३॥आतां दया ते ऐसी। पूर्णचंद्रिका जैशी । निववितां न कडसी। सानें थोर ॥१५४॥ तैसें पुढिलाचेनि तापें । कळवळलीये कृपें । दिधलेही आपणपें । न्यूनचि मानी ॥ १५७॥ पै पायीं कांटा नेहटे।तंव व्यथा जीवीं उमटे।तैसा पोळे संकटें।पुढिलाचेनि॥१५९॥ तो पुरुष वीरराय । मूर्तिमंत जाण दया।मी उदयजतांचि तया।ऋणिया लाभे॥१६२॥

तैसें ऐहिकाचें कां स्वर्गींचें । भोग पाइक जालिया इच्छेचे । परि भोगावें हें न रुचे । मनामाजी ॥ १६६ ॥ बहुवें काय कौतुकीं । जीव नोहे विषयाभिलाखी । अलोलुप्त्व दशा ठाउकी । जाण तें हे ॥ १६७ ॥ परि महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणुमाजी सामाये । या विश्वानुसार होये । गगन जैसें ॥ १७३ ॥ काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेंनि जीवें प्राणें । तया नांव म्हणें । मार्दव मीं ॥ १७४ ॥ तैसें ओंट हातपणें । जें न होऊनि जिणें।उपजों उपजों मरणें ।नावा नावा ॥ १७९ ॥ हें बहु असो देहपणें । नामरूपासि येणें । नाहीं लाजिरवाणें । तयाहूनि ॥ १८१ ॥ ऐसेसिया अवकळा । घेपे शरिराचा कंटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥ १८२ ॥ कीं मावळलिया दिनकर । सरे किरणाचा प्रसर । तैसा मनोजयें प्रकार । बुद्धींद्रिया ॥ १८४ ॥ एवं मन पवन नियमें । होती दाही इंद्रियें अक्षमें । तें अचापल्य वर्में । येणें होय ॥ १८५ ॥

## तेज, क्षमा, धृति, शौच, अद्रोहत्व, अमानित्व (१६)

न ठाके निषेध आड । न पडे विधीची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ॥ १८९ ॥ ऐसें ईश्वाराकडे निज धांवे आपसया सहज । तया नांव तेज।अध्यात्मिक तें॥१९०॥ आतां सर्वही साहातिया गरिमा । गर्वा नये तोंचि क्षमा । जैसें देह वाहोनि रोमा । वाहणें नेणे॥१९१॥ तैसें अधिभूताधिदैवा। अध्यात्मादि उपद्रवां । पातलेया पांडवा । गिळूनि घाली

॥ १९५ ॥ ऐसें चित्त क्षोभाच्या अवसरी । उचलुनि धैर्या
जें चांगावें करी । धृति म्हणिपे अवधारी । तियेतें गा
॥ १९६ ॥ आतां निर्व्हळूनि कनकें । भरिला गांगें पीयूषें ।
तया कलशाचिया सारिखें । शौच असे ॥ १९७ ॥ जे आंगीं
निष्काम आचारू । जीवीं विवेक साचारू । तो सबाह्य
घडला आकारू । शुचित्वाचाचि ॥ १९८ ॥ कां फेडीत
पापताप । पोखीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें
जैसें ॥ १९९ ॥ पै अमोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसी जिये
किरीटी । तें सांगितलें हें दिठी । पाहों ये तैसें ॥ २०४ ॥
आणि गंगा शंभूचा माथां । पावोनि संकोचली जेवीं पार्था ।
तेवीं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें ॥ २०५ ॥ तें हें पुढत
पुढती । अमानित्व जाण सुमती । मागां सांगितलेंसे किती ।
तेंचि तें बोलों ॥ २०६ ॥ एवं इहीं सव्विसें । ब्रह्मसंपदा (दैवी
संपत्ति ) हें वसत असें । मोक्षचक्रवर्तीचें जैसें । अग्र-
हार होय ॥ २०७ ॥

## दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य, अज्ञान हीं आसुरी संपत्तीचीं लक्षणें ( १६ )

तैसा दृष्टादृष्टाचा सखा । धर्म जाला तो फोकारिजे देखा ।
तरि तारिता तोचि दोखा । लागीं होय ॥ २२२ ॥ म्हणोनि
वाचेचा चौबारा । घातलिया धर्माचा पसारा । धर्माचि अधर्म
होय वीरा । तो दंभ जाणें ॥ २२३ ॥ तैसा माजे स्त्रिया धनें
विद्यास्तुति बहुतें मानें । एकें दिवसींचेनि परान्नें । अल्पकु

जैसा ॥ २२७ ॥ किंवहुना ऐसेंसें । उतणें जें संपत्ति मिसें । तो दर्पु गा अनारिसें । न बोलें घेई ॥ २२९ ॥ तैसा अभिमानाचेनि मोहें । ईश्वराचेंही नाम न साहे । बापातें म्हणें मज हे । सवती जाली ॥ २३५ ॥ ऐसा मान्यतेचा पुष्ट गंडु । तो अभिमानी परम लंडु । रौरवांचा रूढु । मार्गचि पै ॥ २३६ ॥ तैसा विद्या विनोद विभवें । देखें पुढिलांचीं दैवें । तंव तंव रोष दुणावें क्रोध तो जाण ॥ २४२ ॥ येर जें क्रियाजात । तें तिखयाचें कर्वत । ऐसें सबाह्य खरखरित । जयाचें गा ॥ २४४ ॥ तो मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आईक खुण । अज्ञानाची ॥ २४५ ॥ हें चोख हें मैळ । ऐसें नेणुनिया बाळ । देखे तें केवळ । मुखींचि घाली ॥ २५० ॥ तैसें पापपुण्याचें खिचटें । करोनि खातां बुद्धि चेष्टे । कडु मदुर न वाटे । ऐसी जे दशा ॥ २५१ ॥ तिये नाम अज्ञान । या बोला नाहीं आन । एवं साही दोषांचें चिन्ह । सांगितलें ॥ २५२ ॥

## श्रुतिमाउलीचें उपकार ( १६ )

तैसा अशेषाही पुरुषार्थी । जो गोसावी हो म्हणे पार्था । तेणें श्रुति स्मृति माथां । बैसणें घापे ॥ ४५९ ॥ शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु ॥ ४६० ॥ ऐशिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरी कें आहे अतिष्ठा । भेटणें गा ॥ ४६१ ॥ पै अहितापासोनि काढिती । हित देउनी वाढविती । नाही श्रुति परौती । माउली जगा ॥ ४६२ ॥

# अध्याय सतरावा.

## श्लोक ( सवाई )

॥ सत्वरजस्तम तीन गुणांसह श्रद्धा तपमान दान असे ॥
॥ अशनहि तैसें निजबीजापरि आवडि त्यांवरी दृढ वैसे ॥
॥ उत्तम मध्यम अधम जाण हीं क्रमें तयांतुनि सत्व धरीं ॥
॥ मग ॐ तत्सत् वदुनि धनंजय ! ब्रह्मसमर्पण कर्म करी ॥ १७ ॥

## श्रीगजाननाची स्तुति.

विश्वविकासितमुद्रा । जया सोडवी तुझी योगनिद्रा । तया नमोजी गणेंद्रा । श्रीगुरुराया ॥ १ ॥ त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गीं आडिला । तो आत्मशंभु सोडविला। तुझिया स्मृति ॥ २ ॥ म्हणोनि शिवेसीं कांटाळा । गुरुत्वें तूंचि आगळा । तऱ्ही हळु माया जळा । माजि तारिसी ॥ ३ ॥ जे तुझ्याविखीं मूढ । तयांलागीं तूं वक्रतुंड । ज्ञानियांसी तरी अखंड । उजूचि आहासी ॥ ४ ॥ दैविकी दिठी पाहतां सानी । तऱ्ही मीलनोन्मीलनीं । उत्पत्ति प्रळय दोन्ही । लीलाचि करिसी ॥ ५ ॥ प्रवृत्तिकर्णाच्या चालीं । उठिलीं मदगंधी निळीं । पूजीजसी नीळोत्पलीं । जीवभृंगाच्या ॥ ६ ॥ पाठीं निवृत्ति-कर्णताळें । आहाळली ते पूजा विधुळें । तेव्हां मिरविसी मोकळें । आंगाचें लेणें ॥ ७ ॥ वामांगींचा लास्यविलासू । जो हा जगद्रूप आभासु । तो तांडव मिसें कळासु । दाविसी

जैसा ॥ २२७ ॥ किंवहुना ऐसेंसें । उतणें जें संपत्ति मिसें । तो दर्पु गा अनारिसें । न बोलें घेईं ॥ २२९ ॥ तैसा अभिमानाचेनि मोहें । ईश्वराचेंही नाम न साहे । बापातें म्हणें मज हे । सवती जाली ॥ २३५ ॥ ऐसा मान्यतेचा पुष्ट गंडु । तो अभिमानी परम लंडु । रौरवांचा रूढु । मार्गचि पै ॥ २३६ ॥ तैसा विद्या विनोद विभवें । देखें पुढिलांचीं दैवें । तंव तंव रोष दुणावे क्रोध तो जाण ॥ २४२ ॥ येर जें क्रियाजात । तें तिखयाचें कर्वत । ऐसें सबाह्य खरखरित । जयाचें गा ॥ २४४ ॥ तो मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आईक खुण । अज्ञानाची ॥ २४५ ॥ हें चोख हें मैळ । ऐसें नेणुनिया बाळ । देखे तें केवळ । मुखींचि घाली ॥ २५० ॥ तैसें पापपुण्याचें खिचटें । करोनि खातां बुद्धि चेष्टे । कडु मदुर न वाटे । ऐसी जे दशा ॥ २५१ ॥ तिये नाम अज्ञान । या बोला नाहीं आन । एवं साही दोषांचें चिन्ह । सांगितलें ॥ २५२ ॥

## श्रुतिमाउलीचें उपकार ( १६ )

तैसा अशेषाही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणें पार्था । तेणें श्रुति स्मृति माथां । बैसणें घापे ॥ ४५९ ॥ शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु ॥ ४६० ॥ ऐशिया वेदैकानिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरी कें आहे अतिष्ठा । भेटणें गा ॥ ४६१ ॥ पै अहितापासोनि काढिती । हित देउनी वाढविती । नाही श्रुति परौती । माउली जगा ॥ ४६२ ॥

# अध्याय सतरावा.

## श्लोक ( सवाई )

॥ सत्वरजस्तम तीन गुणांसह श्रद्धा तपमान दान असे ॥
॥ अशनहि तैसें निजबीजापरि आवडि त्यांवरी दृढ वैसे ॥
॥ उत्तम मध्यम अधम जाण हीं क्रमें तयांतुनि सत्व धरीं ॥
॥ मग ॐ तत्सत् वदुनि धनंजय ! ब्रह्मसमर्पण कर्म करी
॥ १७ ॥

## श्रीगजाननाची स्तुति.

विश्वविकासितमुद्रा । जया सोडवी तुझी योगनिद्रा । तया नमोजी गणेंद्रा । श्रीगुरुराया ॥ १ ॥ त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गीं आडिला । तो आत्मशंभु सोडविला। तुझिया स्मृति ॥ २ ॥ म्हणोनि शिवेसीं कांटाळा । गुरुत्वें तूंचि आगळा । तऱ्ही हळु माया जळा । माजि तारिसी ॥ ३ ॥ जे तुझ्याविखीं मूढ । तयांलागीं तूं वक्रतुंड । ज्ञानियांसी तरी अखंड । उजूचि आहासी ॥ ४ ॥ दैविकी दिठी पाहतां सानी । तऱ्हा मीलनोन्मीलनीं । उत्पत्ति प्रळय दोन्ही । लीलाचि करिसी ॥ ५ ॥ प्रवृत्तिकर्णांच्या चालीं । उठिलीं मदगंधी निळी । पूजीजसी नीळोत्पलीं । जीवभृंगाच्या ॥ ६ ॥ पाठीं निवृत्ति-कर्णताळें । आहाळली ते पूजा विधुळें । तेव्हां मिरविसी मोकळें । आंगाचें लेणें ॥ ७ ॥ वामांगींचा लास्यविलासू । जो हा जगद्रूप आभासु । तो तांडव मिसें कळासु । दाविसी

तूं ॥ ८ ॥ असा विस्मय दातारा तूं होसी जयाचा सोयरा। सोइरिकेचिया व्यवहारा। मुके चि तो ॥ ९ ॥

## त्रिगुणत्व हें अमर आहे

श्रद्धा म्हणीतलियासाठीं। पातेजों नये किरीटी। काय द्विज अंत्यज घृष्टि। अत्यज नोहे ॥ ५१ ॥ तै प्राणिये तंव स्वभावें। अनादि माया प्रभावें। त्रिगुणाचोचि आघवें। वळिले आहाति ॥ ५६ ॥ तेथही दोन गुण खांचती। मग एक धरी उन्नती। तैं तैचियाचि होती वृत्ती। जिवांचिया ॥ ५७ ॥ वृत्ति ऐसें मन धरिती। मना ऐसी क्रिया करिती। केलिया ऐसी वरती। मरोनि देहें ॥ ५८ ॥ बीज मोडे झाड होय। झाड मोडे बीजीं सामाये। ऐसेनि कल्पकोडी जाये। परी जाति न नासे ॥ ५९ ॥ तियापरी इथें अपारें। होत जात जन्मांतरें। त्रिगुणत्व न व्यभिचरे। प्राणियांचें ॥ ६० ॥

## सात्त्विक, राजस व तामस श्रद्धा ( १७ )

तरि जाणिजे झाड फुलें। कां मानस जाणिजे बोलें। भोगें जाणिजे केलें। पूर्वजन्मीचें ॥ ७४ ॥ तैसी जिहीं तिन्हीं श्रद्धेचीं रूपें तिन्हीं। देखीजती तें वानी। अवधारीं पां ॥ ७५ ॥ तरि सात्विक श्रद्धा। जयांचा होय बाधा। तया बहुतकरूनि मेधा। स्वर्गीं आथी ॥ ७६ ॥ ते विद्याजात पढती। यज्ञक्रियें निवडती। किंबहुना पडती। देवलोकीं ॥७७॥ आणि श्रद्धा राजसा। घडलें जें वीरेशा। ते भजनी राक्षसा। खेचराहन ॥ ७८ ॥ जीववधें साधूनि बळी। भूतप्रेत कुळें

मेळीं । स्मशानीं संध्याकाळीं । पूजिती जे ॥ ८० ॥ ते तमोगुणाचें सार । काढुनी निर्मिलें नर । जाण तामसियेचें घर । श्रद्धेचें तें ॥ ८१ ॥ जे हे सात्विक श्रद्धा । जतन करावी प्रवृद्धा । येरी दोनी विरुद्धा । सांडाविया ॥ ८३ ॥

## सात्विक राजस व तामस आहार ( १७ )

येऱ्हवी तरी पाहीं । स्वभाव वृद्धीच्या ठायीं । आहारा वांचूनि नाहीं । बळी हेतु ॥ ११२ ॥ तेवी जैसा घेपे आहारू । धातु तैसाचि होय आकारू । आणि धातु ऐसा अंतरू । भाव पोखे ॥११६॥ तरी सत्व गुणाकाडे जै दैवें भोक्ता पडे । तैं मधुरीं रसीं वाढे । मचु तया ॥ १२५ ॥ आणि मुखीं जैसीं गोडें । तैसीचिही ते आंतुलेकडे । तिये अन्नीं प्रीति वाढे । सात्विकासी ॥ १३० ॥ ऐसा हा सात्विक आहारू । परिणमला थोरू । करी हा उपकारू । सबाह्यासि ॥ १३७ ॥ ऐसा न पुरोनि तोंडा । जिभा केला वेडा । अन्नमिषें अग्नि भडभडां । पोटीं भरीं ॥ १४८ ॥ तैसें एकमेकां सळें । रोग उठती एकें वेळें । ऐसा राजसा आहारू फळे । केवळ दुःखें ॥ १५१ ॥ तरि कुहिलें उष्टें खातां । न मनिजे तेणें अनहिता । जैसें कां उपहिता । म्हैसी खाय ॥ १५४ ॥ ना तरी अर्ध उकडिलें । कां निपट करपूनि गेलें । तैसेही खाय चुकले । रसा जें येवो ॥ १५६ ॥ तया अपेयांचां पानीं । अखाद्यांचा भोजनीं । वाढविजे उतान्ही । तामसें तेणें ॥ १६३ ॥

## शारीरतप, वाचिकतप, मानसिकतप ( १७ )

तया प्रिय देवतांलया । यात्रादिकें करावया । आठही पाहारा जैसें पायां । उळिग घापे ॥ २०२ ॥ लिंग कां प्रतिमा दिठी । देखत खेवो अंगयष्टि । लोटिजे का काठी पडली जैसी ॥ २०४ ॥ अथवा प्रवासे कां पीडा । कां शिणले जे मांकडां । ते जीव सुरवाडा । आणीजती ॥ २०६ ॥ सकळ तीर्थांचिये धुरे । जिये कां मातापितरें । तया सेविसी कीर शरीरें । लोण कीजे ॥२०७॥ आणि संसारा ऐसा दारुण । जो भेटलाची हरी शीण । तो ज्ञानदानी सकरुण । भजिजे गुरु ॥२०८॥ जन्मतेनिप्रसंगे । स्त्रीदेह शिवणें लागे । तेथोनिया आंगे । सोविळें कीजे ॥ २११ ॥ पार्था समस्तही हें करणें । देहाचेनि प्रधानपणें । म्हणोनि ययातें मी म्हणें । शारीर तप ॥ २१४ ॥ तैसें न दुखवितां सेजें । जावळिया सुख निपजे । ऐसें साधुत्व कां देखिजे । बोलणा जिये ॥ २१७ ॥ ऋग्वेदादि तिन्हीं । प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं । केली जैसी वदनीं । ब्रह्मशाळा ॥ २२२ ॥ ना तरी एकाधें नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसे तें वाग्भव । तप जाणावें ॥ २२३ ॥ तैसीं नाना विकल्प जाळें । सांडूनि गेलिया सकळें । मन राहे कां केवळें । स्वरूपें जें ॥ २२७ ॥ मग न चलतें कळंकेवीण । प्रतीबिंब जैसे नित्य परिपूर्ण । तैसें चोखी श्रृंगारपण । मनाचें जे ॥ २३० ॥ काय बहू बोलों अर्जुना । जै हे दशा ये मना । तैं मनस्तपोभिधाना । पात्र होय ती ॥ २३६ ॥

## सात्विक, राजस, व तामस तप [ १७ ]

जैं पुरतिया सत्व शुद्धि । आचरिजे आस्तिक्य बुद्धि । तैं तयातेंचि गा प्रबुद्धि । सात्विक म्हणिपे ॥ २४१ ॥ हें असो धन मानीं आस । वाढउनी तप कीजे सायास । तैं तेंचि तप राजस । बोलिजे गा ॥ २४७ ॥ किंबहुना हें बोखटी । घेऊनी क्लेशाची हातवटी । तप निफजे तें किरीटी । तामस होय ॥ २६२ ॥

## सात्विक, राजस, व तामस दान ( १७ )

तरि स्वधर्माआंतौतें । जें जें मिळेल आपणयातें । तें तें दीजे बहूतें । सन्मान योगें ॥ २६६ ॥ ऐसिया जें सामग्रिया । दान निफजे वीरराया । तें सात्विक दान वर्या । सर्वांही जाण ॥ २८३ ॥ परि मनीं धरूनि दुभतें । चारिजे जेविं गाईतें । कां पेव करूनि आइतें । पेरूं जायिजे ॥ २८५ ॥ काय बहु सांगों सुमति । जें दीजे या मनोवृत्ति । तें दान गा त्रिजगतीं । राजस पै ॥ २९३ ॥ तेथ विभांडुनियां जग । आणिले पदार्थ अनेग । तेणें घालूं लागे मातंग । गवादिसि ॥ २९९ ॥ एवं ऐसेनि जे देणें । तें तामस दान मी म्हणे । आणि घडे दवैगुणें । आणिक ऐक ॥ ३०० ॥

## ॐ नामाचे सामर्थ्य [ १७ ]

तरी सर्व मंत्रांचा राजा । तो प्रणव आदि वर्णु बुझा । आणि तत्कारु दुजा । तिजा सत्कारू ॥ ३४२ ॥ परि हें असो ऐसिया । या यज्ञदानादि किया । ओंकारें आदरिलें ।

सावाइलिया । प्रवर्तती ॥ ३६७ ॥ आतां ओंकारें आदरिलें । तत्कारें समर्पिले । इया रीती जया आलें । ब्रह्मत्व कर्मा ॥ ३७३ तेव्हां ओंकार तत्कारीं । सावायिला हा चांगीपरी । सच्छब्दु कर्मा करी । जीर्णोद्धार ॥ ३९१ ॥ गाठीं बांधिली खापरी । येथ अथवा पैल तिरीं । न सरोनि जैसी मारी । उपवासी गा ॥ ४२० ॥ तैसे कर्मजातें तेणें । नाहीं ऐंहिकिचे भोगणें । तेथ परत्र तें कवणें । अपेक्षावें ॥ ४२१ ॥ म्हणोनि ब्रह्म नाम श्रद्धा । सांडूनि कीजे जो धांदा । हें असो सिणू नुसता । दृष्टादृष्टी तो ॥ ४२२ ॥

## नमन.

जय जय देव निर्मळ । निजजनाखिळ मंगळ । जन्मजरा जलदजाळ । प्रभंजन ॥ १ ॥ जयजय देव प्रबळ । विदळिता मगळकुळ । निगमागमद्रुमफळ । फलप्रद ॥ २ ॥ जयजय देव सकळ । विगतविषयवत्सल । कलितकालकौतूहल । कलातीत ॥ ३ ॥ जय जय देव निश्चळ । चलितचित्तपान तुंदिल । जगदुन्मीलना विरळ । केलि प्रिय ॥४॥ जय जय देव निष्कळ । स्फुरदमहानंद बहळ । नित्यनिरस्ताखिलमळ । मूळभूत ॥ ५ ॥ जय जय देव स्वप्रभ । जगदंबुदगर्भनभ । भुवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ॥ ६ ॥ जय जय देव विशुद्ध । अविद्योदानद्विरद । शमदममदनभेद । दयार्णव ॥ ७ ॥ जय जय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प । भक्तभाव भुवनदीप । तापापह ॥ ८ ॥ जय जय देव अद्वितीय । परिणतोपरमैक

प्रिय । निजजनाजित भजनीय । मायागम्य ॥ ९ ॥ जय जय देव श्री गुरो । अकल्पनाकल्पतरो । स्वसंविद्रुमबीजप्ररो इणावनी ॥ १० ॥

# अध्याय अठरावा.

## श्लोक (सवाई).

त्यजूं पाहसी युद्ध परी तें प्रकृति करविल तुजकडुनी ।
तरि वद पार्था परिसुनि गीता रुचते ममता कां अर्जुनी ॥
मग तो वदला मोह निरसला संशय नुरला खरोखरी ।
कृतार्थ झालों प्रसाद तव हा वचन तुझें मज मान्य हरी ॥१॥

## काम्य, नैमित्तिक व नित्यकर्मे (१८).

देहाचिया गांवा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळ्या । न म्हणों नये धनंजया । जियापरी ॥ १०१ ॥ कां ललाटीचें लिहिलें । न मोडे गा कांहीं केलें । काळे गोरेपण धुतलें । फिटों नेणें ॥ १०२ ॥ केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसें । न फेडितां ऋण जैसें । वोसंडी ना ॥ १०३ ॥ काम्यकर्मी हें एक । सामर्थ्य आथी स्वाभाविक । म्हणोनि नको कौतुक । मुमुक्षु एथ ॥ १०६ ॥ आणि सोमसूर्य ग्रहणें । येऊनि करविती पार्वणें । कां मातापितर मरणें । अंकित जे दिवस ॥ ११० ॥ अथवा अतिथी हन पावे । हें ऐसेसें पडे जें करावें । तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा ॥ १११ ॥ तैसें नित्य जें कां कर्म । तें निमित्ताचें लाहे नियम । एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ॥ ११४ ॥ आणि सायंप्रातर्मा-

ध्यान्हीं । जें कां करणीय प्रतिदिनीं । परि वृष्टि जैसी लोचनीं। अधिक नोहे ॥ ११५ ॥ हेंचि नित्य नैमित्तिक । अनुष्ठेय अवश्यक । म्हणोनि म्हणों पाहती एक । वांझ ययातें ॥११॥ परी भोजनीं जैस होये । तृप्ति लाभे भूक जाये । तैसें नित्य नैमित्तिकीं आहे । सर्वांगीं फळ ॥ १२० ॥

## तामस, राजस, व सात्विकी त्याग (१८).

कीं स्वभावें आलें विभागा । तें कर्मचि वोसंडी पै गा ।तरि झणें आतळा त्यागा । तामसा तया ॥ १८३ ॥ ऐसा शरिराचिया क्लेशा । भेणें कर्म वीरेशा । सांडि तो परियेसा । राजस त्याग ॥ १९२ ॥ तरी स्वाधिकाराचेनि नांवें । जें वांटिया आलें स्वभावें । तें आचरे विधिगौरवें । शृंगारोनी ॥२००॥ हा तो त्याग तरुवरु । जो गा मोक्ष फळे ये थोरु । सात्विक ऐसा उगरू । यासीच जगीं ॥ २०७ ॥

## इच्छा नसलीं तरी मनुष्याच्या हातून कर्म घडतेंच. [ १८ ]

आणि हां गा सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची । खंती करिती कर्माची । तें गांवढे गा ॥ २१८ ॥ मृत्तिकेचा वीट । घेऊनि काया करील घट । केउतें तंतु पट । सांडील तो२१९ हिंग त्रासला भाणीं । तरी कैंचें सुगंधत्व आणी । द्रव सांडूनि पाणी । कें राहे तें ॥२२१॥ तैसा शरिराचेनि अभ्यासें । नांदतु जन असें तंव कर्म त्यागाचें पिसें । काइसें तरी॥२२२॥ आपण लाविजे टिळा । म्हणोनि पुसोये वेळवेळां । मा घाली फेडी

निढळा । कां करूं ये गा ॥ २२३ ॥ या शरीराचेनि मिसकें । कर्मचि लागलें असिकें । जिता मेल्यियां न ठाके । इया रिती ॥ २२६ ॥

## कर्माचीं पांच कारणें, अधिष्ठान, कर्ता साधनसामुग्री, कार्य, दैव. ( १८ )

तैसी यया लक्षणें । आइकें पांच कारणें । तरि देह हें मी म्हणे । पहिलें एथ ॥ ३१५ ॥ किंबहुना अवस्था त्रया । हें अधिष्ठान धनंजया । म्हणोनि देहा यया । हेंचि नाम ॥ ३२० ॥ आणि कर्ता हें दुजें । कर्माचें कारण जाणिजे । प्रतिबिंब म्हणिजे । चैतन्याचें जें ॥ ३२१ ॥ प्रकृती करी कर्मे । तो त्यां केलीं म्हणें भ्रमें । येथ कर्ता येणें नामें । बोलिजे जीव ॥ ३२६ ॥ तेवि बुद्धीचें एक जाणणें । श्रोत्रादिभेदें येणें । बाहेरि इंद्रियपणें । फांके जें कां ॥ ३३० ॥ तें पृथग्विध करण । कर्माचें इया कारण । तिसरें गा जाण । नृपनंदना ॥ ३३१ ॥ ते भेदली वृत्तिपंथें । वायुशक्ति गा एथें । कर्मकारण चौथें । ऐसें जाण ॥ ३४३ ॥ तें देववृंद बरवें । कर्मकारण पांचवें । अर्जुना एथ जाणावें । देवो म्हणे ॥ ३५१ ॥

## सात्विक, राजस व तामस ज्ञान ( १८ )

तरी अर्जुना गा तें फुडें । सात्विक ज्ञान चोखडे । जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ॥ ५२९ ॥ तरि पार्था परियेस तें ज्ञान गा राजस । जें भेदाची कांस । धरूनि चाले ॥ ५३८ ॥

तरि किरीटी जें ज्ञान।हिंडे विधीचेनि वस्त्रेंहीन। श्रुति पाठमोरी नग्न। म्हणोनि तया॥ ५४९॥

## सात्विक राजस तामस कर्म ( १८ )

तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परि फळ न सुये दिठी। उखिती क्रिया पैठीं। ब्रह्मीची करी॥ ५९०॥ तें काम्यकर्म सक्लेश। जाणावें येथ राजस। आतां चिन्ह परिसा। तामसाचें॥६१०॥ तरि तें गां तामस कर्म। जें निंदेचें काळें धाम। निषेधाचें जन्म। साच जेणें॥ ६११॥ तैसें कृत्याकृत्य सरकटित। आपपर नुरवित। कर्म होय तें निश्चित। तामस जाण॥ ६२६॥

## सात्विक राजस तामस कर्ता [ १८ ].

ना तरी आदरिलें। अव्यंग सिद्धी गेलें। तरी तेंही जिंतिलें। मिरऊं नेणें॥ ६४७॥ इया कर्म करितां। देखिजे जो पांडुसुता। तयातें म्हणिपे तत्वता। सात्विक कर्ता॥ ६४८॥ तैसें मनें वाचा कायें। भलतया दुःख देत जाये। स्वार्थ साधितां न पाहे। पराचें हित॥ ६५६॥ कर्मीं राहाटी ऐसी। जयातें होती देखसी। तोचि जाण त्रिशुद्धिसी राजस कर्ता॥ ६६१॥ आणि मन जयाचें कलाली। राहाटी फुडी चोरिली॥ दिठी कीर ते बोली। पण्यांगनेची॥ ६७२॥ ऐसा जो लोकां आंत पापपुंज मूर्त। देखसी तो अव्याहत। तामस कर्ता॥ ६८८॥

## सात्विक राजस व तामस बुद्धि [ १८ ].

ऐसेनि कार्याकार्य विवेकीं । जे प्रवृत्ति निवृत्ति मापकी । खराकुडा पारखी । जियापरी ॥ ७१६ ॥ तैसी कृत्याकृत्य शुद्धी । बुझे जे निरवधी । सात्विक म्हणिपे बुद्धि । तेचि तूं जाण ॥ ७१७ ॥ तैसें अकरणीय अवचटें । नोडवे तरीच लोहे । येरवी जाणें एकवटें । दोन्ही जें का ॥ ७२२ ॥ ते गा बुद्धि चोखविखी । जाण येथ राजसी । अक्षत टाकिली जैसी । मांदिये वरी ॥ ७२३ ॥ तैसे धर्मजात तितकें । जिये बुद्धीसी पातकें । साच तें लटिकें । ऐसेंचि बुझे ॥ ७२६ ॥ कोणा-तेही न पुसतां । तामसी जाणावी पंडुसुता । रात्री काय धर्मार्थे । साच करावी ॥ ७२९ ॥

## सात्विक, राजस तामस धृति ( १८ )

संकल्पविकल्पाचें लुगडें । सांडूनि मन उघडे । बुद्धि मागिले इकडे । उगीची बैसे ॥ ७४० ॥ ते गा धृति येथें । सात्विक हें निरुतें । आईक अर्जुनातें । श्रीकांत म्हणे ॥ ॥ ७४४ ॥ जें कर्म भांडवला सुये । तयाची चौगुणी येती पाहे । येवढे साहस वाहे । जया धृती ॥ ७४७ ॥ ते गा धृति राजस । पार्था येथ परियेस । आतां आईक तामस । तिसरी जे कां ॥ ७४८ ॥ एवं पांचही हे निद्रादिक । तामसांच्या ठाईं दोख । जिया धृती देख । धरिले आहाती ॥ ७६१ ॥ तिये गा धृति नांवें । तामसी येथ हें जाणावें । म्हणीतले तेणें देवें । जगाचेनि ॥ ७६२ ॥

## सात्विक, राजस तामस सुख ( १८ )

तरि सुख तें गा किरीटी । दाविजेल तुज दिठीं । जें आत्मयाचिये भेटी । जीवासि होय ॥ ७७३ ॥ तेव्हां सांगरीं गंगा जैसी । आत्मीं मीनल्या बुद्धि तैसी । अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ॥ ६९२ ॥ ऐसें स्वानुभवविश्रामें । वैराग्य मूळ जें परिणमे । तें सात्विक येणें नामें । बोलिजे सुख ॥ ७९३ ॥ पैं नामें विष मधुर । परि मारूनि अंतीं खरें । तैसें आदि जें गोडिरें । अंतीं कडु ॥ ८०४ ॥ पार्था तें सुख साचें । वळिलें आहे रजाचें । म्हणोनि न शिवें तयाचें । आंग कहीं ॥८०५॥ जें आलस्यावरी पोखिजे । निद्रेमाजी जें देखिजें जयांच्या आद्यंतीं भूलिजे । आपुली वाट ॥ ८०८ ॥ तें गा सुख पार्था । तामस जाण सर्वथा । हें बहु न सांगोंचि जे कथा । असंभाव्य हें ॥ ८०९ ॥

## ब्राम्हणांचें कर्म ( १८ )

ऐसा बुद्धिचा उपरसु । तया नाम म्हणिपे शसु । तो गुण गा उपक्रसु । जया कर्माचा ॥ ८३४ ॥ तो पै गा शमा विरजा । दम गुण जेथ दुजा । आणि स्वधर्माचिया वोजा । जिणें जें कां ॥ ८३६ ॥ तेविंचि सटवीचिये राती । न विसंबिजे जेविं वाती । तैसा ईश्वरनिर्णय चित्तीं । वाहणें सदां ॥ ८३७ ॥ तया नाम तप । हें तिजया गुणाचें रूप । आणि शौचही निष्पाप । द्विविध जेथ ॥ ८३८ ॥ मन भाव शुद्धी भरलें । आंग क्रिया कळंकारिलें । ऐसें सबाह्य जियालें । साजिरें जें

कां ॥ ८३९ ॥ तया नाम शौच पार्था । तो कर्मीं गुण जयें चौथा । आणि पृथ्वीचियापरि सर्वधा । सर्व जें साहाणें ॥८४०॥ ते गा क्षमा पांडवा । गुण जेथ पांचवा । स्वरांमाजीं सुहावा । पंचम मेळा ॥ ८४१ ॥ तैसें शास्त्राचारें तेणें. ईश्वरच एक पावणें । हें फुडें जें कां जाणणें । तें येथ ज्ञान ॥ ८४५ ॥ तरी सत्वशुद्धीचिये वेळे । शास्त्रें कां ध्यान न वळे । ईश्वर तत्वींचि मिळे । निष्टंक बुद्धि ॥ ८४७ ॥ हें विज्ञान बरवें । तें गुणरत्न जेथ आठवें । आणि आस्तिक्य जाणावें नववा गुण ॥ ८४८ ॥ पै राजमुद्रा आथिलिया । प्रजा भजे भलतयां । तेविं शास्त्रें स्वीकारलिया । मार्गमात्रातें ॥ ८४९ ॥ आदरें जें कां मानणें तें आस्तिक्य मी म्हणें । तो नववा गुण जेणें । कर्म तें साच ॥ ८५० ॥ एवं नवही शमादिक । गुण जेथ निर्दोष । तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥८५१॥

## क्षत्रिय वैश्य व शूद्र यांचें कर्म ( १८ )

ऐसें जें शौर्यादिकीं । इहीं सात गुण विशेखीं । अळंकृत सप्तऋखीं । आकाश जैसें ॥ ८७३ ॥ तैसें सप्तगुणीं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र । तें सहज जाण क्षात्र । क्षत्रियाचें ॥ ८७४ ॥ तरि भूमि बीज नांगरु । यया भांडवलाचा आधारु । घेऊनि लाभ अपारु । मेळवणें जें ॥ ८८० ॥ किंबहुना कृषी जिणें । गोधनें राखोनि वर्तणें । कां समर्घाची विकणें । महार्घ वस्तु ॥ ८८१ ॥ येतुलाचि पांडवा । वैश्याते कर्मांचा मेळावा । हा वैश्यजातिस्वभावा । आंतुला जाण॥८८२॥

आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । द्विजन्मे तिन्हीं वर्ण । ययांचें जें सुश्रूषण । तें शूद्रकर्म ॥ ८८३ ॥ पै द्विजसेवे परौतें । धांवणें नाहीं शूद्राते । एवं चतुर्वर्णोचितें । दाविलीं कर्मे ॥ ८८४ ॥

## विहित कर्माची महती ( १८ )

हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा । आणि हीच परमसेवा । मज सर्वात्मकाची ॥ ९०६ ॥ तैसें आपलिया विहिता । उपाय असें न विसंविता । ऐसा कीजे कीं जगन्नाथा । आभार पडे ॥ ९१० ॥ अगा जयाचें विहित । तें ईश्वराचें मनोगत । म्हणोनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो ॥ ९११ ॥ तैसें स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परम सेवा । येर तें गां पांडवा । वाणिज्य करणें ॥ ९१३ ॥

## स्वधर्माचें अनुष्ठान ( १८ )

अगा आपुला हा स्वधर्मु । आचरणीं जरी विषमु । तरी पहावा तो परिणामु । फळेल जेणें ॥ ९२३ ॥ तेवि स्वधर्म सांकडु । देखोनि केला जरी कडु । तरी मोक्ष सुरवाडु । अंतरला कीं ॥ ९२६ ॥ आणि आपुली माये । कुब्ज जरी आहे । तरी जीजेतें नोहे । स्नेह कुऱ्हें कीं ॥ ९२७ ॥ म्हणोनि जें विहित जया जेणें । फिटे संसाराचें धरणें । क्रिया कठोर तऱ्ही तेणें । तेंचि करावी ॥ ९३१ ॥ आणि स्वधर्मुचि पाळावा । परधर्मु तो गाळावा । हा नेमुही पांडवा । न कीजेचि पै ॥ ९३४ ॥ तैसें आवडतेंहि करणें । न निपजे शिणल्याविणें । तरि विहित बोरें कोणें । बोलें भारी ॥ ९४५ ॥

म्हणोनि करावा स्वधर्मु । जो करितां हिरोनि घे श्रमु । उचित देईल परमु । पुरुषार्थराजु ॥ ९४९ ॥

## सर्वसंग्रह अध्याय १८

समर्थाचिये पंक्तिभोजनें । तळिल्या वरिल्या एक पक्कान्नें । तेवि श्रवणें अर्थें पठणें । मोक्षाचि लाभे ॥ ४८ ॥ निपटूनि कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यास म्हणिजे । फळमात्र कां त्यजिजे । तो त्याग गा ॥ ९२ ॥ तीर्थें बाह्य मळ क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ॥ १६० ॥ जो मोलें तीर्था जाये । तया मी यात्रा करीत आहे । ऐसिये श्लाघ्यतेचा नोहे । तोष जेवीं ॥ १६७ ॥ जैसा निंब जिभे कडवटु । हिरडा पहिले तुरटु । तैसा कर्मा ऐल शेवटु । खणुवाळा होय ॥ १८६ ॥ आपणचि विऊनि दुहिता कीं न मम म्हणे पिता । तो सुटे की प्रतिग्रहिता । जावाई शिरके ॥ २३४ ॥ तैसें कर्ता कर्म करूं । अकर्ता फळाशा न धरू । एथ न शके आवरूं । दोहींतें कर्म ॥ २३६ ॥ तैसें हारपलें आपणये पावे । तें संतातें पाहातां गिवसावें । म्हणोनि वानावें ऐकावें । तेचि सदां ॥ ४०० ॥ तैसा देहाभिमान गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया । जालें तें अपैसया । चेष्टवीच तें ॥ ४२८ ॥ कां महासतीचें भोग । देखे कीर सकळ जग । परि ते आगी ना आंग । नालोक देखे ॥ ४४० ॥ पै चित्रींचें जळ हुताशु । तो दृष्टीचाचि आभासु । पटीं अग्नि वोलांशु । दोन्ही नाहीं ॥ ४४६ ॥ मुक्ताचें देह तैसें ।

हाले चाले संस्कारवशें । तें देखोनी लोक पिसे । तो कर्ता म्हणती ॥ ४४७ ॥ कां अदृष्ट जालिया उदासु । पालटे श्रीमंताचा विलासु । पूर्णिमेपाठीं शीतांशु । पालटे जैसा ॥ ४९६ ॥ तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ ९१७ ॥ म्हणोनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धि देइजे । पसाय तया ॥ ९१८ ॥ पै शिळा कां सिंदोरिया । दाटणें एक धनंजया । परि जे वाहातां विसावया । मिळिजे तें घेपे ॥ ९३८ ॥ येऱ्हवी कणा आणि भूसा । कांडिताहि सोस सरिसा । जेंवि रंधन श्वानमांसा । तेंचि हवी ॥ ९३९ ॥ दधि जळाचिया घुसळणा । व्यापार सारिखेचि विचक्षणा । वाळुवे तिळा घाणा । गाळणें एक ॥ ९४० ॥ एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन । अद्वया मज गमन तो चाले तेंचि ॥ ११८० ॥ तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जपु माझा । तो निजे तेचि कपिध्वजा। समाधी माझी॥ ११८१॥ हा गा रोग काई रोगिया । आवडे दरिद्र दरिद्रिया । परि भोगविजे बळिया । अदृष्टें जेणें ॥ १२९७ ॥ स्वमायेचें आड वस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । बाहेरी नटी छाया। चित्र । चौऱ्यासीं लक्ष ॥ १३०३ ॥ ऐसेनि शरिराकारीं । यंत्रीं भूतें अवधारीं । वाहूनि हालवी दोरी । प्राचीनाची ॥ १३०८ ॥ अर्जुनपण न घेतां । मीं ऐसें जें पांडुसुता । उठतसे तें तत्वता तयाचें रूप ॥ १३१५ ॥ तया अहंवाचा चित्त अंग । देऊ-

निया शरण रिग । महोदधी कां गांग । रिगालें जैसें॥१३१९॥ आत्मज्ञानें चोखडी । संत जे माझी रूपडी । तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ॥ १३५६ ॥ सुवर्णमणि सोनयां । ये कल्लोळ जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ १४०० ॥ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया । त दासिरूंहि कीं तया । समान होय ॥ १४०३ ॥ मा मी विश्वेश्वर भेटें । आणि जीवग्रंथि न सुटें । हे बोल नको वोखटें । कानीं लाऊं ॥ १४०४ ॥ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥ १४२१ ॥

## ज्ञानोबारायाचें मागणें व श्रीनिवृत्तिनाथांचा आशीर्वाद

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १७९३ ॥ जें खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ १७९४ ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ १७९५ ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ १७९९ ॥ येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो । येणें वरें ज्ञानदेवो सुखिया जाला ॥ १८०१ ॥

———

## मोघे यांच्या शेवटल्या ओव्या.

आतां म्हणा हो जन सकल । पुंडलीकवरदे हरिविठ्ठल ।
ऐसी प्रेमाची भेट सर्वकाळ । तुम्हा आह्मा घडावी ॥ १ ॥
सर्वा देवता वरदा भवंतु । शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु।
मनोरथा सफलाः संतु । कल्याणमस्तु तथास्तु ॥ २ ॥

॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

---

## यशप्राप्ति कोणास होते. ( १८ )

चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेका। असणे कीं जी ॥ १६३२ ॥ दया तेथें धर्मु । धर्मु तेथें सुखागमु । सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ॥ १६३४ ॥ गुरु तेथ ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन । दर्शनी समाधान । आथीं जैसें ॥ १६३६ ॥ तैसें सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी का सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥ १६३८ ॥ कृष्ण विजय स्वरूप निजांगे । तो राहिला असें जेणें भावें । तै जय लाग वेगें । तेथेंचि आहे ॥ १६४० ॥ विजयीं नामें अर्जुन विख्यातु । विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु ॥ श्रियेसि विजय निश्चितु । तेथेंचि असे ॥ १६४१ ॥ म्हणोनि जिया वाही उभा । तो लक्ष्मीचा वल्लभा । तेथे सर्व सिद्धि स्वयंभा। येर मी नेणें ॥ १६४७ ॥

## गीतामहात्म ( १७ )

ये गीतेचा पाठ जो जाणें । तयाचेनि सांगातीपणें । गीता लिहूनि वाहणें । पुस्तकमिषें ॥ १४६१ ॥ म्हणोनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता । श्रीकृष्णे पांडुसुता । उपदेशिली ॥ १४६५ ॥ परिवात्साचेनिवोरसे । दुभतें होय घरा उद्देशें । जालें पांडवाचेनि मिषें जगदुद्धारण ॥ १४६७॥ गीतापाठकासि असें । फळ अर्थज्ञाचि सरिसें । गीता माउलिये कीं नसे । जाणें तान्हें ॥ १५२८ ॥ म्हणोनि मनें काया वाचा । जो सेवक होईल इयेचा । तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥ १६६७ ॥

# प्रस्तुत ग्रंथांतील कठीण शब्दाचे अर्थ.

## अध्याय पहिला

आद्या = ओंकार
शारदीचिये = शरदृतूच्या
चकोरतलगे = जमिनीवर राहणाऱ्या चकोरपक्षांचीं पिलें
हळुवारपण = मऊपणा
झोंबिजे = झटावें
फेडिला = नाहींसा केला
कोडें = आवडीनें
उत्तीर्ण = मुक्त
आया = आटोक्यांत
राया = धृतराष्ट्रा
वानर = मारुती

## अध्याय दुसरा

अपभ्रंशु = मुकणें
झणें = कदाचित
उपाधिमाजि = जगामध्यें
आप्लविती = बुडविती
रोहिणीचें = मृगजळाचें
भद्रजाति = गजांतलक्ष्मी
लाहाणें = प्राप्त करून घेणें
कीर = निश्चयें
ठेलयाही = राहिले असतांही
सगुण = सफळ
आर्ति = आशा
अडपैचिंजेना = अडचणींत पडत नाहीं
अनवच्छिन्न = अखंड
स्थितप्रज्ञ = निश्चल बुद्धीचा पुरुष
अयुक्तपण = अनियमितपणा
आक्रमिला = ओढिला

## अध्याय तिसरा

अधिष्ठान = आश्रय
सांडी मांडी = त्याग व ग्रहण
आर्ति = इच्छा
स्वप्नावबोध = निजणें व जागणें
वचावें = जावें
मखु = यज्ञ
सत्यलोकनायक = ब्रह्मदेव
मोहरे = मार्गास
स्तन्य = दूध
आर्जवावी = मिळवावी
पंचत्वा = पांच ठिकाणीं पाचतत्वास
कुरुठा = घरटें

## अध्याय चवथा

बिक = बळ
आरौतें = अगोदर
निकें = अनुकूल

वागूर = जाळें
आथि = आहे
वोळगोनी = सेवा करून
पाहेल = उजेडेल
मूळवणें = घालवणें
आपुल्याचेनि = माझ्या भक्तांच्या कैवारानें

## अध्याय पांचवा

से = आठवण
गिंवसुये = झांकतां येते
सांगडे = सारखे
महुर = मधुर
सुखप्रवाद = उपभोगांत सुख आहे हें बोलणें
आमीषकवल = मांसाचा घांस
वसौटा = आश्रय
कुमुददळाचेनि ताटें = चंद्रविकासिनीकमल
वाणी = न्यूनता

## अध्याय सहावा

नाथिलिया = लटिक्या
स्वस्ति = कल्याण
अटुवें = संकुचित
हियें = छाती
टिटांतु = पायांत
मविजे = मोजावा
क्रियाजात = सर्व कर्में
धातुसाम्य = शरीरगत रक्तादिकांत धातूंचें साम्य
भातें = पोटगी
सोके = चटक लागून राहाते
दत्तचित्त = लक्ष दे
किडळाचा = हिणकटाचा
पंधरें = उत्तम कशी सोनें
कुळवाडी = उदीम, व्यापार.
सुरवाडी = सुखांत
सांटोवाटी = चित्त देऊन त्याच्या बदला बोल घ्यावे
मृगसेवडी = कृष्णाजीन

## अध्याय सातवा

पडळ = पडदा
जवनिका = पडदा
मुक्ताफळें = मोतीं
धारसे = प्रवाह
उभडे = झरे
झळंबति = विरघळवितात
हुडे = बुरूज
वहिलेपणें = त्वरेनें
वोभाणें = प्रवाह
तागा = लाग

सकामा = विषयी पुरुषास स्त्री जिवत नाहीं

आत्मनिवेदन = आत्मा ईश्वरास अर्पण करणें

तरांडे = तारूं

परम प्रकृती–आत्मस्वरूप.

वाहाणी–मार्गी.

पांजरा–पिंजरा.

प्रतीतिपाखी–अनुभवरूप पंखानें.

चिदंबरा–चिदाकाशास.

गोसाविया–धनी कां होऊं नये.

आयणी–तत्वनिर्णयेच्छा.

व्याजें–निमित्तें

## अध्याय आठवा.

अधिभूत–शरीर

अधिदैवत–जीव

अधियज्ञ–परमात्मा

आहाच–लटके

उपार्जिले–उत्पन्न केले

उपशमी–लयातें पाववी

साकें–डाकलग

पालवे–पदरानें

आथावीं–खोल

आतले–व्यापले

उपास्ति–उपासना

ग्लानी–दुःखीं

आभार–ओझें

निरुती–निश्चय

## अध्याय नववा

अशुद्ध–रक्त

दर्दुरी–बेडुक

लोह्या–मोहोरा

गळाळा–घोट

शुक्तिका शिंप

लवडसवडी–लगबगीनें.

डहुळिते–घुसळत

वाणिचा–बोलण्याचा

तंतुसमवाय–तंतूचा समुदाय.

परिवरीं–घरांत.

गृहव्यापारप्रवृत्तिहेतु–गृहकृत्यांची प्रवृत्ति होण्यास कारण

यम–मनाचा निग्रह

दम–इंद्रियांचा निग्रह

कडसणी–विचार

धवळलें–स्वच्छ केलें.

भोजे–आवडीनें

वोळगिजे–आश्रयिजे

उमरडोनी–उलंघून

प्रबंध–ग्रंथ

आत्मचर्चा—आत्मानात्मविचार
नियमिलासांता—आज्ञा दिली असतां
म्हणियागते—चाकर
पाउटी—पायरी
उटी—तेज
कवडा—द्रव्य
चेंपू—बोट लावतां येत नाहीं
त्रयीधर्म—वेदोक्तधर्म
अजातपक्ष—पंख न फुटलेले
योगक्षेम—अप्राप्ताची प्राप्ति व प्राप्ताचें संरक्षण
वोडवी—पुढेंकरी
लेखें—समज
तुरंबावें—हुंगावें
जियालेपण—जगणें
सुणियांचे—कुत्र्यांचे
भाणें—ताट वाढलें
वज्रांगी—बळकट कवच
उत्संगी—मांडीवर
पाल्हाळी—विस्तारलें.
डावलोनि—ढकलून
वाखती – खळगी
शतजर्जर – शंभर भोकांची
सुवावे – घालावें
वोडण – ढाल
वोढवी – पुढें करी
अनन्य – अन्य आश्रय न करणारा
निदैव – हतभाग्य
सौरस – गोडी

## अध्याय दहावा.

विशदबोधविदग्धा – स्पष्ट बोध करण्याविषयीं कुशल
विद्यारविंदप्रबोधा – विद्यारूप कमळास विकासविणारा
पराप्रमेयप्रमदा – प्रकृती स्त्रीशीं विलास करणारा
तरुणतरतूर्या – अत्यंत तरुण तूर्येचें लालन हीच ज्याची लीला
मन्मथमन्मथा – मदनाचें मंथन करणारा
भवेभकुंभभंजना – संसारगजाचें गंडस्थळ फोडणारा
विश्वोद्भवभुवना – जगदुत्पत्तिस्थान
सौरस—प्रसाद
सारस्वती—सर्व विद्यांत

दिठी – दृष्टी
पारुखे – स्थीर होणें
तुकें – साम्यपावें
चारी मनु – स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस
स्त्राजिले – उत्पन्न केले
परिपाडु – थोरी
श्रुताधीत—ऐकलेले व अध्ययन केलेले

## अध्याय अकरावा

अवगणिया – सोंनें
गुणिया – गारुडया
पोटाळूनिया – आलिंगून
कपोल – गाल
धरा – पृथ्वी

## अध्याय बारावा.

अनवरत – निरंतर
ताटी—मूर्छा
आधारशक्तिचियाअंकीं—मूलाधार चक्राच्यामांडीवर
पासखी—पाळणा
परिये—झोके
निजे —गुह्य उपदेशानें
प्रत्क्च्योती—प्रत्यगात्मा
सतरावी—जीवनकळा
हल्लर – गाणे
अधिष्ठी – आश्रय देई
धात्रा – ब्रह्मदेव
बोचरिया – बोथऱ्याला
आनौती – अन्यत्र, दुसरी
कोरान्न – कोरडी भिक्षा
अंतराळे—अंतरिक्षांत
प्रांजळे—आप्त
कस – बळ
सरळी – मोकळीक
चळतडे – व्यापार करते
जेडते – जिकडे
तनुत्यागीं – मरणसयीं
आत्मजा – कन्या
वसुधा – पृथ्वी
धात्री – पृथ्वी
पढिये—आवडता होय
ठेला—नाहीं झाला
निरुतें—खरें

## अध्याय तेरावा.

अधिकरण—आश्रय स्थान
शब्जसृष्टी—वाचाबळ
आंगवे—प्राप्त होतें
खणुवाळ—कठीण
दुहिता—कन्या

प्रतिगृहिता–दान घेणारा
गिवसावे–शोधून घ्यावे
वानावें–वर्णावें
अपैर ः –आपोआप
आभास भ्रांति
वोलांश–ओलावा
संस्कारवशें–पूर्व कर्मानें
शीतांशु–चंद्र
रिझलेनि–संतुष्ट झाल्याने
पसाय–प्रसाद
दाटणें–ओझें
विसावया–विश्रांतीस
कणा=धान्य
भुसा–फोल
सोससरिसा—श्रमसारखाच
रंधन–शिजविण्याची खटपट
अदृष्टें–प्रारब्धानें
नटी–नाचवितो
प्राचीनाचीपू—र्वकर्माची
तया--त्या हृदयस्थाला
अहंवाचा चित्त आंग—मी हें स्फुरण, शरीर, वाचा व मन
गांग--गंगोदक
द्वैत--दोघांचें देह वसेंच असतां
प्राकृताहि—साधारण
दासिरू–बटीक
जीवग्रंथी–जीवदशा
कानीं लाऊं—ऐकूं
वाग्यज्ञे–ग्रंथरूपयज्ञानें
व्यंकटी—कुटिलता
विश्वेश्वरावो- श्रीगुरु
दान पसावो--दान प्रसाद
सारस्वत – सर्वविद्या
पारुष – शिळे
वोळगणें – आश्रयभूत
अवतरण – आगमन
उन्मेषासि – ज्ञानाला
पितामहाचा – ब्रह्मदेवाचा
क्षेत्र – शेत
क्षेत्रज्ञ – जीव
संगोपोनि – पोसून
वाहतेनि – सव्यापार
भौतिकें – शरीरें
पांचांही –
ज्ञान – ज्ञानेंद्रिय
उखी विखी – विचार
मुखी – मुख्य
सुये – बळघाली
लाठी – दांडगा
कुहर – कोठर

चक्रमणं – चालणें
उत्सर्ग – त्याग
मात्र – मार्ग
बांहुटी – हात
सैंध – वाटेल तिकडे
करणें – इंद्रियें
तोंडेंसुती – तोंडें घालितात
आमिष – विषयभोग
तिहीं – जागृत स्वप्न सुषुप्ति
प्रकृतिवनमाधवी – मायारूप वनाला वसंत
सोंचि -- बरोबर
साटी – बरोबर
वाचस्पती – बृहस्पती
मिषी – चिन्हें
नुमसे – उघडा न करी
आंगें – आपल्या मुखानें
खडाणे – लाथरी गाय
पण्यांगना = वेश्या
स्फीती – कीर्ति
अवसरीं = प्रसंगीं
सानुले = अतिशय लहान
मवाळ = मृदु
चंडांशु = सूर्य
परिवर = गुप्तपण

मिणधी = ओशाळी
आंगवठा – मूर्तिमान
पाखाळा – स्वच्छतेस
वंग डाग
नाराचांची – बाणांची
अवष्टंभहीन – अहंकारावांचून
उखी – नाश
एकावळीची -- एकेरी हाराची
लेपाहातींचें– चित्राच्या हातचें
टांगा—मस्तक
करेयाचा—उंटाचा
इसाळे—स्पर्धनें
पऱ्हवे—चर
उम्हताति—वाहतात
खातवडे—उकिडें
खाडीहूनि—तोंडांतून
अपवाड – अनीवार
अनुघड – अस्पष्ट
गरुवा—मोठा
खोकरें – फुटकी भांडीं
उभळीचा -- खोकल्याचा
सोईलिया – सोयऱ्यांला
रुसिजे—दूर करावी
वसते —ठीक
नागवे -- न सांपडे

उखिता—वाटसरू
प्रजा—मुलें
वस्तीकरे—वाटसरू
गोरुवें—गुरें
पुंसा—पोपट
धात्री—स्थान
सबळ—बर्ची, पहार
उफगे—रिकामा पडे
संयोग वियोगें—लाभालाभानें
मोटकी—अल्प
शोखे—शोषे
ऊर्मी—उत्कर्ष
लेंडी—ओहोळ
वरवंडा—बांध
समुडबुडी—मुळासहीत
कडाडी—कडयावरून
वयसेचिनि—तारुण्याच्या
उवाये— उत्कर्षानें
सावाये—साह्यानें
निकण - कणरहित
जवटे - जुळी
वेधी - नांदी
थावी - आश्रयानें
आंबुली —स्त्री
आंबुला - पती

गुणीं—दोघांत
सूदलें—घातलें
कुंडीं—तोंडीं
पांख—पंख
वरपडे—प्राप्त
कश्मल—वाईट
बैसका—आत्मरूपी पडलेली बैठक
विश्वतश्चक्षु—सर्वत्र डोळे असणारा
रुंधला - व्यापला

## अध्याय चौदावा

प्रज्ञा प्रभातसूर्या - बुद्धिरूप प्रातःकाळच्या सुर्या
सोहंभाव सुहावया - मी ब्रह्म असा भाव सुशोभित करणाऱ्या
नाना - किंवा
हेलावया - लाटा
विशद - शुद्ध
पुढिलाची - दुसऱ्याची
चोरिजे - बांधिजे
लाघव - नाटकीपणा
आपणपे - आत्मरूपाप्रत
नाहीं - अभावरूपही आहे

ठाणें – आकृति
उमप – मोठी
चेत्तां – जागे होतां
गुर्विणी – गर्भार
अभिव्यक्ति – स्पष्ट दशा
गौसी – शोधी
महद्ब्रह्म – माया
उद्दीपावे – प्रकाशावे
पोखे – पोसली जाते
बागडी – सोंगें
खोळी – कांत
सौरभ्य – अत्यंत परिमळ
जीर्ण – जिरलेला
अव्यभिचारी – शुद्ध
सेजिया – शेजारच्या
लाघवें – कौशल्यानें

## अध्याय पंधरावा

चौफाळूनी – चौरंग करून
कुडमळी – कळ्यांनीं
अनन्योदकें – अभेदरूप-
जळानें
तन्निष्ठ – श्रीगुरुनिष्ठ
निर्वाळूनि – गाळून
घणावली – घट्ट झालेली
जोडी – जोडवी
आनंदामोद – आनंद हाच
सुवास
सात्विकाचें – सत्वाचें
कुमुळ – कळी
नाहं – निरभिमान
पोटाळूं – आलिंगू
पाउवा – पादुका
पाट – पट्टाभिषेक
आथिला – संपन्न
ठाया – नगराला
धुमाड – योग
निवाड – विवेचन
साइखडेयाची – कळसूत्री
बाहुलीची
देहराज – जीव
आपंगी – स्वीकारी
पांगी – विस्तारी
हीन – हीनांग
पुरता – पुरा
वळघूनि – चिकटून
पांसुता – रजःकणत्व
निष्कर्ष – शेवट
मागिला – मागें सांगितलेला
दोहोंहून वेगळा
अवर--अलीकडचे

सूंचिजे – ओळखावा
आपैते – अनुकूल
परते–परिणाम पावे
उजू—अखंड
हरळ–खडे
तगणें–टिकाव
ठाई–स्थापन केले
रससोय–स्वयंपाक
वावो–मिथ्या
चेवोनि–जागेकरणें
उखा–प्रातःकाळ
रुखा–वृक्षाला
कुंजरी–हात्तीण
सूदालिया–घातली असतां
सरावो–अभ्यास
कोडी–कोटयावधी
फलपाकी–द्राक्षाचे घोस आल्यावर
अंधु–धृतराष्ट्र
परगुणे–पाहुणचार

## अध्याय सोळावा.

अद्वयाब्जीनिविकाश–अद्वैतरूप कमलिनीचा प्रकाश करणारा
विवळतियेसवळे–उजाडल्यावर
होणाऱ्या प्रातःकाळीं
अविसाळे–घरटीं
लिंगदेह–वासनात्मक सूक्ष्मदेह
वेच–मरण
चिद्भ्रमराचा–जीवचैतन्य भ्रमरांचा
शब्दाचिया–बुद्धीला मोह करणाऱ्या शास्त्रादिकांच्या
आसकडी–अडचणीच्य जाग्यांत
भेदनदी–जीव व ईश्वर यांविषयींची भिन्नबुद्धि
बुद्धिबोध–जीव ईश्वर
सामरस्याचें–ऐक्याचें
चिद्गगन–ब्रह्मरूप आकाश
पाहालिये–उजाडलेली
चोरली–चोरवेल
दांगे—अरण्यें
जयाचा—ज्ञानसूर्याचा
निबर—तीव्र
उखरी —अज्ञानरूप माळ जमीनीवर
प्रत्यग्बोध —आत्मबोध
आते —पाणीमय
भलतेसणी -- पाहिजे तेवढा

केशिहता – केशि दैत्यास मारणारा
वृत्तिक – वतनदार
तिजा – तिसरा ज्ञानयोग
अंगवरी – स्थानापर्यंत
सुयिजे – घालवी
साज्ञ – सशास्त्र
स्वाध्यावो – अध्ययन
तुकाचा – वजनाचा
प्रसरा – प्राप्तीसाठीं
आटणी – श्रम
सौजन्य – मैत्री
राहाटणे – वर्तणें
सोप – पोकळ
धाता – ब्रह्मदेव
सुभग – भाग्यवान
अपैशून्य – उणें न पाहाणें
न कडसी – न परिक्षी
अलोलुयत्व – कोणत्याही विषयावर आसक्त नसणें
जीवे – जगतो
औटहात – साडेतीन हात
अवकळा – दुश्चिन्ह
निर्मळा – साधूला
निसुगा – कोडग्याला

अक्षमे – पंगु
निज – मन
साहातिया -- साहाजिक
गरिमा – महत्व
निर्वाळूनि – शुद्ध करून
गांगेपीयूषें – गंगोदकानें
मंकोचली – लाजली
मोक्षचक्रतींचें – श्रीविष्णूचें
अग्रहार – इनाम
दृष्टादृष्टाचा – इहपरलोकींचा
फोकारिजे – उघड कीजे
चौबारा – चवाठा
अल्पकु – दरिद्री
उतणें – माजणें
पुष्टगंड – मोठा ताठा
परमलंड – उन्मत्त
रूढ – प्रसिद्ध
तिखयाचे – पोलादी
पारुष्य – काठिण्य
अवतरण – मूर्ती
खिचटे — खिचडी
बुद्धिचेष्टे – बुद्धिव्यापारास
घापे—घालावे
विरु – विरुद्ध

## अध्याय सतरावा.

विश्वविकासित – जगरूप प्र.
फुल्लित मायेची
योगनिद्रा – ध्यान
त्रिपुरीं – त्रिपुरासुरानें
दैविकी – दैवीदृष्टी
सानी – लहान
मीलनोन्मीलनी – उघडणें व
झाकणें
प्रवृत्तिकर्णाच्या — संसारिक
वृत्तीच्या
चाळी – हालविण्यानें
मदगंधानिळी – वायेनें
निवृत्तिकर्णतोळे – अंत-
र्मूखत्ववृत्ति
आहाळली – हालली असतां
विधुळे—नाश पावे
लास्यविलास—नृत्य कीडा
कळास—कौशल्य
पातेजो नये—विश्वासूं नये
खांचती—दबती
वारिती – धारण करितो
वानी – प्रकारावरून
बांधा – देहाकृती
मेधा बुद्धि
विद्याजात – सकळविद्या
खेंचरा – पिशाच्चाला
घेपे – घ्यावा
अंतर – अंतर्गत
मेच् – आवड
परिणमला –परिणाम पावला
सळे – स्पर्धेनें
कुहिले – कुजलेलें
उपहिता – आंबवण
निपट –निशेष
उतान्ही – इच्छा
उळिग – भोंवरा
अंगेष्टी – साष्टांग
सुरवाडा – सुखावस्थेस
धुरे – अग्रभागीं
लोणकीजे – ओवाळून
टाकावी
जन्मतेनी – जन्म काळींच
मात्र स्त्रीस्पर्श
प्रधानपणें – मुख्यत्वें
जावळिया – परक्यास
वाग्भुवनीं – वाचारूप
मंदिरांत
ब्रह्मशाळा – वेदशाळा
वाग्भव – वाचेपासून झालेलें

नमस्तपोभिधाना – मानस तप अशा नांवाला
हातवटी – रीत
आंतौते – आंत
दानवर्या – श्रेष्ठ
विभांडुनिया – पराभवून
मातंग – मांग
गत्रादी – अन्नछत्र
प्रणव – ओंकार
बुझा – समजा
सवाइलिया – सांग झाल्यास
सांवायिला – साह्यभूत १ असा
नसरोनि – कामीं न पडे
दृष्टादृष्टी – इहपर

# अध्याय अठरावा.

निजजनाखिल मंगल – स्वभक्ताला सर्वथैव मंगलकारक
जन्मजराजरद जाळ – जन्मवार्धक्यादिरूपी मेघाला
प्रभंजन – नाशकर्ता वायू
विदाळितामंगलकुळ – नाशिली आहेत अमंगळाचीं ज्यानें
विगतविषय – वैराग्य संपन्न यांचा प्रिय
कलितकाळकौतुहल – कृतांत उत्साहनाशक
चलिताचित्तपानतुंदिल – चंचलचित्ताच्या प्राशनानें दोंदिल
जगदुन्मीलनाविरल – जगास प्रकट करून त्यांत निरंतर
स्फुरदमंदानंदवहल – शांत अशा अत्यानंदाला स्फुरद्रूप करणारा असा
नित्यनिरस्ताखिलमळ – सर्व पापांचा जेथें नाश आहे असा
स्वप्रभ – स्वयंप्रकाश
जगदंबुदगर्भनभ – जगद्रूप मेघांच्या आकाशा
भुवनोद्भवारंभस्तंभ – जगद्रूप उत्पत्तीचा मूळस्तंभ

भवध्वंस= संसारनाशक
विशुद्ध = उपाधिरहित
अविद्योद्यानद्विरद= अविद्यारूप वनाचा नाश करणारा
शमदममदनमद्भेद—काममदांचा शमदमे करून नाश करणारा
दैवैकरूप—एकरूपच देव
अतिकृत कंदर्प सर्पदर्प—कामसर्पाच्या गर्वाचा तिरस्कार करणारा
भक्तभावभवनदीप-भक्तांच्या प्रेम मंदिराचा दीप
तापापह—तापहर्ता
परिणतोपरमैकप्रिय – परिपक्व आहे शांती ज्याला प्रिय ज्यास तोच एक
निजजन जितभजनीय—भक्ताधीन व भजन योग्य असा
मायागम्य—मायेस अगम्य
अकल्पनाकल्पतरो —अकल्पित फळ देणारा
स्वसंविद्द्रुमबीजप्रारोहणावनी – स्वसंवेद्य ज्ञानवृक्षाचें बीज रुजण्याचें स्थान

फिटोनेणें—नाहींसे होऊं शकत नाहीं
वोसंडीना—सोडीत नाहीं
सोमसूर्यग्रहणें=चंद्रसूर्याचीं ग्रहणें
पार्वणें=पर्वकाळीं श्राद्धदान वगैरे क्रिया
वांझ=निर्फळ
वोसंडी=त्यागी
आतळा=स्वाधीन होणें
उगर=प्रसिद्धि
लाहोनि=धारण करून
गांवढे=अडाणी
मृत्तिकेचा वीट=मातीला कंटाळून
केउते=कसे
अवलीळा=सहज
मा=पइंतु
निडळ=कपाळा
मिसके=निमित्ताने
असिके=सर्व
अवस्थात्रय=जागृति स्वप्न सुषुप्ति
चैतन्याचे=परमात्म्याचे
पृथग्विध करण=निरनिराळीं इंद्रियें

फलनसुये दिठी॰फलदृष्टीनें पाह्यात नाहीं
ठाखिली=आवघी
पैठी–आर्पण
सरकटित–रगाडित
त्रिशुद्धीसी–खचित
कलाली–कपटी
फुडी=खरी
पापपुंज=पापांचा ढीग
अव्याहत=सर्वथैव
प्रवृत्ति निवृत्ति मापकी=प्रपंच-परमार्थास ओळखणारी
कुडा=खोटा
बुझे=समजे
निरवधी=अत्यंत
अवचटे=अकस्मात
नोडवे=प्राप्त न होय
चोखविखी=शुद्धतेविषयीं
अक्षत=आमंत्रण
मांदियेवरी=जनसमुदायाला
बुझे=वाटे
साच=उचित
सुये=वाली
येती=व्हावी असे
धृति=धैर्यानें
मीनल्या=मिळाली असतां

आपैसी=सहज
विष मधुरें=शब्दानें मधुर
गोडिरे=मधुर
वळिले=बनविले
आपुली=स्वधर्म
असंभाव्य=त्याज्य, निंद्य
उपरम=शांती
शम=शांती
उपक्रम=आरंभ
विरजा=साह्यभूत
वोजा=रीतीनें
सटवीचिये राती = जन्मल्याच्या साहाव्या रात्रीं
वाती = दिवा
शौच शुचिर्भूतपणा
भावशुद्धि = विचारानें
क्रिया = सत्कर्माचरण
जियाले = जिणे
सुहावा = मधुर
पंचम = नांवाचा स्वर
निष्टंक बुद्धि = निश्चयात्मिकाबुद्धि
आस्तिक्य = श्रुतिस्मृतिविषयीं श्रद्धा
राजमुद्रा = राजाचा शिक्का

कृषीाजिणें = शेतकीवर निर्वाह करणे
समर्घाची = स्वस्त दरानें घेतलेली वस्तु
महार्घ = महाग
द्विजन्मे = खरा जन्म मुंज जाल्यानंतरचा
अनन्य = एकच
वोलावा = जिव्हाळा
आभार = भार
विषम = कठिण
जियेतें = ज्याच्यायोगानें वाचावें
कुन्हें = वाकडे
गाळावा = टाकावा
भारी = कठीण
पुरुपार्थराज = मोक्ष.
वोरँडे – पान्हानें
जाणे = जाणते व नेणते
चंद्रिका = चांदणें
विवेका -- विचार
स्त्रियेसीं – लक्ष्मीसह
बासी -- ज्यापक्षाकडे
वल्लभ – पति
श्लाघ्यतेचा – प्रतिष्ठेचा
खणुआळ–कठीण
हिता–कन्या
प्रदुतिगृहिता–दान घेणारा
गिवसावे–शोधून घ्यावे
वानावें–वर्णाव
अपैसया–आपोआप
आभास–भ्रांति
वोलांश - ओलावा
संस्कारवशें–पूर्वकर्मानें
शीतांशु–चंद्र
रिझलेनी–संतुष्ट झाल्यानें
पसाय–प्रमाद
दाटणें–ओझें
विसावया–विश्रांतीस
कणा–धान्य
भुसा–फोल
सोसरिसा–श्रम सारखाच
रंधन–शिजविण्याची खटपट
अदृष्टें–प्रारब्धानें
नटी–नाचवितो
प्राचीनाची–पूर्वकर्मांची
तया–त्या हृदयस्थाला
अहंवाचा चित्त आंग–मी हें स्फुरण, शरीर वाचा व मन
गांग–गंगोदक
प्राकृताहि–साधारण

दासिरू–बटीक
जीवग्रंथी–जीवदशा
कानीं लाऊं–ऐकूं
वाग्यज्ञे–ग्रंथरूप यज्ञानें
व्यंकटी—कुटिलता
विश्वेश्वरावो—श्रीगुरु
दानपसावो—दानप्रसाद

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 3506
वाई जि. सातारा

३५०६/धा/

# ॥ श्रीज्ञानेश्वराष्टकं स्तोत्रम् ॥

कलावज्ञजीवोद्धरार्थावतारं, कलाङ्काङ्कितेजोधि कामोदिवक्त्रम् ।
खलानशिवादा पनोदार्हदक्षिं, समाधिस्थ मूर्ति भजे ज्ञानदेव
अलङ्कापुरी रम्यसिंहासनस्थं, पदाम्भोजतेजः स्फुराद्दिक्प्रदेश
विधीन्द्रादिदेवैः सदास्तूयमानं, समाधिस्थमूर्ति० ॥ २ ॥
गदाशङ्खचक्रादिभिर्भा चिदानंद संलक्ष्य नाव्यस्वरूपम
यमाद्यष्टभेदाङ्ग योगप्रव समाधिस्थ० ॥ ३ ॥
ळुलायस्यवक्त्राच्छ्रुतिं पाठयन्तं, प्रतिष्ठानपुर्यां मधीसंज्ञसेव्य
चतुर्वेदतन्त्रेतिहासादिपूर्ण, समाधिस्थ० ॥ ४
सदापण्ढरीनाथपादाब्जभृङ्गं, निवृत्तीश्वरानुग्रहात्प्राप्ततत्वम्
महेन्द्रायणीतीरभूमौ वसन्तं, समाधिस्थ० ॥ ५ ॥
रणेकृष्णबीभत्सुसंवादभूतो,–रुगतार्थबोधाय ज्ञानेश्वरी वै ।
कृतीनिर्मिता येन च प्राकृतोक्त्या, समाधिस्थ० ॥ ६ ॥
चिराभ्याससंयोग सिद्धेर्बलाढ्यः, बृहद्व्याघ्रशायी महान्
निरीक्ष्याग्रकुड्यागतं वीतगर्वः, समाधिस्थ० ॥ ७ ॥
क्वचित्तीर्थयात्राभिषेणेति नत्वा, स्वसंवेद्यतत्वं न जानासि
यतः प्रेषितः खेचरं नामदेवः, समाधिस्थ० ॥ ८ ॥
स्तवं भावभक्त्यादिभिः सौख्यदेयं, पठन्तोऽर्थजातं ह्यवा
पदंयान्ति ते ज्ञानदेवस्य नित्यं, भवाब्धिं तरन्त्यन्त काले

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य नरसिंहसरस्वत
विरचितं श्रीज्ञानेश्वरस्तोत्रम् ॥ श्रीशंकर.

3506 / 0173 धा/



तें जियालेपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ॥४३६॥ निंब निंबोळिया मोडोनि आला । तरी तो काउळियासींचि सुकाळ जाला । तैसा भक्तिहीन वाढिन्नला । दोषाचि लागी ॥ ४३८ ॥ कां षड्रस खापरीं वाढिलें । वाढूनि चोहटां ठेविलें । ते सुणियांचे उपेगा आलें । जियापरी ॥ ४३५ ॥ तैसें भक्तिहीनाचें जिणें । जो स्वप्नीहि परी सुकृत नेणें । तेणें संसार दुःखासि भाणें । वेगरिलें ॥ ४४० ॥

## ब्राम्हणांचा अधिकार ( ९ )

मग वर्णांमाजि छत्रचामर । स्वर्ग जयांचें अग्रहार । मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे ॥ ४७५ ॥ जे पृथ्वीतळींचें देव । जे तपोवतार सावयव । सकळ तीर्थांसि दैव । उदयलें जे ॥ ४७६ ॥ जेथ अखंड वसिजे यागीं । जे वेदांची वज्रांगी । जयांचिये दिठीचियां उत्संगीं । मंगळ वाढे ॥ ४७७ ॥ जयांचिये आस्थेचिनि ओले । सत्कर्म पाल्हाळीं गेले । संकल्पें सत्य जियालें । जयांचेनि ॥ ४७८ ॥ जयांचेनि गा बोलें । अग्नीसि आयुष्य जालें । म्हणोनि समुद्रें पाणी आपुलें । दिधलें यांचिया प्रीति ॥ ४७९ ॥ मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती । फेडुनि कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढविली वक्षस्थळाची वाखती । चरणरजा ॥ ४८० ॥ अझूनि पाउलाची मुद्रा । मी हृदयीं वाहें गा सुभद्रा । जे आपुलिया दैवसमुद्रा । जतन लागी ॥४८१॥ ऐसे पुण्य पूज्य जे ब्राह्मण । आणि माझ्या ठायीं अति निपुण । आतां मातें पावती ते हे कवण । समर्थावें ॥ ४८३ ॥

८१।८।६३।८



## सर्व गोष्टी परस्वाधीन असून मनुष्यास व्यर्थ घमेंड कशाला ? ( ९ )

यालागीं शत जर्जर नावे । रिगोनि केविं निश्चिंत होवावें । कैसेनि उघडिया असावें । शस्त्रवर्षीं ॥ ४९० ॥ अंगावरी पडतां पाषाण । न सुवावें केवीं वोडण । रोगे दाटला आणि उदासपण । वोखदेंसीं ॥ ४९१ ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केविं पांडवा । तेंविं लोकां येऊनि सोपद्रवा । केंविं न भजिजे मातें ॥ ४९२ ॥ अगा मातें न भजावयालागीं । कवण बळ पां आपुलिया आंगीं । काइ घरीं कीं भोगीं । निश्चिंती केली ॥ ४९३ ॥ ना तरी विद्या कीं वयसा । यया प्राणियासि हा ऐसा । मज न भजतां भरंवसा सुखाचा कोण ॥ ४७४ ॥ तरी भोग्यजात जेतुलें । तें एका देहाचिया निकिया लागलें । आणि एथ देह तंव असे पडिलें । काळाचिये तोंडीं ॥ ४७५ ॥

टिळक ग्रंथसंग्रहालय वाई जि. सातारा
दा. क्र. 3506
294.53

## अध्याय नववा

### सर्वसंग्रह.

बाळक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंच जेवूं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखाचि वोढवी ॥ १५ ॥ अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीं कीं आहे । म्हणोनि वक्ता नोहे । श्रोतेनि विण ॥ २९ ॥ अगा थानीं कीर